होळकर सरकार ग्रंथमाल

REFBK-0001679

REFBK-0001679

# शासनपद्धति.

म.ग्रं.सं. ठाणे
विषय : इतिहास
सं. क्र. : ४३७

रंगनाथ विष्णु ललित, बी. ए.

Printed and published by Ganesh Mahadeo Virkar,

at his Sanjaya Press,

58—60 Jail Road, North, Bombay, No. 9.

REFBK-0001679

# प्रस्तावना.

एकंदर जगतांतील राष्ट्रांच्या राज्यपद्धतींत इंग्लंडांतील शासनपद्धति श्रेष्ठ आहे हें बहुतेक सर्वांशीं संमत आहे. राजकीय संस्था वेत्यानीं या पद्धतीच्या नमुन्यावर हल्लीं अनेक देशांत कायदेशीर रीतीनें शासनपद्धति तयार केल्या आहेत, ही गोष्ट इतिहासांत नमुद आहे. अमेरिकेंतील 'युनायटेड स्टेट्स' अथवा संयुक्त संस्थानें यांनीं प्रजासत्ताक राज्य स्थापन केलें तरी सुद्धां इंग्लडच्या राज्यपद्धतीच्या नमुन्यावरच आपली शासनपद्धति तयार केली. साऊथ आफ्रिका, कानडा, आस्ट्रेलिया या ठिकाणीं इंग्लंडच्या अमलाखालींच इंग्लंडच्या पार्लमेंटनेंही याच नमुन्यानें राज्य शासनपद्धति अमलांत आणल्या. फ्रान्स वगैरे देशांत सुद्धां इग्लंडच्या राज्यपद्धतीचा नमुना थोड्या फार फरकानें घेतला आहे. सारांश इंग्लंडची शासनपद्धति सर्वमान्य समजली जात असून तिची तपशीलवार माहिती हल्लींच्या काळीं हिंदुस्थानांतील प्रत्येक सुशिक्षित मनुष्यास असणें अवश्य आहे. आतां हिंदुस्थानास स्वयं-निर्णयाचें तत्व लागू होणार असून हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणारी संस्था कशा प्रकारची असावी हा एक अत्यंत महत्वाचा विचार करतांना आपल्यास या इंग्लंडांतील शासनपद्धतीची माहिती असणें फायदेशीर व जरूर आहे. या दृष्टीनें रा. रंगनाथ विष्णु लळित यांनीं तयार केलेलें ग्रेटब्रिटनची शासनपद्धति

# प्रस्तावना.

हें पुस्तक यावेळींच लोकांसमोर आलें तें अभिनंदनीय आहे हें जास्त विस्तारानें सांगणें नको.

ग्रेटब्रिटनच्या शासनपद्धतीचा एक विशेष असा आहे कीं ही पद्धति कोणत्याही एखाद्या विशिष्ट कायद्यानें एकावेळींच अथपासून इति पर्यंत तयार झालेली नसून, ती वेळोवेळीं जशा अडचणी उत्पन्न होत गेल्या तशतशा तितक्या पुरत्याच युक्त्या व तजविजी अमलांत आणीत तयार झाली आहे. एखाद्या कुशल शिल्पकारानें ताजमहालसारख्या इमारतीचा यच्चयावत् सर्व आकार मनांत आणून, प्लान तयार करून, त्यावर इमारत उठवावी आणि एखाद्या जुन्या घराण्यानें जशी जरूरी लागेल त्याप्रमाणें सोपे, माड्या गोठे बांधीत बांधीत घर तयार करावें, या दोन इमारतींत जितका फरक पडतो तितका फरक फ्रान्स, संयुक्त संस्थानें, स्विट्झर्लंड वगैरे देशांच्या राजपद्धतींत आणि ग्रेटब्रिटनच्या राजपद्धतींत आहे. यामुळें पुढील विचार करणारास असा एक फायदा होतो कीं, कोणत्याही एखाद्या अंगाचा उपयोग काय, कोणत्या अडचणीसाठीं तें उत्पन्न केलें गेलें आहे वगैरे गोष्टींची चांगली कल्पना इंग्लंडच्या शासनपद्धतीवरून आपणास होते. एकंदर समग्र कायदा समोर तयार असल्यास अमुक एक विशिष्ट कलम कां घातलें आहे हें समजत नाहीं. ज्यावेळीं कायद्यासंबंधें वादविवाद होतो, त्यावेळीं चर्चा होते, तीवरून ही गोष्ट समजूं शकते, पण भावि पिढीपुढें नुसता कायदा असून वादविवाद नसतो, यामुळें भावि पिढीस कोणत्याही विशिष्ट तजविजीची अवश्यकता किंवा उपयुक्तता कळत नाहीं. फ्रान्स, संयुक्त संस्थानें, स्विट्झर्लंड, आस्ट्रेलिया वगैरे देशांच्या शासनपद्धती कायम करणारे कायदे हल्लीं

लोकांपुढे आहेत, त्यांची स्थिति वरीलप्रमाणें आहे. इंग्लंडची शासन-पद्धति कोणत्याही एका कायद्यानें प्रस्थापित झाली नसून तिच्या तुकड्यातुकड्यांची माहिती देणारा समग्र इतिहासच समजून घ्यावा लागतो; आणि यांत हा फायदा आहे कीं शासनपद्धतीच्या निरनिराळ्या अंगांचा काय उपयोग आहे हें वाचकांस कळतें. अशातऱ्हेचा विचार हिंदुस्थानच्या लोकांस यावेळीं कर्तव्य आहे; व आपल्यास स्वयंनिर्णयाच्या तत्वावर हिंदुस्थानची राज्यपद्धति बनवितांना हा विचार फार महत्वाचा आहे. उदाहरणार्थ, हल्लीं प्रश्न असा आहे कीं, हिंदुस्थानाला दोन कायदे कौन्सिलांची अवश्यकता आहे कीं काय ? विलायतेंत हाऊस ऑफ लार्डस् आहे तें कसें उत्पन्न झालें, त्याचा उपयोग काय ? हिंदुस्थानांत तशा धरतीचें कौन्सिल ऑफ स्टेट बनविणें अवश्य आहे काय ? हाऊस ऑफ लार्डस्‌ची रचना कशी आहे आणि येथें कौन्सिल ऑफ स्टेट बनविलें तर त्याची रचना कशी असावी ? पार्लमेंटचें काम चालतें कसें ? मिनिस्टर कसे नेमतात ? त्यांचे अधिकार काय ? येथें मिनिस्टर कसे नेमले जावे ? वगैरे अनेक प्रश्नांचा निर्णय करतांना ग्रेटब्रिटनच्या शासनपद्धतीची माहिती असणें फारच अवश्य आहे. अशी माहिती दहापांच विद्वान् डोक्यांसच असणें हल्लींच्या प्रजासत्ताक राज्यकाळांत युक्त नाहीं. ज्याला ह्मणून विचार करतां येतो त्यानें विचार करावा आणि आपलें मत अवश्य द्यावें अशी हल्लींची परिस्थिति आहे. यास्तव रा. रंगनाथ विष्णु [illegible] यांनीं मराठी वाचकांसाठीं तयार केलेला हा ग्रंथ फारच उपयुक्त आहे. तो अमेरिकेचे प्रख्यात प्रेसिडेंट् डाक्टर वुइल्सन यांच्या स्टेटनामक इंग्रजी ग्रंथाधारें तयार केला असल्यानें त्यांतील

## प्रस्तावना.

माहिती व विधानें पायाशुद्ध आहेत हें सांगणें नलगे. ग्रंथाची भाषा याहूनही सुबोध व्हावयास पाहिजे होती. पण त्यामुळें ग्रंथ वाढला असता, असें मला वाटतें. अशा शास्त्रीय विषयांवरील संकलित आधारवजा ग्रंथ अशाच भाषेंत व्हावयाचा हें उघड आहें. विषयच मराठी वाचकांस अगदींच अपरिचित असल्यानें तो तात्काळ समजण्यास अडचण पडेल, पण स्वस्थपणानें ग्रंथ वाचल्यास विषय सुगम झाला आहे, असें माझें मत आहें.

ग्रेटब्रिटनमधील राजकीय संस्था व अधिकारी यांची नांवें इकडील लोकांस ह्मणजे निव्वळ मराठी वाचकांस सोपीं व्हावीं ह्मणून रा. ललित यांनीं मराठ्यांच्या इतिहासांतील त्यांचे समानार्थक शब्द किंवा इतर नवीन संस्कृत शब्दांवरून बनविलेल्या संज्ञा वापरल्या आहेत, त्याजविषयीं मात्र मला दोन शब्द लिहिणें जरूर वाटतें. वाचकांस सुबोध होण्यासाठी ललितांनीं हे जुने किंवा नवीन शब्द वापरले आहेत, पण त्यानें कार्य भाग होत नाहीं. शब्दाचा मूळ अर्थ कांहीं असो, एकदां तो रूढ झाला ह्मणजे त्याच्या मूळ अर्थाकडे कोणी लक्ष देत नाहीं. पण मराठींत अद्याप हे शब्द रूढ व्हावयाचे आहेत आणि ते रूढ होईपावेतों असा घोटाळा उडणार हें खरें. पण प्रारंभीं रूढ करतांना चांगले शब्द किंवा पायाशुद्ध शब्द रूढ करणें इष्ट आहे. उदाहरणार्थ, Parliament या शब्दाचें भाषान्तर "राष्ट्रसभा" असें ललितांनी केलें आहें आणि House of Commons चें भाषान्तर 'लोकसभा' असें केलें आहें. दोहों संज्ञेंत बरेंच शब्दसादृश्य असल्यानें घोटाळा उत्पन्न होणें संभवनीय आहे. यासाठीं 'सभा' हा घटक ज्यांत नाहीं असा शब्द 'पार्लमेंट' शब्दाला वापरला असता तर बरें झालें असतें.

# प्रस्तावना.

माझ्यामतें कित्येक इंग्रजी शब्द आतां जसेच्या तसेच मराठींत वापरण्यास हरकत नाहीं. मुनसिपालट्या आणि लोकलबोर्ड हे शब्द मराठी झाले आहेत. मुसलमानी अमलाच्या वेळचे मुनसफ, शिरस्तेदार, फौजदार इत्यादि अनेक मुसलमानी शब्द आमचे झाले आहेत, तसे पार्लेमेंट, लेजिस्लेटिव कौन्सिल इत्यादि इंग्रजी शब्द आमचे कां होऊं नयेत? तेव्हां अतिशय प्रसिद्ध व उपयोगांत आलेले कांहीं शब्द तसेच ठेवावे व कांहीं नवे सोपे 'लोकसभा' इत्यादि बनवावे. दुसरें, जुने अधिकाराचे शब्द आतां वापरूं नयेत असें मला वाटतें. ते मराठ्यांच्या कारकिर्दीतच ठेवावेत. पंतप्रधान हा शब्द इंग्लंडच्या 'प्राइम मिनिस्टर' ला रा. लळित यांनीं लाविला आहे. एके ठिकाणीं 'मुख्य प्रधान' (हा शब्द तांब्याचा तांब्या यासारखाच मुळाकडे पाहिलें तर हास्यास्पद आहे. पण प्रधान शब्द मराठींत 'मंत्रि' 'सचिव' या अर्थी रूढ झाल्यानें 'मुख्य प्रधान' या शब्दानें हंसूं येत नाहीं.) हा शब्द वापरला आहे तोच वास्तविक बरा होता. पण वाचकांस पेशव्यांची आठवण देण्याची पंतप्रधान या शब्दांत शक्ति आहे तथापि त्याची अवश्यकता नाहीं असें मला वाटतें. पंतशब्द ब्राह्मणाचा उद्बोधक असल्यानें तर त्याची मुळींच अनाठायी योजना दिसते. तसेंच, प्रतिनिधि, अमात्य, सचिव यांच्या मागील पंत शब्द ठेवण्याची अवश्यकता नव्हती. असो, अशा रीतीनें मागील मराठ्यांच्या इतिहासांतील अधिकाऱ्यांचीं नावें ग्रंथकर्त्यानें जशीच्या तशीच वापरलीं आहेत, त्यां... अधिकार वाचकांस सुबोध होण्याचा हेतु आहे खरा, पण तीं योग्य नाहींत असें मला वाटतें. 'दर्यासारंग' शब्द तर उगीच जुना

## प्रस्तावना.

ालेला आणि तोही रूढ न झालेला विदेशी शब्द आहे. त्याऐवजीं ॲडमिरल हा शब्द अधिक रूढ आहे. असो हा विषय जास्त लांबवण्यासारखा नाहीं. रा. ललित हे ब्रिटिशवसाहति, हिंदुस्थान, फ्रान्स, अमेरिका वगैरे देशांच्या शासनपद्धति लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. त्यांत त्यांनीं हे घोटाळे होऊं देऊं नयेत, अशी माझी त्यांस सूचना आहे. ग्रंथकर्त्यानें शेवटीं कोणत्या इंग्रजी शब्दासाठीं कोणतें मराठी नांव उपयोजिलें आहे याची यादी दिली आहे यामुळें वाचकांचा गैरसमज होण्याचा मुळींच संभव नाहीं. माहितीच्या दृष्टीनें उपयुक्त परंतु शासनपद्धतीची रूपरेखा स्पष्ट करण्याला तितकीं आवश्यक नसलेलीं कलमें कंसांत दिलीं आहेत.

या ग्रंथाची उपयुक्तता हल्लीं विशेष आहे. स्वयंनिर्णयाच्या तत्वाप्रमाणें हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची पद्धति कशी असावी हा प्रश्न स. १९१९ सालांतच सुटावयाचा असल्यानें त्या सालच्या सुरवातीसच हा ग्रंथ प्रसिद्ध होणें अवश्य आहे; त्याप्रमाणें रा. ललित यांनीं शक्य तितकी जलदी करून हा ग्रंथ योग्य वेळीं लोकांसमोर ठेवला आहे याबद्दल पुन्हां एकवार त्यांचें अभिनन्दन करून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों. इंदूरच्या मराठी साहित्योत्तेजक सभेनें या ग्रंथास पारितोपक देऊन आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे ही गोष्ट शेवटीं नमूद करण्यासारखी आहे.

कल्याण ता. १६ दिसेंबर सन १९१८ } **चिंतामण विनायक वैद्य.**

ग्रंथ संग्रह
रा. नं. १८५
[illegible]
१८५

# ग्रेटब्रिटनची शासनपद्धति.

## मध्यवर्ती राज्यसत्ता.

(१) **राज्यघटनेचा मूळारंभः**—इंग्लंडांतील राज्यव्यवस्थेचा इतिहास लिहावयाचा तर त्याची सुरुवात टयूटन लोकांच्या प्राचीन राज्यव्यवस्थेपासून केली पाहिजे. पांचव्या शतकाच्या सुरुवातीस उत्तर यूरोपांतील व्हिकिंग लोक दक्षिण आणि पश्चिम यूरोपांत घुसत होते. पाठीवरील टाळयांच्या दडपणामुळें ह्मणा, आंतस्थ कलहामुळें ह्मणा किंवा वाढत्या लोकवस्तीमुळें ह्मणा, उत्तर यूरोपांत सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न झाली होती. मागें खो बसूं लागल्यामुळें पुढल्यास अधिक पुढें किंवा खालीं सरकावें लागत होतें. या धडपडींत फ्रँक लोकांनीं रोमच्या सत्तेचा पाडाव करून गॉल (आजचा फ्रान्स) हस्तगत केला. आणि आंग्ल, सॅक्सन व ज्यूट लोकांनीं ब्रिटनमध्यें आपला पाय रोंवला. इटलीवर चालून आलेल्या शत्रूंच्या झुंडीचा प्रतिकार करून साम्राज्याचें रक्षण करण्यासाठीं ब्रिटन बेटांतील बादशाही सैन्य ४१० मध्यें परत बोलावण्यांत आलें होतें. या सैन्यानें ब्रिटन सोडल्याबरोबर स्कॉट आणि पिक्ट लोकांनीं ब्रिटनच्या उत्तर प्रदेशावर चाल करून लुटालूट आरंभिली. रोमच्या आरमारानें कसे बसे थोपवून धरलेले डेन्मार्कच्या बाजूचे व्हिकिंग लोक दक्षिण व पूर्व किनाऱ्यावर

उतरले आणि त्यांनीं जाळपोळीस व कत्तलीस निर्दयपणें सुरवात केली. या लोकांस ब्रिटिश राजा व्हॉर्टिगेर्न यानें पिक्ट लोकां विरुद्ध आपल्या मदतीस बोलाविलें असें ह्मणतात. त्यांनीं व्हार्टि-गेर्नच्या शत्रूंना हांकलून दिलें खरें. परंतु तें मदतीचें कार्य संपल्याबरोबर परत जाण्याऐवजीं त्यांनींच व्हॉर्टिगेर्नवर शस्त्र उचललें आणि ब्रिटनवर आपलाच अंमल सुरू केला. त्यांनीं आपल्या भावाबंदास आणि सग्यासोयऱ्यांसही ब्रिटनमध्यें बोला-विलें आणि एक शतकपर्यंत हे लोक आपलीं बायकापोरें आणि ब्रिन्हाड बाजलीं घेऊन ब्रिटनमध्यें येऊन रहात होते. ब्रिटन लोकांना पहिला मार मिळाला तो सॅक्सन लोकांकडून. पण त्या माराच्या आठवणीमुळें या नव्या आलेल्या ज्यूट आणि ॲंग्ल लोकांसही ते सॅक्सनच ह्मणूं लागले. या तिन्ही लोकांची भाषा एकच–इंग्लिश–होतीं. ब्रिटनमध्यें त्यांचा जम नीट बसल्यावर ते ब्रिटनला इंग्लंड–इंग्लिशांचा देश असें ह्मणूं लागले.

ट्यूटनवंशाचे सॅक्सन लोक ब्रिटनमध्यें पहिल्यानें घरदार करून राहिले ते ४४९ सालीं. चाळीस वर्षां पूर्वींच ( ४१० ) रोमीय लोकांनीं ब्रिटन बेट सोडून दिलें होतें. तेव्हां ट्यूटन लोकांचा रोमन लोकांशीं कांहीं एक संबंध आला नाहीं. परंतु एल्ब व वेसर नद्यांच्या खोऱ्यांतून आलेल्या या लोकांस, रोमच्या राजसत्तेच्या हातांत हात घालून चालणाऱ्या रोमीय संस्कृतीची स्मृति जागृत ठेवणाऱ्या भव्य आणि मनोवेधक अशा किती तरि गोष्टी ब्रिटन-मध्यें आढळल्या. ग्रेटब्रिटनमध्यें नवथरच सत्ता प्रस्थापित करणाऱ्या या दर्यावर्दी ट्यूटन लोकांवर रोमच्या नष्ट झालेल्या राज्य-पद्धतीच्या अवशेषांचा कितपत परिणाम झाला असेल आणि ब्रिटिश

लोकांवर रोमच्या राज्यसत्तेचा ठसा, पुढें त्यांच्यावर राज्य करावयास येणाऱ्या त्यांच्या यजमानांस मधुनमधून तरि नक्कल करितां यावयास, कितीसा टिकला होता हें सांगतां येणें शक्य नाहीं. येवढें मात्र खरें कीं, ट्यूटन लोकांनीं घडविलेल्या राज्य-पद्धतींत रोमचें असें त्यांनीं कांहींएक घेतलें नाहीं. आणि त्यांच्या या राज्यपद्धतीच्या पायावरच इंग्रजी राज्य व्यवस्थेची इमारत उभारण्यांत आलेली आहे. त्यांच्या राज्य व्यवस्थेची रचना खास त्यांची होती. र्‍हाइन नदी वरील फ्रँक आणि गॉथ लोकांत, त्यांनीं रोमच्या साम्राज्यावर हल्ले करण्यापूर्वीं ज्या संस्था प्रचलित होत्या त्याच सॅक्सन आणि ॲंग्ल लोकांनीं ब्रिटनमध्यें आणल्या होत्या. फक्त नुक्त्याच जिंकलेल्या देशाच्या परिस्थितीस अनुसरून त्यांत कांहीं फेरफरक करण्यांत आले होते.

**(२) ट्यूटन लोकांच्या प्राचीन राज्यसंस्थाः—** इंग्लण्डांतील राज्यसंस्थांस आज जें राष्ट्रीयतेचें स्वरूप प्राप्त झालें आहे त्याची छायाही ट्यूटन लोकांच्या प्राचीन राज्यसंस्थांत दृग्गोचर होत नाहीं. हिंदुस्थानांत जशी इंग्रजी साम्राज्यानें एक-राष्ट्रीयता उत्पन्न केली आहे, त्याप्रमाणेंच नॉर्मन लोकांच्या अमला खालीं इंग्लण्डच्या राष्ट्रीयतेला सुरुवात झाली. ट्यूटन लोकांचा काळ उत्तर यूरोपांतील राष्ट्रघटनेच्या इतिहासांत सुरुवातीचा काळ होय. ते अजून लहान लहान टोळ्या करूनच रहात होते. गृहसत्ता किंवा कुल किंवा गोत्र सत्ता यांच्या बाहेर पडून राष्ट्र-भावना उत्पन्न होण्याइतकी त्यांची प्रगति झाली नव्हती. गोत्रांच्या एकीकरणानें राष्ट्रें बनत आलीं आहेत; आणि स्थानिक कुलसत्ता आणि मध्यवर्ती राष्ट्रीयसत्ता यांच्यांत ऐतिहासिक पूर्वापरसंबंध

आहे. राष्ट्र निर्माण होण्यापूर्वीच नव्हे तर तीं निर्माण झाल्या-नंतरही जनतेचा संबंध मध्यवर्ती राष्ट्रीय संस्थांशीं वेताचाच येतो. हिंदुस्थानांतल्या प्रमाणेंच त्या काळच्या एकंदर जर्मन लोकांत ग्राम आणि ग्रामसंस्था किंवा ग्रामपंचायत हेच राज्यव्यवस्थेचे केंद्र होते. आरंभीं मध्यवर्ती राष्ट्रीय राज्यव्यवस्थेशीं युद्ध प्रसंगां-व्यतिरिक्त त्यांचा क्वचितच संबंध येत असे, आणि ते जरि आपण एकाच गोत्रांत जन्मलों आहोंत असें समजून आपला संबंध पुराणकालीन एकाद्या प्रसिद्ध व्यक्तीशीं नेऊन भिडवीत तरि तो संबंध खरा नव्हता, केवळ लाक्षणिक आणि मानलेला असा होता. प्रत्येक गांवांत आपल्या गांवाची सर्व तऱ्हेची व्यवस्था पाहण्या-साटीं गांवसभा असे. शांततेच्या दिवसांत स्वतःचा कारभार पहाण्याच्या बाबतींत ती अगदीं स्वतंत्र होती; मध्यवर्ती सत्तेचा तिच्याशीं काडीचाही संबंध नव्हता. गांवांतील प्रत्येक स्वतंत्र पुरुषास--तो गुलामगिरीचा काळ होता, गांवसभेच्या सभासदत्वाचा हक्क असे. लढाईतही लुटीची वांटणी करितांना सर्व स्वतंत्र पुरुषांस मताधिकार असे आणि त्याच्या जोरावर त्यांना सेना-नायकाच्या स्वच्छंद प्रवृत्तीस थोडा बहुत आळाही घालतां येई. त्याकाळीं प्रत्येकजण स्वतंत्र होता. लढवय्या होता. सगळेच समान बल होते. यामुळें त्यावेळच्या राज्यपद्धतीवर तीव्र अशा लोक-सत्तात्मक भावनेचा पगडा बसलेला स्पष्ट दिसतो. आणि पांचव्या शतकांत ब्रिटनमध्यें कुलराज्यें स्थापन करणाऱ्या, समुद्राप्रमाणेंच तुफान आणि समुद्रासही तुच्छ मानणाऱ्या, कणखर आंग्ल आणि सॅक्सनचांच्यांत (तेही जर्मनच होते) या भावनेची तीव्रता अणुभरही कमी पडली असेल असें संभवत नाहीं.

**( ३ ) राजपदाचा उदयः**—शांततेच्या काळांत राजाची जरूरच नव्हती. परन्तु धामधुमींत आणि जय प्राप्तीनंतर काबीज केलेल्या मुलुखावर अंमल बसवितांना राजाची जरूरी स्पष्टपणें भासूं लागली. कारण लढाईत जयप्राप्तीसाठीं ह्मणून करावयाचे उपक्रम एकोप्यानें आणि सुव्यवस्थेनें केले पाहिजेत आणि ते तसे होण्यासाठीं सर्वांनीं एकाच्या सत्तेंत वागलें पाहिजे. लढाईत जय मिळविण्यास जशी ही एकमुखता आवश्यक आहे तशीच ती जिंकलेल्या मुलुखावर अंमल बसवून त्याचा उपभोग घेण्यासही आहे. या कारणानें आधीं सत्ता सेनानायकाच्या हातीं एकवटली आणि मग त्याला राजा करणें भाग पडलें. परन्तु अशा तऱ्हेनें अस्तित्वांत आलेलीं राज्यें सुरुवातीस फारच लहान होतीं. इंग्लंडच्या येवढ्याशा बेटांत तीं कितीं तरी होतीं. राज्यपदाची प्रस्थापना झाली तरी वहुशा गोत्र आणि गांवसभा यांच्या आंतर्घटनेवर फारसा परिणाम झाला नसावा. आंग्ल आणि सॅक्सन लोक आपल्या फार दिवसांच्या परिपाठास अनुसरून रोमीय लोकांनीं बांधिलेल्या वाड्यांच्या किंवा बसविलेल्या खेड्यापाड्यांच्या भोंवतालीं दाट वस्तीचीं लहान लहान खेडीं वसवून राहूं लागले होते. त्यांच्या गावांतील मुख्य मुख्य कुरणें आणि जलसंचय सार्वजनिक ठेवण्यांत येत. फक्त लागवडी जमिन खाजगी मालकीची करितां येत असे. गांवची हरएक व्यवस्था, विशेषतः न्याय आणि राज्यव्यवस्था, पूर्वीप्रमाणेंच गांवसभांच्याच हातांत होती. आणि प्रत्येक स्वतंत्र पुरुष गांवसभेचा सभासद होता.

**( ४ ) प्रांत—सभा आणि जन-सभाः**—राजसत्तेच्या वाढीनें राज्यपद्धतींत फरक पडला. प्राचीन जर्मन लोकांत फक्त

गांव सभाच होत्या पण आतां इंग्लंडांत त्यांच्यापेक्षां विस्तृत अशा संस्था अस्तित्वांत आल्या. त्या सर्व बाजूनीं पूर्ण वाढ पावलेल्या आणि एकजीव झालेल्या अशा होत्या. निरनिराळ्या खेड्यांचे गट करून हंड्रेड किंवा शतग्राम अगर प्रांत बनविण्यांत आले. राज्य-व्यवस्थेचे आद्य घटक जे ग्राम त्यांचे प्रमाणेंच शतग्रामांचीही प्रांत सभा असे. या सभेंत धर्माधिकारी, प्रांताधिकारी आणि शतग्राम किंवा प्रांत याच्या हद्दींत असलेल्या प्रत्येक शहराचे चारचार प्रति-निधी यांचा समावेश होत असे. या प्रांतसभेचे मुख्य कार्य न्याय-दानाचें होतें. कारण शतग्राम हा विभाग विशेषतः राज्यव्यवस्थे-पेक्षां न्यायदानाकरितांच केलेला होता. सॅक्सन सत्तेच्या पूर्वकालां-तील राज्यें ह्मणजे या शतग्रामाचे समुदाय होत. पुढें इंग्लण्ड जेव्हां मध्यवर्ती सत्तेच्या छत्राखालीं एकीकृत झालें तेव्हां या पैकींच कांहीं राज्यांचें शायर अगर कौंटीत ह्मणजे परगण्यांत रूपांतर कर-ण्यांत आले. प्रांत सभेवर आणि प्राचीन राज्यपद्धतीच्या शिरोभागीं प्रत्येक राज्याची जनसभा होती. राज्यांतील सर्व स्वतंत्र पुरुष तिचे सभासद असत. पहिल्या शतकांत जर्मनींतील कुलसभांच्या हातीं जे अधिकार होते तेच सर्व या लोक सभांच्या हातीं होते.

**( ५ ) आंग्ल राज्यें व नॉर्मन परगणे:**—प्रारंभीं इंग्लं-डांत पुष्कळ छोटीं राज्यें किंवा संस्थानें होतीं. प्रत्येक संस्थानांत लोकसभा होती. पुढें या लोक सभांस सल्लागार मंडळाचें स्वरूप प्राप्त झालें. या मंडळांच्या सभा राजाच्या अध्यक्षत्वाखालीं भरत. मंडळाचे सभासद राज्याच्या हितसंबंधांत राजाला सल्ला देत. राज्य-पद अस्तित्वांत येण्यापूर्वी अशा तऱ्हेच्या सभांच्या निर्णयांना जें महत्व आणि जो अधिकार होता तो राज्यपद अस्तित्वांत

आल्यावरही नाहींसा झाला नाहीं. पुढें नॉर्मन विजयाचे सुमारास ( १०६६ ) इंग्लण्डांतील लहान लहान संस्थानें मोडून सर्व इंग्लण्ड एकाच छत्राखालीं आलें. तेव्हां इंग्लण्डातील या निर-निराळ्या विभागांस, एककाळीं पूर्ण स्वतंत्रपणें आपले व्यवहार करणाऱ्या या संस्थानास परगण्यांची स्थिती प्राप्त झाली. पूर्वी सर्व राज्याची एका अर्थी राष्ट्रीय असलेली लोकसभा आतां केवळ प्रांत-सभा बनली. इतकेंच नव्हे तर राज्यव्यवहारांतील तिचे अधिकार आणि त्याबरोबरच महत्व नष्ट होऊन तिला केवळ न्यायसभेचें स्वरूप आलें. राजाचा प्रतिनिधि शेरिफ, धर्मखात्याचा प्रतिनिधि धर्माध्यक्ष आणि गोत्राचा प्रतिनिधि ऑल्डरमन ( हा बहुधा पूर्वीच्या राजवंशातील वारस असे ) यांच्याकडे या न्याय-सभेचें नेतृत्व गेलें. परगण्यांतील जमीनदार, मॅजिस्ट्रेट, (कोतवाल), धर्माधिकारी, प्रत्येक शहराचे चार चार आणि शतग्रामाचे किंवा प्रांताचे बारा बारा प्रतिनिधी आणि परगण्यांतील सर्व अधिकारी यांचा या सभेंत समावेश होत असे.

( ६ ) विटेनॅगेमोट-प्राज्ञसभाः—छोटीं संस्थानें मोडून एक छत्री राज्य सुरू झाल्यावर राष्ट्रीयसत्ता ज्या मानानें एकाद्या सभेच्या हातांत जाणें शक्य होतें त्या मानानें विटेनॅगेमोट म्हणजे प्राज्ञ सभा या नांवाच्या नवीन संस्थेच्या हातांत ती गेली होती. प्राज्ञसभा हें एक वजनदार सल्लागार मंडळ होतें. या प्रसिद्ध राष्ट्र-संस्थेची पूर्ण आणि खात्रीलायक अशी माहिती उपलब्ध नाहीं. परन्तु ज्या संस्थांस तिनें खो दिला होता त्यांच्याच रचनेसारखी बहुतांशीं तिचीही रचना करण्यांत आली होती असा सिद्धांत उर-विण्यास आधार आहेत. आतां प्रांतिक न्यायसभांच्या स्वरूपास उतर-

लेल्या पूर्व कालच्या छोट्या संस्थानांतील लोकसभेचे किंवा राष्ट्रीय मंत्रिमंडळाचे अधिकार या सभेला प्राप्त झाले होते. लोकसभा आणि प्राज्ञसभा या दोहोंची रचना एकाच तऱ्हेची असून एकीचें दुसरींत रूपांतर झालें आहें अशी कल्पना होती. बहुधा राष्ट्रांतील प्रत्येक स्वतंत्र पुरुषास या थोर सभेंत हजर राहण्याचा आणि मत देण्याचा हक्क असावा. परंतु पहिल्या पासूनच उघडपणें दरबारांतील आणि परगण्यांतील प्रमुख पुरुषां पुरतेंच तिचें सभासदत्व नियमित झालेलें होतें. या सभेस शेरिफ, शहरांचे व परगण्यांचे प्रतिनिधी, धर्माध्यक्ष, जहागिरदार आणि राजाच्या हाताखालील प्रमुख अधिकारी हे येत असत. राजाचे मनांत एकादे वेळीं खऱ्या खुऱ्या राष्ट्रीय मंत्रिमंडळास बोलाविण्याची इच्छा आलीच तर तो राज्यांतील एकाद्या मुख्य ठिकाणीं निरनिराळ्या प्रांत सभांतील सर्व सभासदांची एकत्र सभा बोलावी ( या सभेस मायसेल गेमोट ह्मणत ) आणि आपल्या कायद्यांस त्या सभेची जाहिर संमति मिळवी. प्रत्येक कायदा निरनिराळ्या सर्व प्रांत सभांतून मंजूर करून घेण्याची वहिवाट होती. राजा जी मायसेल गेमोटची सभा बोलावी ती केवळ हा त्रास वांचावा ह्मणून.

**( ७ ) प्राज्ञ सभेचे अधिकारः**—प्राज्ञ सभेचे अधिकार खरोखर फार मोठे होते. तत्वतः ते नेहमींच तसे असत, सुरुवातीला ते व्यवहारांतही होते. तिला राजाची निवड करण्याचा किंवा वेळीं प्रसंगीं त्याला पदच्युत करण्याचा जुना लोकसिद्ध अधिकार होता. सार्वजनिक जमिनींची सनद करून देण्यास तिच्या संमतीची आवश्यकता होती. तीच फौजदारी आणि दिवाणी खटल्यांचा निकाल करण्यानें अत्युच्च न्याय मंदिर

नं. इं. १५४

होतें. कायदे व अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याच्या कामांत राजाबरोबरच तिला ही वांटा होता. आणि तिच्या अनुमती खेरीज राजाला कर बसवितां येत नसे. राजाची सत्ता व वजन जसजशीं वाढत गेलीं तसतसें कायदे करण्यांत व न्याय देण्यांत तिची मदत घेणें हें केवळ शिष्टाचाराचें झालें, तरिही तिच्या वर्षांतून दोनतीन बैठका होत, आणि तिच्या मान्यतेचा विधी बऱ्याच बाबतींत वरपांगी आणि औपचारीकच कां होईना तरि आवश्यक होता. लाक्षणिक दृष्टया तो मोलाचाही होता, कारण अधिक कांहीं झालें नाहीं तरीं त्यामुळें राष्ट्रीय स्वातंत्र्याची स्मृति कायम राहीली होती.

**( ८ ) नार्मन सरंजामी पद्धत**:—नार्मन लोकांचा अंमल सुरू झाल्या बरोबर इंग्लण्डच्या राज्यपद्धतींत महत्वाचे फेरफार झाले. परगण्यांतील मुख्य अधिकारी राजाचे केवळ नोकर बनले. धर्माधिकाऱ्यांचा धर्मखात्या बाहेर संबंध तुटला. लोकप्रतितिधींनां राज्यव्यस्थेचे दरवाजे बंद झाले. ईंग्लण्डांतील जमीनदारानीं दुराग्रहानें जोराचा प्रतिकार केला. तेव्हां वुइल्यमनें आपला अंमल पूर्णपणें बसविण्यासाठीं निष्ठुरपणानें जमिनींचे गटच्यागट खालसा केले आणि ते नॉर्मन सरदार आणि शिपाई किंवा हुकूम बंदे इंग्रज यांस सरंजामी पद्धतीनें इनाम दिले. ही सरंजामी पद्धत यूरोपखंडांत बऱ्याच ठिकाणीं प्रचलित होती. तिनें जहागिरदारांस स्वतंत्र न्यायसत्ता मिळे. मोकाशी जहागिरदाराचा, आणि जहागिरदार वरिष्ट जहागिरदाराचा खासगी नोकर बने. ही पद्धत इंग्लण्डांत पूर्णतेस पोहोंचली. शहरांतील न्यायकचेऱ्या नाहींशा होऊन जहागिरदारांनीं आपल्या स्वतःच्या न्यायकचेऱ्या उघडल्या.

एकाकाळीं प्रांत सभांना असलेलें महत्व नष्ट झालें, आणि जी न्यायसत्ता जहागिरदारांच्या हातांत गेली नाहीं ती राजाचा परगण्यांतील मुतालिक जो शेरीफ त्याच्या कचेरीच्या हातांत गेली. जहागिरदारांस निराळी न्यायसत्ता मिळून महत्व प्राप्त झालें. तरी वुइल्यमनें त्यांस सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेवलें होतें. त्यानें त्यांची सत्ता आपल्या सत्तेला शह देण्यासारखी वाढूं दिली नाहीं इतकेंच नव्हे, तर आपणांस मिळालेल्या अधिकाराचा निरंतर उपभोग घ्यावयाचा तर वुइल्यमची मर्जी संभाळली पाहिजे हें जहागिरदारांस विसरूं दिलें नाहीं.

(९) नार्मन राजांचें वडें सल्लागार मंडळः-वुइल्यमनें जहागिदारांवरील आपली सत्ता ढिली पडूं दिली नाहीं. पण याही पेक्षां अधिक महत्वाची गोष्ट ही कीं त्यानें सॅक्सन राज्यपद्धतींतील प्राज्ञसभा, त्यानें स्वतः अमलांत आणलेल्या नवीन व्यवस्थेस योग्य असे फेरफार करून कायम टेविली होती. आपला सिंहासनावर बसण्याचा हक्क जन्मसिद्ध आणि कायदेशीर वारशानें उत्पन्न झालेला आहे, नुसत्या जयानें प्राप्त झालेला नाहीं असें त्याचें ह्मणणें होतें. आणि ज्या राज्यपद्धतिनुसार तो हा आपला हक्क सांगत होता ती शक्य तितकी कायम ठेवण्याचा त्याचा हेतु होता. पुरातन पद्धतीप्रमाणें राजपदासाठीं उमेदवार ह्मणून उभे राहून त्यानें आपली निवडणूक करून घेतली आणि सिंहासनावर स्थिरावल्यावरही पूर्वीच्या वहिवाटीस अनुसरून राज्यकारभार चालविण्याचा त्यानें प्रयत्न केला. त्यानें प्राज्ञसभा कायम राखली परंतु त्याच्या कारकीर्दीत तिचें स्वरूप मात्र बरेंच बदललें, बंडामुळें

त्याचा अंमल कडक होत गेला, आणि राष्ट्रांतील या मुख्य सभेतील राष्ट्रीय घटकावयवांची हकालपट्टी झाली. राष्ट्राच्या नवीन राज्यपद्धतीस नॉर्मन सरंजामी पद्धतीचें स्वरूप प्राप्त झालें तसें तें राजाच्या सल्लागार मंडळाच्या घटनेंतही प्रतिबिंबित झालें. मायसेल गेमोटचें खुद्द राजाकडून असामी मिळालेल्या वतनदारांच्या बड्या सल्लागार मंडळांत विसर्जन झालें. पहिल्या पहिल्यानें वस्तुतः किंवा सरंजामी पद्धतीच्या कल्पनेप्रमाणें राजाकडून जमिन धारण करणारे शिलेदार, ( नाइट ) जहागिरदार आणि उमराव तसेच मुख्य धर्माध्यक्ष, धर्माध्यक्ष, आणि मठाधिपति येवढ्यांच्याच या सल्लागार मंडळांत समावेश होई. पुढें धर्माधिकाऱ्यांसही वतन धारण करणारे ज्हागिरदार ह्मणूनच जागा मिळूं लागली. तत्वतः प्रत्येक जमीनदारास या सल्लागार मंडळांत बसण्याचा अधिकार होतासें दिसतें. राज्यकारभार ज्यांच्या हातीं होता त्या प्रतिष्ठित वर्गाच्य वतीनें बोलणाऱ्या राष्ट्रसभेची जागा भरून काढण्यासाठीं ह्मणून या सल्लागार मंडळाची स्थापना करण्यांत आली होती. परंतु वस्तुतः बडे जहागिरदार आणि धर्माधिकारीच सभांस नियमानें हजर रहात आणि सरतेशेवटीं सरंजाम हेंच सभासदत्वाचा हक्क प्राप्त होण्याचें कायदेशीर साधन ठरलें. प्राक्कालीन आंग्ल राज्यपद्धतीच्या इतिहासांतील प्रमुख विषय ह्मटला ह्मणजे नॉर्मन राजांच्या बड्या सल्लागार मंडळाचा विकास हाच होय. कारण सद्यःकालीन इंग्रजी राज्यपद्धतीची सर्व कार्यक्षम संघटना त्यांतूनच उदयास आली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यांतूनच प्रत्यक्षतः किंवा अप्रत्यक्षतः, एका नाहींतर दुसऱ्या मार्गानें राष्ट्रसभा, प्रधान मंडळ, आणि न्यायमंदिरें विकास पावलीं आहेत.

**( १० ) इंग्लंडांतील सरंजामी पद्धतः**—इंग्लंडांत पहिल्या प्रथम सरंजामि पद्धत आली ती नॉर्मनांबरोबर नव्हे. इतर देशांप्रमाणें तेथें हीं टयूटन राज्यकारणाच्या वाढी बरोबरच सरंजामी पद्धतीची वाढ झाली होती. फ्रँक आणि गॉथ लोकांनी ज्या पद्धतीचा अंगिकार केला होता तिचाच सॅक्सन आणि डेन लोकांनींही स्वीकार केला. यूरोप खंडा प्रमाणेंच इंग्लंडांतही जानपदाचे उमराव, स्वतंत्र पुरुष आणि गुलाम असे विभाग झाले होते. आणि व्यक्तिगत निष्ठेनें आणि मोकासदारी पद्धतीनें त्यांचे अनोन्य संबंध दृढ केले होते. नॉर्मनांनी येवढेंच केलें कीं पूर्वीच वाढीस लागलेल्या या सरंजामी पद्धतीस नवीन वळण लावलें. पुढें यूरोप खंडांत जशी ही पद्धत विस्कळित झाली तशी ती इंग्लण्डांत झाली नव्हती. आपली सत्ता बद्धमूल करितांनां वुइल्यमनें उमराव, जहागिरदार, इनामदार, शिलेदार या सरंजामी पद्धतींतील सर्व गिरनिराळ्या घटकांस राजसत्तेखालीं कायमचें दडपून टाकलें. आपल्या हातांतील राजसत्तेचा बिनदिक्कीत उपयोग करून त्यानें असें करून टाकलें कीं, कोणाही जहागिरदारास इतर बऱ्याच जहागिरदारांशीं कट केल्या खेरीज राजाच्या विरुद्ध उठतांच येऊं नये. त्यानें कोणत्याही बड्या जहागिरदारास एका ठिकाणी जहागिरी दिलीच नाहीं, ती दोन चार ठिकाणी वाटलेली असे. दक्ष राजांनीं जहागिरदारांचे कट केव्हांही होऊंच दिले नसते. ते मुळांतच खुडले असते. मोठमोठ्या उमरावांच्या मनांतील द्वेष आणि स्पर्धा यांची तीव्रता घालवून टाकण्यासाठीं त्यानें त्यांचा बड्या सल्लागार मंडळांत समावेश केला आणि राज्यव्यवस्थेंतील एक जबाबदारीचें कार्य त्यांच्या अंगावर टाकलें. या मुळें सर्व उमरा-

यांना हक्कानें आणि शांतपणें एकत्र बसतां येऊं लागलें. तो सल्लागार मंडळाच्या सभा वर्षांतून तीनदां बोलावी. त्यानें या मंडळाच्या सभांचा सल्ला निदान ऐकून घेण्याचें तर कधीही नाकारलें नाहीं. औपचारीक रीतीनें कां होईना राजाची निवड करण्याचा हक्क या मंडळाकडेच राहिला होता. कायदेही त्याच्याच सल्ल्यानें आणि अनुमतानें पास होत.

**(११) इंग्लंडांतील राज्यसंस्थाच्या वाढीचें विशेष स्वरूप:**—इंग्लंडांतील राज्यपद्धतीच्या इतिहासांत नमूद करण्यांत आलेला प्रमुख विशेष हा आहे कीं तेथील राज्यसंस्थांत सारखी वाढ होत आहे. अगदीं प्राचीन काळापासून काल आजपर्यंत राज्य-पद्धतींत झालेल्या सर्व संक्रमणांत अनन्य साधारण अशी अखंडता दृष्टोत्पत्तीस येते. या इतिहासांत, परंपरागत चालत आलेल्या संस्थाचा उच्छेद नाहीं; आंगतुक संस्थांची प्रतिष्ठापना नाहीं. किंवा त्यांत कायदे करण्यासाठीं किंवा राज्यकारभार पहाण्यासाठीं वारंवार उत्पन्न केलेल्या नवीन संस्थाची उत्पत्तिही नाहीं. हा इति-हास म्हणजे अथपासून इतिपर्यंत नकळत झालेले सूक्ष्म फरक, मंदगमतीनें झालेलें आवश्यक रूपांतर आणि आपोआप व जाणी-वही उत्पन्न न होतां झालेली वाढ यांचा इतिहास आहे. राज्य-पद्धतीच्या, एखाद दुसऱ्या शतकांचें अंतर पडलेल्या दोन निरनिराळ्या काळांतील स्वरूपांत एकदम पहाणारास फार मोठा विरोध दिसतो. परंतु एका पिढीची दुसऱ्या पिढीशीं तुलना करीत करीत सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें कीं अवचित झालेला फेरफार हुडकूं गेलें तरी दिसत नाहीं. कोणताही फरक अमुक मितीस झाला म्हणून सांगता येणार नाहीं. फार तर इतकेंच

ह्मणतां येईल कीं तो अमुक अमूक वर्षाच्या 'सुमारास' किंवा या नाहीतर त्या राजाच्या कारकीर्दींत झाला असावा. या सर्व क्रमाचे थोडक्यांत असें वर्णन करितां येईल कीं, त्याचे हप्ते लांब लांब आहेत. त्याची रूपरेषा चांगली ठळक आहे. आणि तो स्पष्ट होण्यास वारिकसारिक तपशिलाची आवश्यकता नाहीं.

( १२ ) वाढीची दिशाः—या वाढींतील मुख्य मुद्याच्या गोष्टी अगदीं थोडक्यांत सांगावयाच्या ह्मटलें; तर,–वड्या सल्लागार मंडळाची राष्ट्रसभा बनली. सल्लागार मंडळाच्या पूर्वीच्या घटने-प्रमाणें जे सरकारी अधिकारी व राजाच्या तैनातींतील प्रमुख प्रमुख नोकर या मंडळांत सभासद होते त्यांचे शाश्वत सल्लागार मंडळ झालें. आणि या शाश्वत सल्लागार मंडळांतूनच अर्वाचीन प्रधान मंडळाची उत्पत्ति झाली आहे. या शाश्वत सल्लागार मंडळांत जमावंदीचें किंवा न्याय मनसुब्याचें काम पहाणारे जे अधिकारी असत ते कार्यपरत्वें हळुहळू इतर सभासदांपासून अलग होत गेले, आणि पुढें कामाच्या स्वरूपाप्रमाणें त्यांची निरनिराळीं खातीं होऊन शेवटीं जमावंदी कचेरी, सदर अदालत ( चेन्सरी ) आणि वहिवाटीच्या कायद्याची ( कॉमन लॉ ) कचेरी या नांवांनें त्यांचा उल्लेख होऊं लागला.

( १३ ) शाश्वत सल्लागारमंडळः—राजानें ज्या सर-कारी किंवा तैनाती अधिकाऱ्यांचें साधारण किंवा शाश्वत सल्लागार मंडळ बनविलें होतें ते सर्व अधिकारी पूर्वी वड्या सल्लागार मंडळाचे सभासद असत. आणि सुरुवातीस त्यांनी वड्या सल्लागार मंडळाची कमिटी किंवा आंतर्मंडळ ह्मणूनच काम केलें असावेसें दिसतें. वड्या सल्लागार मंडळाच्या सभा वर्षांतून फक्त तीनदांच

भरत. त्याची रचना ठाम झालेली नव्हती. त्यांतील सभासद आणि सभासदाची संख्या प्रतिवर्षी बदलत असे. यामुळें त्यांच्या सल्ल्यापेक्षां सरकारी नोकरींत कायम असलेल्या अधिकाऱ्याचा सल्ला घेणें त्यापेक्षां किती तरी अधिक सोपें. पुनः हे सरकारी अधिकारी ह्मणजे वड्या सल्लागार मंडळांतून शेलके निवडून काढलेले असे सभासद कारण ते सर्वच त्याचे सभासद असावयाचे. तेव्हां राजानें त्यांचा सल्ला विचारावा आणि अधिकारसंपन्न अशा वड्या सल्लागार मंडळाशीं असलेल्या या संबंधानें त्यांनीं एकमुखानें दिलेल्या सल्ल्याला वजन प्राप्त व्हावें हें अगदी स्वाभाविक आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत तर त्या राष्ट्रीय संस्थेचे जवळ जवळ सर्वच अधिकार या शाश्वत सल्लागार मंडळास प्राप्त झाले होते. वड्या सल्लागार मंडळाप्रमाणें आपल्या अधिकाराचा उपयोग प्रसंगविशेषीं आणि केवळ मधून मधूनच न करितां सतत करितां येऊं लागल्याकारणानें, आणि पुनः इतर सभासदांस राज्यकारभारांतील प्रश्नांची वरवरच माहिती असणार पण यांस नेहमींच्या सरकारी कामाच्या परिचयामुळें त्याची इत्थंभूत माहीती असल्याकारणानें शाश्वत सल्लागार मंडळाच्या अधिकारांत त्या प्रतापशाली सभेच्या अधिकारापेक्षांही अधिक महत्व प्राप्त झालें.

**( १२ ) शाश्वत सल्लागार मंडळाची रचनाः—** नार्मन राजांच्या अमलांत या मंडळींत कॅन्टरबरी व न्यूयॉर्क येथील प्रमुख धर्माध्यक्ष, पंडितराव, ( जस्टिस् ) खजीनदार, ( ट्रेझरर ) पंतप्रतिनिधी, ( चॅन्सेलर ) कोठवळा, ( स्टयुअर्ड ) मुदपाकखानदार, खाजगी कारभारी, ( मार्शल ) खानगी कारभारी, ( चेंवरलेन ) आणि वांकनीस ( वटलर ) इतके कायमचे सभासद असत, मधूनमधून

राजास योग्य वाटतील त्या अधिकाऱ्यांस, धर्माध्यक्षांस व जहागिरदारांस आमंत्रण करण्यांत येई. त्याची रचना कोणत्याही एकाद्या कायद्यानें करण्यांत आली नव्हती. बड्या सल्लागार मंडळाच्या बैठका चालू नसतां त्याचें प्रतिनिधी ह्मणून मिरविणाऱ्या या शाश्वत मंडळाच्या बैठकींसही, बड्या सल्लागार मंडळाचा सभासद ह्मणून, कोणत्याही जहागिरदारास हजर रहातां आलें असतें. परंतु वस्तुतः त्याच्या बैठकीस बोलवावयाचें कोणास हें राजाच्या मर्जीवरच अवलंबून असल्या सारखें दिसतें.

**( १५ ) शाश्वत सल्लागार मंडळाचे अधिकारः—** फारच मोठे होते. राजानें त्याला आपला कायदेकारी, कार्यकारी आणि न्यायकारी मुतालिक ह्मणून नेमलें होतें, पण राजाच्या अधिकारां इतकेंच या मंडळाचे अधिकारही विस्तृत होते. न्यायदानाचीं कामें वगळलीं असतां राज्याला इतर प्रत्येक कामाच्या अंमलबधावणींत सल्ला देऊन मदत करण्याचें काम या मंडळाकडे होतें. बड्या सल्लागार मंडळांतील जहागिरदारांच्या मोठ्या समुदायांत बसलें असतां जे अधिकार राजाला प्राप्त होत, जवळ जवळ ते सर्व शाश्वत सल्लागार मंडळाच्या सभांतही त्यास प्राप्त होत. त्यांच्या सख्यानें राजाला जहागिरदारांवर कर मात्र वसवितां येत नसे; परंतु लवकरच एकत्र बसून सर्व प्रश्नांची विल्हेवाट लावण्याचें काम शाश्वत मंडळाच्या हातांतही बंद पडलें. तें स्वतः बड्या सल्लागारमंडळाचें लहानसें कार्यकारी मंडळ होतें. पण थोड्याच दिवसांत त्याचाही एकसंधीपणा नाहींसा होण्याची पाळी आलीं आणि त्याच्यातूनच दुसरीं लहान लहान कार्यकारी मंडळें निर्माण झालीं.

**( १६ ) न्यायसभाः**–कायद्यांत विशेष वाकबगार असलेल्या बऱ्या सल्लागार मंडळांतील सभासदांस या सभेचे सभासद करण्यांत आलें होतें. पुढें या सभेचा बऱ्या सल्लागार मंडळाशीं असलेला नांवाचा संबंधही कमी होत गेला तसें राजांनी जरूरीच्या वेळीं साधारण लोकांचाही या सभेंत समावेश केला. राज्यांतील जमा-बंदीची व न्यायमनसुब्याचीं कामें केवळ या सभेच्या हातांत सोंपविण्यांत आलीं. या सभेचेही पोटविभाग होण्यास फार काळ लागला नाहीं. लवकरच तिच्यांतून जमाबंदी न्यायकचेरी, दिवाणी दाव्यांची न्यायकचेरी, राजाची न्यायकचेरी, आणि सदर अदालत अशा चार कचेऱ्या उत्पन्न झाल्या. ( १ ) जमाबंदी न्यायकचेरी-कडे प्रारंभी मुख्यतः जमाखर्चाचे हिशेब तपासण्याचें काम होतें. थोड्याच दिवसांत तिच्यावर 'जहागिरदारांची' न्यायाधीश ह्मणून नेमणूक झाली. आणि राजाचा ज्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध आहे असे सर्व दावे तिच्या अधिकाराखालीं आले. ( २ ) दिवाणी दाव्याच्या कचेरीचा प्रजेप्रजेंतील सर्व दिवाणी दाव्यांवर अधिकार सुरू झाला. राजाची न्यायकचेरी तो जेथें जाई तेथें त्याच्याबरोबर हिंडत असे. तत्वतः तोच तिचा अध्यक्ष होता. तिला स्थानिक न्यायकचेऱ्यांवर देखरेख करण्याचा व दुसऱ्या कचेऱ्यांच्या अधि-कारांत न येणारे खटले ऐकण्याचा अधिकार होता. ( ४ ) शाश्वत सल्लागार मंडळाकडे पूर्वी न्यायदानाचें काम होतें. त्याच्यापुढें चाललेलीं अपिलें ऐकतांनां राजाच्या गैरहजेरींत चॅन्सेलर हा त्याचा अध्यक्ष असे. पुढें चॅन्सेलरची सदर अदालत ह्मणून निरा-ळीच न्यायकचेरी झाली. वहिवाटीच्या कायद्यानें पुष्कळदां खरा न्याय होत नाहीं. तेव्हां सारासार विचारानें अशा वेळीं न्याय

देण्याचा राजास अधिकार होता. तो अधिकार आतां चॅन्सेलरच्या हातीं गेला. अशा तऱ्हेनें सर्व न्यायखात्यावर अंशतः प्राधान्य मिळविण्याचा मार्ग त्याला मोकळा झाला. ही पृथक्करणाची व विकासाची क्रिया बाराव्या शतकाच्या प्रारंभीं सुरू झाली व चौदाव्या शतकाच्या मध्यास पुरी झाली.

( १७ ) **राष्ट्रसभा**—मध्यंतरीं ज्यांतून शाश्वत सल्लागार मंडळ आणि निरनिराळ्या न्यायकचेऱ्या उत्पन्न झाल्या त्या बड्या सल्लागार मंडळाच्या रचनेंतच वाढ आणि फेरफार होत जाऊन त्याला अत्यंत महत्वाचें स्वरूप प्राप्त झालें. नॉर्मन अंमल प्रस्थापित झाल्या नंतर एक शतकपर्यंत त्याच्या रचनेंत फारसा फरक झाला नव्हता. परंतु १२१५ मध्यें मिळालेल्या प्रख्यात सनेदचा ( मॅग्ना चॅर्टा ) आणि नंतर राज्यपद्धतीच्या सुधारणेसाठीं झालेल्या झगड्यांचा त्याच्यावर फारच मोठा परिणाम झाला. याच वेळीं राष्ट्रसभेच्या ( पार्लमेंट ) रचनेंत प्रातिनिधिकत्वाचा पहिल्या प्रथम उपक्रम झाला. आणि राष्ट्रसभेंत उमरावांबरोबर सामान्य लोकांस जागा मिळाली. मुख्य धर्माध्यक्ष, धर्माध्यक्ष आणि मठाधिपति यांस पूर्वापार चालत आलेल्या शिरस्त्यानेंच हजर राहतां येत होतें. मोठमोठ्या जहागिरदारांस खाजगी आमंत्रणानें बोलावण्यांत येत असे. आणि त्यांनीं आपला हा हक्क राखला होता. परन्तु ज्यांना खुद्द राजापासून जमीन धारण करणाऱ्या स्वतंत्र मालकांबरोबर परगण्याच्या शेरीफा मार्फत जाहिर आमंत्रणानें बोलावण्यांत येई त्या लहान लहान जहागीरदारांनीं हजर राहण्याचें सोडून दिलें होतें. कारण या हक्काचें जतन करणें खर्चाचें आणि त्रासाचें होतें. पुढें त्यांनां आमंत्रण करण्याचेच बंद झालें त्यांची जागा आतां प्रति-

निधींकडून भरून काढण्यांत आली. शेरिफास पाठविलेल्या आज्ञा-पत्रकांत कमी दर्जाच्या धर्माधिकाऱ्यांचे, आणि त्याहीपेक्षां महत्वाची गोष्टही कीं परगण्यांतील सरदार बहादुर ( नाइट ) आणि शहरांतील नागरिक यांचे प्रतिनिधि निवडून घेण्याचा हुकूम झाला. पहिल्या एडवर्ड राजानें १२९५ साली बोलाविलेल्या राष्ट्रसभेंत या सर्व घटकावयवांचा समावेश झाला होता आणि या गोष्टीनें पुढील राष्ट्रसभांच्या घटनेची रूपरेखा आंखली गेली.

( १८ ) जॉन राजाकडून विख्यात सनदेच्या चौदाव्या कलमांत मुख्य धर्माधिकारी, मठाधीपती आणि बडे जहागिरदार यांस खासगी आमंत्रणानें बोलवून शिवाय लहान जहागिरदारांस शेरिफ व बेलिफ यांच्या मार्फत जाहिर आमंत्रणानें बोलाविण्याचें कबूल करून घेण्यांत आलें होतें. परन्तु या जाहीर आमंत्रणांचा इष्ट परिणाम घडून आला नाहीं.

( १९ ) शहरांतील प्रतिनिधींचा, पहिल्या प्रथम, अर्ल सायमन ऑफ मॉटफर्टनें १२६५ सालच्या राष्ट्रसभेंत समावेश केला. राजा तिसरा हेन्री याजबरोबर चाललेल्या झगड्यांत आपल्याला सामान्य लोकांच्या पाठिंब्यावर विसंबून राहतां येईल हें तो जाणून होता. आणि म्हणूनच आपली सरशी झाल्याबरोबर बोलाविलेल्या राष्ट्रसभेंत आपल्या पाठिंब्याचा जाहीर पुरावा म्हणून त्यानें सामान्य नागरिकांची निवडणूक करवून घेतली. १२९५ सालीं पहिल्या एडवर्डनें मॉटफर्डचें अनुकरण केलें. परन्तु तें प्रातिनिधिक तत्वावर राष्ट्रसभेची रचना करून राज्यपद्धतीचा विकास करण्याचें त्यानें बुद्धिपुरःसर ठरविलें होतें म्हणून नव्हे. त्याला पैसे पाहिजे होते आणि लोक सर्व वर्गांच्या प्रतिनिधींच्या राष्ट्रसभेंत मंजूर

करून घेतलेले कर मोठ्या खुशीनें भरतील, हें त्याला कळून चुकलें होतें ह्मणून.

( २० ) परगण्यांतील सरदार बहादुरांचे प्रतिनिधी १२६५ पूर्वींही बरेचदां बोलाविण्यांत आले होतें. राष्ट्रसभेंत हळुहळू आधीं एक नंतर दुसरा अशा रीतीनें राष्ट्रांतील निरनिराळ्या घटकावयवांचा प्रवेश झाला. पहिल्यानें सर्व छोट्या जहागिरदारांस जाहिर आमंत्रण मिळूं लागलें. परन्तु तें फार दिवस टिकलें नाहीं. नंतर परगण्यांतील जमीनदारांस प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळाला. आणि शेवटीं शहरांतील सामान्य नागरिकांस आपले प्रतिनिधी निवडतां येऊं लागले ]

**( २१ ) राष्ट्रसभेच्या दोन निरनिराळ्या गृहांची किंवा सभांची उत्पत्तिः**—पहिल्या एडवर्डनें बोलविलेल्या राष्ट्रसभेच्या स्वरूपाची संस्था एकजीव होणें शक्य नव्हतें. ती अनेक जिनसी होती. तिची स्थिती लहान लहान दगडांनीं बनविलेल्या खडकासारखी होती. तिनें एकमुखानें फार दिवस काम केलें नाहीं. लवकरच तिचे दोन तुकडे होऊन दोन निरनिराळीं गृहें किंवा सभा निर्माण झाल्या. कमी दर्जाच्या धर्माधिकाऱ्यांनीं प्रतिनिधी पाठविण्याचा आपला हक्क मागण्याचें चालू ठेवलें असतें तर बहुधा दोहोंच्या ऐवजीं तीनही गृहें होतीं. परन्तु ऐहिक गोष्टींचा खल करीत बसलेल्या लोकसभेंत तिसरें गृह स्थापित करण्या ऐवजीं त्यांनीं वेगळें पडून आपली एक स्वतंत्र संस्था स्थापन केली. धर्माधिकाऱ्यांची सभा किंवा कॉन्व्होकेशन ह्मणजे धर्मखात्याच्या व्यवस्थेस वाहून घेतलेलें स्वतंत्र धार्मिक पार्लमेंटच होतें. त्यांनीं लौकिक कार्यांतील आपल्या व्यवस्थेचा वांटा धर्मखात्यांतील उम-

शवांच्या आणि त्यांच्या मतानें निवडून येणाऱ्या गृहस्थ प्रतिनिधींच्या हातीं सोंपवून टाकला.

( २२ ) या कारणानें राष्ट्रसभेंत दोनच वर्ग शिल्लक राहिले. एक सरदार जहागिरदारांचा व दुसरा सामान्य लोकांचा. जहागिरदारांनीं राष्ट्रीयसभेंतून बाहेर पडून आपलीच स्वतंत्र अशी उमराव सभा काढली. पुरातन कालापासून चालत आलेल्या वहिवाटीस अनुसरून मुख्य धर्माध्यक्ष, धर्माध्यक्ष आणि मठाधिपति हे त्यांसच चिकटून होते. शहरांतून निवडून आलेल्या सामान्य प्रतिनिधींचीही स्वतंत्र संस्था झाली. ही संस्था ह्मणजे लोकसभा किंवा हाऊस ऑफ कामन्स होय. मध्यम स्थितींतील जमीनदार आणि सरदार बहादुर यांची मात्र थोडेदिवस वटवाघुळासारखी स्थिती झाली. ते स्वतंत्र आमंत्रण येण्यासारख्या वड्या जहागिरदारांत मोडत नव्हते. सामान्य लोकांपेक्षां ते किती तरि वरच्या दर्जाचे. पण लवकरच ते लोकसभेंत सामील झाले. चौदाव्या शतकाच्या मध्यभागाचे सुमारास ( १३३३ ) हे फेरबदल घडून येऊन कायम झाले होते. त्या वेळीं राष्ट्रसभेची बाह्य रचना आजच्याप्रमाणेंच होती.

* कान्होकेशनचें स्वरूप प्रातिनिधिक होतें. राष्ट्रसभेप्रमाणें त्याचीहीं दोन गृहें होतीं. त्याला पार्लमेंटवरोबरच बोलावण्यांत येत असे, १७१७ सालीं तें तहकूब करण्यांत आलें, त्या नंतर त्याची कामासाठीं ह्मणून एकही बैठक भरली नाहीं.

( २३ ) **प्रिव्हि काउन्सिलः**—वडें सल्लागार मंडळ आणि त्याचेंच रूपांतर होऊन उत्पन्न झालेली अतएव त्याची वारसदार असलेली राष्ट्रसभा यांनां निवडक सल्लागार मंडळाच्या हातीं गेलेल्या सत्तेचा थोडा थोडका हेवा वाटत होता असें नाहीं. राजा

नेहमीं त्यांना विश्वासांत घेऊन चाले. राजाच्या कांहीं कांहीं अत्यंत मोठ्या अशा अधिकारांची त्यांचे मार्फत अंमल बजावणी होत असे पुढें शाश्वत सल्लागार मंडळाचें कायदेशीर अधिकार त्याहीपेक्षां संकुचित अशा प्रिव्हि काउन्सिलाकडे किंवा खासगी सल्लागार मंडळाकडे गेले तेव्हां तर ती व्यवस्था फारच जाचक वाटूं लागली. शाश्वत सल्लागार मंडळ हें जसें बड्या सल्लागार मंडळाचे एक आंतर्मंडळ किंवा कमिटी होतें, त्या प्रमाणेंच हें प्रिव्हि काउन्सिल शाश्वत मंडळाचे आंतर्मंडळ होतें. हें मंडळांतील मंडळांत आणखी एक नवीन मंडळ उत्पन्न झालें. सहाव्या हेन्रि राजाच्या कारकीर्दीत (१४२२–१४६१) ह्याचा जन्म झाला. शाश्वत सल्लागार मंडळांतील सभासदांची सारखी वाढ होत गेल्यामुळें तें फार अवजड झालें होतें. राजाशीं निरंतर आणि निकट संबंध राखण्या सारखें तें सुटसुटीत उरलें नाहीं. खासगी सल्लामसलतीला किंवा कोणत्याही गोष्टीचा झटपट निवाडा करण्याला आतां त्याचा एकावयवानें उपयोग करितां येईनासा झाला. तेव्हां राजानें शाश्वत सल्लागार मंडळांतील कांहीं निवडक सभासदांस साधारण सभासदांतून निराळे करून त्यांचें खासगी सल्लागार मंडळ बनविलें. त्यानें त्यांच्या कडून राजनिष्ठेच्या व झालेली सल्लामसलत गुप्त ठेवण्याच्या स्वतंत्र शपथा घेववल्या. त्या वेळेपासून शाश्वत सल्लागार मंडळ वस्तुतः मागें पडले. आणि खासगत सल्लागार मंडळ ही राष्ट्रांतील राज्यव्यवस्थेची व अंमल बजावणी करणारी प्रमुख संस्था बनली.

**(२४) खासगी सल्लागार मंडळाचे न्यायाधिकारः-** वास्तविकपणें राजास बडें सल्लागार मंडळ किंवा राष्ट्रसभा यांचे सहाय्यानें न्याय मनसुबा करण्याचे जे अधिकार होते त्यापैकीं

बऱ्याच अधिकारांवर शाश्वत सल्लागार मंडळानें आपला स्वतःचा हक्क प्रस्थापित केला होता. शाश्वत मंडळाच्या या हक्कामुळेंच निरनिराळ्या न्याय कचेऱ्यांचा त्या मंडळांतून विकास झाला. शाश्वत सल्लागार मंडळानें न्याय मनसुब्याचे जे अधिकार आपल्या हातीं घेतले होते त्यांवर पुढें त्या मंडळाचेंच मुखत्यार जें खासगी सल्लागार मंडळ यानें आपला हक्क सांगितला. या खासगी सल्लागार मंडळांतूनच ज्याची गोड आठवण अजून कायम राहिली आहे तें उत्तरेचें काउन्सिल, सर्व इंग्लण्डाच्या तिरस्कारास पात्र झालेलें स्टारचेंबर आणि उद्वेगजनक हाय कमिशन कोर्ट या न्यायकचेऱ्या उत्पन्न झाल्या. बेजबाबदार राज्यपद्धति कायमची नष्ट करणाऱ्या आणि राष्ट्रसभेची अबाधित सत्ता प्रस्थापित करणाऱ्या राज्यक्रांतीला चांगलीशी सुरवात होईतों त्यांचा अंमल चालू होता. सन १६४१त त्यांचा नायनाट करण्यांत आला.

**(२५) प्रधान मंडळाची उत्पत्तिः**—मध्यंतरीं प्रधान मंडळ अस्तित्वांत आलें होतें. वडें सल्लागार मंडळ आणि शाश्वत सल्लागार मंडळ यां प्रमाणेंच खासगी सल्लागार मंडळ ही इतकें मोठें व अवजड झालें होतें कीं कामाचा जलद निकाल लावणें आणि मसलत गुप्त राखणें कठिण होत चाललें. सन्मानाचें द्योतक म्हणून, निरनिराळ्या तऱ्हेनें मोठ्या झालेल्या माणसांस खासगत सल्लागार मंडळाचे सन्मान्य सभासद नेमण्यांत येऊं लागलें. या सभासदांस मसलतींत घेण्यांत येत नसे. त्यांना कधीं सल्लाही विचारण्यांत आला नाहीं. विशेष महत्वाच्या प्रसंगीं राजा मुख्य मुख्य मंत्र्यांचाच सल्ला घेई. तेव्हां राजानें खासगत सल्लागार मंडळांतील खास विश्वासांतील सल्लागारांस निवडून काढून त्यांचें हें प्रधान मंडळ

बनविलें. त्याच्या सभा खासगी सल्लागार मंडळाच्य प्रशस्त दिवाण खान्यांत भरण्या ऐवजीं लहानशा कॉबिनेट ( खोली ) मध्यें भरूं लागल्यामुळें त्यास कॅबिनेट हें नांव प्राप्त झालें. प्रधान मंडळ हें तिसरें आंतमंडळ होतें. थोड्याच दिवसांनीं प्रधान मंडळाच्या या नवीन पद्धतीनें उद्भवणारे फायदे व तोटे बेकनेने आपल्या नेहमींच्या तारतम्यानें व चाणाक्षपणानें दाखावून दिले होते. परंतु दुसऱ्या चार्लस राजाच्या नशिबाचा देशत्याग सरून राजपदाची पुनः प्रस्थापना झाल्या नंतर ही कांहीं दिवस पावेतों प्रधानमंडळाकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. पुष्कळ वर्षे पावेतों राजकारण पटु लोकांचा प्रधानमंडळ हें बे सनदशीर आणि स्वातंत्र्य विघातक असें मंडळ आहे हा समज कायम होता. इकडे त्याला मात्र अधिकाधिक महत्व येत चाललें. सरते शेवटीं त्यानें अंमल बजावणीची मुख्य सत्ता आपल्या हातांत पटकावली. आतां कितीतरी पिढ्या तें राज्यघटनेंतील आवश्यक असा भाग म्हणून मानण्यांत आलें आहें. तथापि सांगावयास गेलें तर विचित्र वाटेल कीं अजुनही कायदा करून त्याचा राजघटनेंत समावेश करून घेण्यांत आलेला नाहीं. त्यांतील सभासदांचीं नांवें सरकारी रीतीनें लोकांस जाहिर करण्यांत येत नाहींत. त्याच्या सभांचें आणि त्यांत मंजूर झालेल्या ठरावांचे दफ्तर ठेवण्यांत येत नाहीं. किंवा त्याचें अस्तित्वही राष्ट्रसभेच्या कायद्यानें मान्य करण्यांत आलेलें नाहीं.

**( २६ ) प्रधानमंडळाचा ( संस्थेचा ) विकासः—** अंमल बजावणीची सत्ता इतर संस्थांच्या हातून प्रधान मंडळाच्या हातीं चालली हें स्पष्टपणें पहिल्या प्रथम लोकांच्या नजरेस आलें तें

दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत. ( १६६०–१६८५ ) आतां तें इंग्रजी राज्य घटनेचा केंद्र बनलें आहे. ते ज्या टप्यानें आजच्या पदवीला पोहोंचलें त्यांचें एका नामांकित इंग्रज लेखकानें असें वर्णन केलें आहे कीं,—

( १ ) आरंभीं राजा खासगी सल्लागार मंडळांतील आपल्या मर्जीस उतरलेल्या निवडक सल्लागारांचें एक छोटें मंडळ करून त्याचा खासगी रीतीनें सल्ला घेऊं लागला. परंतु त्याला राज्य व्यवस्थेसंबंधीं कोणताही ठराव करितां येत नसे किंवा खासगी सल्लागार मंडळाच्या अनुमति खेरीज कशाचीही अंमल बजावणी करतां येत नव्हती. त्याला नियम नव्हते. कीं नव्हती घटना. अजून कॅबिनेट या नांवानें त्याला फारसें कोणी ओळखीत नव्हतें. अशी स्थिती पहिला चार्लस राजा गादीवर येईतों होती.

( २ ) नंतर दुसरा काळ असा आला कीं या छोट्या सल्लागार मंडळाला कॅबिनेट हें विशेषनाम कायमचें प्राप्त झालें. परंतु मान्य असे अधिकार त्याला मिळाले नाहींत. त्यानें खासगी सल्लागार मंडळाला व्यवहारांतही तसेंच कायद्यानें मिळालेल्या स्थानावरून पदच्युत केलें नव्हतें. राजाला सल्ला मसलत देण्याचा हक्क फक्त खासगत सल्लागार मंडळाचा होता. ( पहिल्या व दुसऱ्या चार्लसची कारकीर्द. दुसऱ्या चार्लसनें कांहीं दिवस प्रधानमंडळाच्या मार्फत राज्याधिकार चालविला. आणि आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं खासगी सल्लागार मंडळाची पुनर्घटना करून मग त्या मार्फत चालविला. )

( ३ ) तिसरा काल. याला तिसऱ्या वुइल्यमनें प्रधानमंडळाची नवीन रचना केली तेव्हांपासून सुरवात झाली. या पूर्वी प्रधान

मंडळ राष्ट्रसभेंतील निरनिराळ्या पक्षांच्या प्रमुखां मिळून बन- विण्यांत येत असे. परंतु वुइल्यमनें प्रधानमंडळाची निवड बहुमत पक्षांतूनच केली. त्या प्रधान मंडळाची रचना जवळ जवळ आजच्या प्रधान मंडळा सारखी होती. प्रधान मंडळाचा जरि त्या वेळीं राज्यघटनेंत समावेश झाला नव्हता—तो अजुनही झालेला नाहीं, तरि कायद्यानें नसेना पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्याच्या हातांत राजाला सल्ला देण्याची आणि अंमल बजावणीची पूर्ण व खरीखुरी सत्ता गेली होती. लोक अजून त्याच्याकडे असंतुष्ट नजरेनेंच पहात. कारण त्याच्यावर राष्ट्रसभेचा तावा नव्हता. प्रधानांचा राष्ट्रसभेंत समावेश करून त्यांनां राष्ट्र सभेस जवाबदार धरण्याची आधुनिक कल्पना अंशाअंशानेंच साध्य झाली.

( ४ ) सरते शेववटीं, अठराव्या शतकाच्या अखेरीस राज्य घट- नेच्या आधुनिक कालांत मुख्य प्रधानमंडळाच्या रचनेची कल्पना ठाम झाली आणि आज तागायत ती तशीच चालू आहे. ती कल्पना अशी [ अ ] प्रधान मंडळांतील प्रधान कायदे करणाऱ्या संस्थेचे ह्मणजे राष्ट्रसभेचे सभासद असलेच पाहिजेत. [ आ§ ] त्या सर्वांचे राजकीय विचार एकाच तऱ्हेचे असून लोक सभेंतील बहुमत पक्षांतून त्यांची निवड करण्यांत आली पाहिजे. [ इ ] त्यांचें

---

§ सांप्रतच्या महायुद्धांत पक्षभेद विसरून सर्व पक्षांनीं एक मतानें राज्यकारभार चालविण्याची आवश्यकता स्पष्ट झाल्यामुळें सर्वपक्षांचें संयुक्त असें मंत्रिमंडळ बनविण्यांत आलें असून तें तसेंच पुढें कायम रहावें ह्मणून पंतप्रधान लॉइड जॉर्ज हे येत्या निवडणुकींत खटपट करीत आहेत.

धोरण एकमुखी असलें पाहिजे [ई] ते राष्ट्रसभेस जबाबदार असले पाहिजेत. ह्मणजे लोकसभेनें नापसंती दर्शविल्यास त्यांनी सर्वांनीं एकदम राजीनामा दिला पाहिजे आणि [ उ ] त्या सर्वांनीं पंत प्रधानाच्या हाताखालीं वागलें पाहिजे.

[ २७ ] **राष्ट्रसभा व प्रधानः**—वर दिलेलीं आजकालच्या प्रधानमंडळाच्या रचनेचीं तत्वें राजाचे प्रधान आणि राष्ट्र सभा यांमधिल वारंवार बदलणाऱ्या संबंधांतून मंदगतीनें विकास पावलेलीं आहेत. राजानें सरकारी आणि दरबारी मुख्य मुख्य अधिकाऱ्यांचे खासगी छोटें सल्लागार मंडळ बनविलें आणि तो आपल्या महत्वाच्या अधिकारांची अंमल बजावणी त्यांचें सहायानें करूं लागला. या प्रधानांच्या हातांत जाऊं लागलेल्या सत्तेबद्दल पहिल्या पासूनच राष्ट्रसभेस हेवा वाटूं लागला होता. प्रधानावर आपली सत्ता बसविण्याचें तिनें हरयेक प्रयत्न केलें राजाला अंमल बजावणी करण्याबद्दल व्यक्तिशः जबाबदार धरण्याची सर्व धडपड क्रांतिकारक ह्मणून लवकरच सोडून देण्यांत आली. अन्याय होतो तो राजाकडून नव्हे या सिद्धांताचा अवलब करण्यांत आला. सरकारकडून कायदा व हक्क यांची जी पायमल्ली होते ती राजाला प्रधानांनीं दिलेल्या दुष्ट सल्ल्यानें ही कल्पना प्रचारांत आली. अन्याय होतो तो त्यांच्या हातून; तेच अन्याय करूं शकतात; तेव्हां प्रधानानांच सर्व अन्यायाबद्दल जबाबदार धरण्यांत यावें, या धोरणाचा राष्ट्रसभेनें स्वीकार केला. फार पूर्वी, बाराव्याच शतकाच्या अखेरीस पहिल्या रिचर्डचा चॅन्सेलर व जस्टिसिआर बुइल्यम लॅांगचॅप याला बड्या सल्लागार मंडळानें आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला ह्मणून कामा वरून दूर केलें होतें. चौदाव्या

शतकांत राष्ट्रसभेनें प्रधान आणि न्यायाधीश नेमण्यांच्या अधिकारावर आपला हक्क सांगितला; व एकदोनदां बजावलाही. राष्ट्रसभेनें दुसऱ्या एडवर्डच्या खजीनदाराचें व मुख्य न्यायाधीशाचें राजानें केलेल्या बे कायदेशीर कृत्यांतील वांटेकरी म्हणून डोकें मारविलें. तिनें त्याच शतकांच्या अखेरीस ( १३८६ ) दुसऱ्या रिचर्डच्या प्रधानावर, त्यानें आपल्या कृत्यांच्या समर्थनासाठीं खुद्द राजाचा हुकूम हजर केला तरि, अन्यायाबद्दल खटला करण्यास कमी केलें नाहीं. सतराव्या शतकांत खटला करण्याच्या कारणांत आणखी एका नवीनच कारणाची भर टाकण्यांत आली. आजपर्यंत प्रधानांस राजाला फक्त बेकायदेशीर सल्ला देण्याबद्दलच जबाबदार धरण्यांत येत असे. परंतु आतां अहितकारक सल्ला देण्याबद्दल ही जबाबदार धरण्यांत येऊं लागलें. सनदशीर हक्क आणि कायदा यांच्या उपमर्दा प्रमाणेंच धोरणांतील फार मोठ्या चुकांबद्दलही प्रधानाला जबाबदार धरण्याची सुरुवात झाली.

**( २८ ) प्रधान मंडळाचा राजीनामाः**—वुइल्यमच्या कारकीर्दीतील वारसदारीचा कायदा आणि वुइल्यम व मेरी यांचें राजधोरण यांनीं राष्ट्रसभेच्या वर्चस्वाच्या शेवटल्या काळाला शुभारंग केला. प्रधानांची नेमणुक करितांना राष्ट्रसभेच्या मताला मान देण्याची वहिवाट पडली आणि म्हणून हलु हलु खटले करण्याची आवश्यकता नाहींशी होत गेली. खटल्याच्या ऐवजीं पहिल्यानें राष्ट्र सभेच्या आणि आतां फक्त लोकसभेच्या मतांचा उपयोग होऊं लागला. प्रधान मंडळानें पुढें आणलेल्या प्रश्नांस लोकसभेचा पाठिंबा मिळाला नाहीं तर प्रधान मंडळास राजीनामा द्यावा लागतो. आणि

त्याने राजीनामा दिल्यावर राष्ट्रसभा राज्य व्यवस्थेचें अधिकार कोणाच्या हातीं द्यावयाचें तें आपल्या मना प्रमाणें ठरविते.

(२९) **कार्यकारी मंडळः**—राजा आणि त्याच्या औपचारिक अनुमतीनें नेमण्यांत आलेलें प्रधानमंडळ्यांचें मिळून कार्यकारी किंवा अंमल बजावणी करणारें मंडळ बनतें, असें त्यांचें थोडक्यांत परंतु बरोबर असें वर्णउ करितां येईल. प्रधान हे कायद्या प्रमाणें राजाचे केवळ सल्लागार. राजाच्या नांवानें सर्व राज्यकारभार चालविण्यांत येतो. तरीपण खरी सत्ता प्रधान मंडळाच्याच हातीं असते. इंग्लण्डच्या राज्यपद्धतींत राजाचें खरें स्थान ह्मणजे सन्मान्य आणि पिढीजाद सल्लागाराचें. त्याची पदवी थोर, आणि राज्यव्यवस्थेच्या महत्वाच्या प्रश्नांशीं त्याचा निरंतर परिचय; यामुळें त्याच्या उपदेशास विशेष प्रकारचें महत्व प्राप्त होतें येवढेंच. राजा हा कायद्याच्या कल्पनेंत नसला तरी वस्तुस्थितींत एक कायमचा प्रधान आहे. तो प्रधान मंडळाप्रमाणें राष्ट्रसभेस जबाबदार नसतो इतकाच त्याच्यांत आणि इतर प्रधानांत फरक. तो जबाबदार नसतो, पण त्यामुळें प्रधानांपेक्षां त्याची सत्ताही कमी होते.

[(३०) अलिकडे राजा हा प्रधान मंडळाचा सभासद नसतो. कारण पहिल्या जॉर्ज राजाला इंग्रजी बोलतां येत नसे. तो गादीवर येण्यापूर्वी राजे नेहमी प्रधान मंडळाच्या सभांस हजर रहात. जार्जला प्रधानाची मसलत कळत नसे ह्मणून ह्मणा किंवा आपलें काय ह्मणणें आहे हें त्यांना समजावून सांगतां येत नसें ह्मणून ह्मणा तो सभांना हजर राहीनासा झाला. तेव्हांपासून कोणताच राजा प्रधान मंडळाच्या सभांस हजर राहिला नाहीं. वहिवाटी

पडतात कशा आणि कशा त्या पाळल्या जातात याचें या सारखेंच एक मजेदार उदाहारण अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत आढळतें. तेथील अध्यक्ष कांग्रेस ( राष्ट्रसभा ) मध्यें भाषण न करितां तिला लेखी निरोप पाठवितो. वॉशिंग्टन आणि जॉन ॲडम्स हे राज्य-कारणांच्या प्रश्नांवर राष्ट्रसभेंत भाषणें करीत. परन्तु तिसरा अध्यक्ष जेफरसन याला बोलतां येत नसे. त्याला आपलीं भाषणें लिहून पाठविणेंच सोइस्कर वाटे. झालें. त्याच्या मागून आलेल्या अध्य-क्षांनीं बोलतां येत असलें तरी त्याचाच कित्ता उचलला. आणि राज्य घटनेंत हा नियम अनुल्लंघनीय झाला. ]

**३१ प्रधान मंडळाची राज्यघटनेतील जागाः—** प्रधान मंडळांत मुख्य मुख्य प्रधानांचा समावेश होतो. त्याला आजकाल राज्यघटनेंत जें अधिकाराचें स्थल प्राप्त झालें आहे तें तें राष्ट्रसभेस जबाबदार असल्यामुळें. इंग्रजी राज्यघटनेच्या इतिहासां-तील मुख्य रहस्य, राष्ट्रसभेनें राज्य कारभार पहाणाऱ्या सर्व अधि-काऱ्यांवर आपलें वर्चस्व बसविण्याकरितां केलेल्या झगड्यांत आहे. या झगड्याचा अठराव्या शतकांत निकाल लागला, आणि राष्ट्र-सभा विजयी झाली. गेल्या शतकांत राष्ट्रसभा या झगड्यांतील अगदीं शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपली आहे. तो टप्पा हा कीं, राष्ट्र सभेची सत्ता लोकसभेच्या-साधारण जनतेच्या, हातांत संक-लित झाली. राष्ट्राच्या नांवानें राज्य कारभाराला दिशा लावण्याचा हक्क राष्ट्रसभा आपला नेहमींच सांगत आली आहे. हाच इतर सर्व अधिकारांचा भक्कम पाया होता. लोकसभेच्या रचनेंत सुधारणा झाली. तिला जनतेचें खरें प्रातिनिधिकत्व प्राप्त झालें. आणि त्या-बरोबर तिच्या हातांत उमराव सभेच्या हातांतील राज्यसत्तेचा

कांहीं भाग आपोआपच गेला. उमराव सभा प्रातिनिधिक तत्वावर रचलेली नव्हती. तिची उभारणी वंशपरंपरेच्या तत्वावर झालेली होती. शास्त्री (सायंटिस्ट) कारखानदार, वकील, वर्तमान पत्रकर्ते, कवी आणि राजकारणी पुरुष या सर्व वर्गांतून प्रसिद्धीस आलेल्या माणसांस उमराव बनवून त्यांची भरती सारखी उमराव सभेंत करण्यांत येत आहे हें खरें. परंतु, ती नेमणुकीनें, निवडणुकीनें नव्हें. तिच्या मतावर मतदार संघाचा ताबा नाहीं. आणि म्हणून राज्यकारभारांत लोकसभेला वर्चस्व प्राप्त होत गेलें, आणि तिचें वर्चस्व कमी होत गेलें. कारण, उघडच आहे कीं ज्यांच्यामागें राष्ट्राचा पाठिंबा. त्यांच्याच हातांत राज्यकारभाराची किल्ली.

**( ३२ ) प्रधान मंडळांतील प्रधानांची नेमणूकः—** प्रधान हे राष्ट्रसभेला जबाबदार असतात. त्यांच्या या जबाबदरींतच त्यांचें सामर्थ्य आहे. या जबाबदारीमुळें तें राष्ट्रसभेचे मुखत्यार बनले आहेत. आणि स्वाभाविक पणेंच मुखत्यारांना व्यवहारांत मुख्य सत्तेच्या अधिकारांचा बराच मोठा वांटा मिळतो. राजा प्रधान नेमतो तो अशानांच कीं ज्यांच्यावर लोक सभेचा विश्वास असेल. त्यांची नेमणूक करण्याची पद्धत अशी आहे. राजा लोकसभेंत ज्यापक्षाचें बहुमत असेल त्याच्या पुढाऱ्यास बोलावणें पाठवितो आणि त्याला प्रधान मंडळ तयार करण्यास सांगतो. आपण स्वीकारलेली जबाबदारी आपल्या पक्षास पसंत पडेल अशी त्याला खात्री असेल तर तो राजानें दिलेला अखत्यार स्वीकारतो. प्रायः हें तो आपल्या पक्षांतील इतर प्रमुख सभासदांचा सल्ला घेऊनच करतो. तोच आपल्या पक्षांतील इतर पुढाऱ्यांची निरनिराळ्या प्रधानपदांकरितां शिफारस

करतो. आणि राजाला त्यांची यादी देतो. मग राजा त्यांची नेमणूक करतो आणि त्यांस अखत्यारपत्र देतो. प्रधानांची निवड राष्ट्रसभेंतील दोन्हीं सभागृहांतील सभासदांतून करण्यांत येते. साधारणपणें त्यांची निवड करण्यांत येते ती त्यांनीं सभागृहांत नेतृत्व स्वीकारण्यांत दाखविलेल्या पात्रतेनें. दुसऱ्या शब्दांत असें ह्मणतां येईल कीं सभागृहांतील वादविवादांत चिकाटीनें विजय संपादन करून त्यांनीं स्वतःच आपल्याला निवडून घेतलेलें असतें. त्यांनां निवडून काढावें लागत नाहीं. ते लोकांच्या डोळ्यांपुढें नेहमीं उभेच असतात. स्वतःच्या प्रयत्नानें आणि अंगातील पात्रतेच्या जोरावर ते पुढें आलेले असतात. बहुधा ते ह्मणजे राष्ट्रसभेंत काम करण्यांत मिळविलेल्या हातखंडेपणाचें आदर्शच होत. अशा पात्रतेची प्रधान कींत यशस्वी होण्यांत आवश्यकता असते. कारण प्रधान मंडळांत शिरल्यावर ते वस्तुतः लोकसभेंतील प्रबल पक्षाचें एक आतर्मंडळच बनतात. आणि पुनः तें आंतर्मंडळ असें कीं त्याला राष्ट्रसभेंतील वादविवादांत आणि कायदेकरण्यांत पुढाकार घेण्याचा, सारासार विचार करून जाहिर करतां येतील तीं सर्व प्रकरणें राष्ट्रसभेस व तिचे मार्फत सर्व राष्ट्रास माहीत करून देण्याचा आणि जनतेच्या प्रतिनिधींनां* पसंत असलेलें धोरण राज्य कारभारांत उतरविण्याचा अखत्यार दिलेला आहे.

**( ३३ ) प्रधान मंडळाची रजचना:**—सर्वच प्रधानांचा प्रधान मंडळांत समावेश होत नाहीं. इंग्रजी राज्यघटनेंत कॅबिनेट आणि मिनिस्ट्री हे दोन शब्द समान अर्थक आपण त्याला मंत्रि.

मंडळ ह्मणूं–नाहींत. मिनिस्ट्री–ह्मणजे सर्व मंत्र्यांचा समुच्चय. या शब्दाची व्याप्ति कॅबिनेट किंवा प्रधानमंडळ या शब्दाच्या व्याप्ती पेक्षां मोठी आहे. मंत्रिमंडळांत राष्ट्रसभेंत बसण्याचा ज्यांनां अधिकार आहे अशा सर्व कार्यकारी प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश होतो. निरनिराळ्या खात्यांतील सरकारी अधिकाऱ्यांस–कायम नोकरांस–राष्ट्रसभेंत बसतां येत नाहीं. प्रत्येक मंत्री राजकीय अधिकारी असतो. मंत्र्यांची निवडणूक बहुमतपक्षाच्या सभासदांतून केलेली असते. त्या सर्वांचाच जरि प्रधान मंडळांत समावेश होत नाहीं तरि, प्रधान मंडळाचा पराभव झाला कीं प्रधान मंडळाबरोबर त्या सर्वांनाच राजीनामा द्यावा लागतो. लॉर्ड सॅलिस्बरीच्या प्रधान मंडळांत ( १८९७ ) एकोणीस सभासद होते. परंतु प्रधान मंडळांत समाविष्ठ न झालेले असे मंत्री राष्ट्र सभेंत चाळीस होते. १९१७ सालीं प्रधान मंडळांत २७ प्रधान होते परंतु मंत्रिमंडळांतील एकंदर मंत्र्यांची संख्या १६८ होती. आणि १९१८ सालीं तर ती २८५ वर गेली आहे.

[( ३४ ) प्रधान मंडळांतील प्रधानांची संख्या नियमित नाहीं, प्रधान मंडळांत ज्यांचा समावेश झालाच पाहिजे असे प्रधान अनेक आहेत. ते प्रधान ह्मणजे फर्स्ट लॉर्ड ऑफ दि ट्रेझरी. ( कोषाध्यक्ष ) चॅन्सेलर ऑफ एक्स्चीकर, ( पंत अमात्य ) दि लॉर्ड चॅन्सेलर ( न्यायाधीश ) दि फर्स्ट लॉर्ड ऑफ दि ॲडमिरालिटी ( आरमाराधिपति ) आणि पांच स्टेट सेक्रेटरी ( आंतर्गत व्यवस्था, परराष्ट्रीय व्यवहार, वसाहती, हिंदुस्थान आणि युद्ध या प्रत्येकीं एक ). लॉर्ड प्रेसिडेन्ट ऑफ दि कौन्सिल ( खासगत सलागार मंडळाचा अध्यक्ष ) आणि लॉर्ड प्रिव्हि-

सील ( राजमुद्रा रक्षक ) या दोन मंत्र्यांस नेहमींच प्रधान मंडळांत घेण्यांत येतें. त्यांच्या हाताखालीं कोणतेंही सरकारी खातें नसतें. वस्तुतः ते प्रधान मंडळाचे सन्मान्य सभासदच असतात. परिस्थित्यनुरूप साधारणपणें आणखी दहा प्रधानांची त्यांत भर पडते. उदाहरणार्थ स्कॉटलंडचा चिटणीस आणि आयर्लंडच्या लॉर्ड लेफ्टेनंटचा मुख्य चिटणीस, व्यापार, शिक्षण, स्थानिकस्वराज्य आणि शेतकीच्या मंडळांचे अध्यक्ष, लँकॅस्टरच्या जहागिरीचा कारभारी, पोस्टमास्तर जनेल, ॲटर्नि जनरल आणि सार्वजनिक कामांचा ( वर्क्स ) मुख्य अधिकारी लढाई सुरू झाल्यापासून तर दारूगोळा आणि विमानें यांकरितांही निरनिराळ्या मंत्र्यांस प्रधानमंडळांत घेण्यांत आलें आहे. असा साधारण नियम आहे कीं, लोकसभेपुढें ज्या ज्या खात्यांच्या हितसंबंधाचे प्रश्न वादविवादासाठीं किंवा कामासाठीं प्रामुख्यानें येणार त्या त्या खात्यांच्या वतीनें बोलण्यास आणि सभागृहास जवाबदारीचा असा सल्ला देण्यास प्रधान मंडळांत प्रधान पाहिजे. कधीं कधीं एकाच प्रधानाकडे दोन जागाही असूं शकतात. १९१०–११ सालीं मार्किस ऑफ क्यू हे हिंदुस्थानचे हुजूर चिटणीस आणि मुद्रारक्षक होते. पंत प्रधान ॲस्क्विथ हे १९१४ सालीं मुख्य खजिनदार असून युद्ध मंत्री होते आणि सांप्रतचे पंत प्रधान लॉइड जार्ज हे पंत अमात्याचें आणि युद्ध साहित्य मंत्र्याचें अशी दोन्ही कामें करीत होते.

( ३५ ) लोकसभेच्या कोणत्याही सभासदास त्याला निवडून देणाऱ्या मतदार संघाच्या मान्यतेखेरीज प्रधानपद स्वीकारतां येत नाहीं. त्याला, प्रधान पदावर नेमणूक झाल्यावर लोकसभेंतील

आपल्या सभासदत्वाचा राजीनामा द्यावा लागतो. आणि प्रधान आणि प्रतिनिधि या जोड नात्यानें पुनः निवडून यावें लागतें. एक प्रधान पद चालू असतां किंवा तें सोडून दुसरें घेतानांही अशा तऱ्हेची फेर निवडणूक झाली आहे. पंत प्रधान ॲस्क्विथ साहेब यांनीं खजीनदार असतां युद्ध मंत्री होतांनां राजीनामा देऊन पुनः निवडणूक करवून घेतली. बहुधा हा सर्व विधि केवळ औपचारिक असतो. सहसा विरुद्ध पक्ष निवडणुकींत विरोध करीत नाहीं. १८४६ सालीं मात्र ग्लॅडस्टन साहेब वसाहत मंत्री झाले त्यांवेळीं फेर निवडणुकींत ते निवडून आले नाहींत.

( ३६ ) राजानें फक्त पंत प्रधानाचीच नेमणूक करावयाची आणि मंत्रि मंडळ तयार करण्याचें काम त्यावरच सोपवावयाचें. त्या प्रमाणें त्यानें प्रधान मंडळाच्या बैठकींस कधीं हजरही रहावयाचें नाहीं; हे प्रघात पहिल्या जॉर्जच्या कारकीर्दींत सुरू झाले. त्याला सर्व प्रधानांची नेमणूक करण्यासारखी इंग्लंडांतील राजकारणांत पडलेल्या माणसांची पुरेशी माहिती नव्हती. तेव्हां साहजिकपणेंच हें काम त्याला वॉलपोलवरच सोंपवावें लागलें.]

( ३७ ) प्रधान मंडळाची रचना करण्याची ही जी पद्धति अमलांत आली ती राजाचे प्रधान पूर्णपणें आपल्याला जबाबदार करण्यासाठीं राष्ट्र सभेनें केलेल्या प्रयत्नांचें फळ आहे. राष्ट्र सभेंतील प्रबल पक्षाचें आपल्याच सभासदांतून निवडलेल्या प्रधानांशींच जुळणार आणि प्रधानांना राष्ट्रसभेच्या दोन्ही गृहांस आपलें धोरण समजावून द्यावयाचें व त्याचें समर्थन करावयाचें असल्यामुळें व त्यांत चूक झाली असल्यास संभाळून घेण्यास विनंति करावयाची

असल्यामुळें ते पार्लमेंटाचे सभासद असून त्यांनां त्याचे सर्व हक्क असावेत हेंच उत्तम. प्रत्यक्ष आणि उघडाउघडी व्यवहाराच्या या एकाच व्यवस्थेनें राष्ट्रसभा आणि प्रधान यांच्यांत पूर्ण सलोखा राहणें शक्य आहे.

**( ३८ ) प्रधानांची जबाबदारीः**—कोणत्याही महत्वाच्या प्रश्नावर मंत्र्यांचा लोकसभेंत पराभव झाला किंवा त्या सभागृहांत त्यांच्यावर टपका ठेवणारा ठराव मंजूर झाला तर त्यांनां राजीनामा द्यावा लागतो. ( हा वहिवाटीचा नियम आहे. ) आणि राजाला बहुमताला मान्य असें दुसरें मंत्रिमंडळ बनवावें लागतें. सर्व मंत्र्यांना एकदम राजीनामा द्यावा लागतो याचें कारण असें आहे कीं, त्यांच्या कृत्यांचा संकलित स्वरूपानें विचार करण्यानेंच त्यांच्या जबाबदारीला किंमत आली आहे. अंमल बजावणीच्या कृत्याबद्दल टपका ठेवला असतां किंवा मंत्रि मंडळानें पुढें आणलेला किंवा पुरस्कार केलेला प्रश्न अमान्य करण्यांत आला असतां, ज्यांच्या खात्याशीं त्या प्रश्नाचा संबंध होता त्याच प्रधानांस बाहेर टाकून प्रधानमंडळ तसेंच कायम राखतां आल्यास राष्ट्रसभेच्या खऱ्या सत्तेची फसवणूक करितां येईल. टपका आलेल्या किंवा पराभव झालेल्या मंत्रिमंडळास जर असें वाटेल कीं, त्याच्या विरुद्ध पडलेल्या मतांत मतदार संघांच्या विचारांचें खरें दिग्दर्शन झालेलें नाहीं, तर त्यास राजाला राष्ट्रसभा बरखास्त करून नवीन निवडणूक करण्याचा सल्ला देतां येतो. राजानें हा सल्ला ऐकिलाच पाहिजे. नवीन निवडून येणाऱ्या लोकसभेच्या कलावर मंत्रिमंडळ टिकणार कीं पडणार हें अवलंबून राहील.

[ ( ३९ ) येथें हें नमूद करून ठेवलें पाहिजे कीं केव्हां केव्हां असे अपवादात्मक प्रसंग येतात कीं, आक्षेपार्ह कृत्यांची जबाबदारी सरळ आणि स्पष्टपणें एखाद्या विशिष्ट प्रधानावर टाकतां येईल. त्यानें आपल्या सहकाऱ्यांच्या विचाराखेरीज, वेळेवर त्यानां न कळवितांही तें कार्य केलें असेल अशावेळीं त्याला एकट्यालाच त्याच्या कामावरून दूर करणें हाच योग्य उपाय ह्मणून मान्य करण्यांत आला आहे. अशा तऱ्हेचें एक प्रसिद्ध उदाहरण १८५१ सालीं घडलें. परराष्ट्रीय मंत्री लॉर्ड पामरस्टन यास आपल्याच जबाबदारीवर केलेल्या निरनिराळ्या कृत्यांत, फ्रान्सांत लुई नेपोलियननें नॅशनल असेंब्ली ( राष्ट्रसभा )त अकल्पित घडवून आणलेल्या क्रांतीला, इतर प्रधानांच्या विचाराखेरीज पसंती दर्शविण्याची भर घातल्यावरून, प्रधानपदावरून दूर करण्यांत आलें.

**( ४० ) प्रधानमण्डळाचें कायदेशीर स्थळः**— कायद्याच्या दृष्टीनें प्रधानमंडळाला कोणतें स्थळ आहे हें पाहिलें कीं, त्याची उत्पत्ती इतिहासांत कशी विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे तें दिसून येतें. ती कायद्यानें मान्य केलेली संस्था नाहीं. आंग्लस्थानांतील इतर पुष्कळ राजकीय संस्थांप्रमाणें तिचें अस्तित्व वहिवाटीवर अवलंबून आहे. मुख्य प्रधानमण्डळांत समाविष्ट झालेल्या विशिष्ट मन्त्र्यांस राजाला सल्ला देण्याचा जो कुल अखत्यार आहे—राज्यकारभारांतील खरी सत्ता हीच—तो केवळ प्रिव्हि कॉउन्सिलच्या सभासदत्वानें प्राप्त झालेला आहे. राजाच्या विश्वासांतील नोकर ह्मणून प्रधानपदावर रुजू होण्यापूर्वी त्या सर्वांना प्रिव्हि कौन्सिलच्या सभासदत्वाची शपथ घ्यावी लागते. आज दोन शतकें झालीं प्रिव्हि कौन्सिलचा सल्ला मात्र सर्व सभासदांच्या

सभेंत असा कधींच घेण्यांत आला नाहीं. त्याचे सभासद ह्मणून बारा किंवा पंधरा प्रधान जो कारभार करितात त्यांत तें डुंकूनही पहात नाहीं. त्या प्रधानांनीं दिलेल्या सल्ल्याची जबाबदारी त्याच्यावर नाहीं. त्या सल्ल्यावर, तो आपल्या विचारानें देण्यांत यावा असा तावा त्यास ठेवतां येणार नाहीं. पुनः, प्रिव्हि कौन्सिलच्या सभासदांची मुदत तहाहयात असते. लोकसभेंतील अल्प मतपक्षाचे पुढारी, एकदां केव्हां तरी प्रधान असल्या कारणानें प्रधानकी गेल्यानंतरही त्याचे सभासद असतात आणि राजाला सल्ला देण्याचा त्यांनांही कायद्यानें हक्क आहे. ]

**( ४१ ) प्रधानमंडळाचा कायदे सुचविण्याचा अधिकारः**—पूर्वी कायदे तयार करून पार्लमेंटापुढें मांडण्याचा अधिकार राजाला होता. पुढें तो त्याच्या हातांतून प्रधानमंडळाच्या हातीं आला. आतां राष्ट्रसभेचे प्रधानच सभागृहांतील कामकाजाची मांडणी करितात व तेच त्याला दिशा लावून देतात. प्रधान मंडळानें शिजवून पुढें मांडलेल्या कामकाजाचा विचार करण्यांतच पार्लमेंटाचा बहुतेक वेळ व्यापला जातो. सभागृहांतील कामकाजाला हरएक ठिकाणीं वळण लावून देऊन त्याचा मार्ग सुलभ करणें हें काम मंत्र्यांचें आहे.

[ **( ४२ ) मुख्य प्रधानः**—मुख्य प्रधानाच्या सत्तेखालीं प्रधान मंडळाची रचना झाल्यामुळें धोरणांत कायमपणा आणि अंमलबजावणींत जोर उत्पन्न होतो. दुसरी वाटेल ती जागा आपल्या हातांत ठेवण्याची मुख्य प्रधानास मुभा असली तरी साधारणपणें तो कोषाधिकाऱ्याची जागा आपल्या हातांत ठेवतो. प्रधानमंडळांत त्याला जें प्रामुख्य प्राप्त होतें तें विशिष्ट प्रधानपदा-

मुळें नव्हे, तर त्याच्या पक्षानें मान्य केलेल्या त्याच्या नेतृत्वानें आलेल्या वजनानें होय. प्रधानमंडळ तयार करण्यासाठीं राजानें निवडलेला पुढारी तें तयार झाल्यावर स्वाभाविकपणेंच त्याचा प्रमुख बनतो. तो बहुधा जी कोपाधिकाऱ्याची जागा पतकरितो ती त्या जागेला तात्पुरतेंच काम असल्यामुळें, सत्ताधारी पक्षाचा पुढारी या नात्यानें त्याला जें महत्वाचें काम करावयाचें असतें त्याला मोकळिक सापडते म्हणून. ]

**( ४३ ) निरनिराळीं अंमलबजावणी खातीं**—येथवर प्रधानमण्डळाचा, राजा आणि राष्ट्रसभा यांच्याशीं कसा संबंध आहे याचें विवेचन झालें. इंग्रजी राज्यसत्तेची अंमलबजावणी त्याचे मार्फत होते. तेव्हां आतां कायद्याची अंमलबजावणी करणारी व राज्यसत्ता चालविणारी संस्था या दृष्टीनें त्याचें अवलोकन करूं. इतर सरकारांप्रमाणें त्यांतील प्रधानही निरनिराळ्या खात्यांवरील मुख्य अधिकारी आहेत. परन्तु त्यांच्या हाताखालील खात्याचें इतर देशांतील खात्यांप्रमाणें साधें, सरळ आणि थोडक्यांत असें वर्णन देतां येणार नाहीं. आज दिसणारी रचना, इतर देशांतील खात्यांना तर्कयुक्त आणि सुसंबद्ध अशा लेखी घटनेनें प्राप्त झालेली आहे. परन्तु इंग्लण्डांतील या खात्यांच्या मागें आंग्लसंस्थाविशिष्ट बहुसन्धी वाढींच्या हजार गुंतागुंती दडल्या आहेत.

**( ४४ ) पांच बड्या हुजूरकचेऱ्याः**—तपशिलांत न शिरतां इंग्रजी राज्यांतील मध्यवर्ती सरकारची बरीचशी स्पष्ट रूपरेखा त्यांतल्यात्यांत थोडक्यांत सांगणें शक्य आहे. 'खजिन्या' चें वर्णन निराळ्या कलमांत करण्यांत येईल ( कं. ५२ ) राष्ट्रीय किंवा अंतर्गत कारभाराची कचेरी ( होम आफिस ) पोलिस

खात्यावर देखरेख ठेवते; ठराविक मर्यादेपर्यंत फौजदारी खातें आणि तुरुंगांची व्यवस्था यांवर लक्ष्य ठेवते; माफी देण्याचें बाबतींत राजाला सल्ला देते; आणि ती कांहीं विवक्षित प्रसंगीं मजुरांस कामावर लावण्यासंबंधीं निर्बंध घालणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचें राष्ट्रसभेच्या हातांतील एक साधन आहे. परराष्ट्रीय कचेरीचें वर्णन करण्यास तें नांवच पुरें आहे. त्याच-प्रमाणें बसाहत कचेरी, लष्करी कचेरी आणि हिंदुस्थान कचेरी यांच्याही नांवावरून त्यांच्या स्वरूपाचा पुरेसा बोध होतो.

[ ( ४५ ) हुजूर चिटणिसाची जागा तिसऱ्या हेन्रीच्या कारकीर्दींत निर्माण करण्यांत आली. त्यावेळीं चिटणीस हा राजाच्या तैनातीला नोकर होता. त्याला राजकीय महत्व नव्हतें. पंधराव्या शतकांत शिक्का मोर्तब करण्याचें काम त्याचेकडे देण्यांत आलें. ट्यूडर राजांच्या अमलाखालीं तो महत्वाचा राजकीय अधिकारी झाला. त्याचें काम इतकें वाढलें कीं, १४३३ मध्यें दोन चिटणीस नेमण्यांत आले. त्यांच्याकडील तैनातीकामें काढून टाकण्यांत आलें. प्रसिद्ध माणसांची त्या जागेवर नेमणूक करण्यांत येऊं लागली. ते आपल्या जागेच्या अधिकारानें खास-गत सल्लागार मंडळाचे सभासद झाले. इलिझाबेथच्या कार कीर्दींत त्यांनां हुजूर चिटणीस ( सेक्रेटरी ऑफ स्टेट ) ही पदवी-प्राप्त झाली. १७०७ ते १७४६ पर्यंत स्कॉटलंडकरितां आणि १७६८ पासून १७८२ पर्यंत वसाहतींकरितां तिसरा चिटणीस नेमण्यांत आला होता. तरी साधारणपणें अठराव्या शतकाच्या शेवटापर्यंत दोनच चिटणीस असत. १७९४ सालीं फ्रान्सांतील राज्यक्रान्तीमुळें स्वतंत्र लष्करी चिटणीस नेमणें आवश्यक झालें.

१८०१ सालीं वसाहतींचें काम त्याच्याकडेच सोंपविण्यांत आलें. तें त्याच्याकडे क्रिमियाच्या युद्धापर्यंत ( १८५४ ) होतें. तेव्हां लष्करी व वसाहती असे दोन निरनिराळे चिटणीस झाले. १८५८ सालीं हिंदुस्थान, कंपनी सरकारच्या हातून राणी सरकारच्या हातीं गेला तेव्हां हिंदुस्थानाकरितां निराळा चिटणीस नेमण्यांत आला. आतां पांच हुजूर चिटणीस नेमण्यांत येतात. कायद्याच्या दृष्टीनें ते सर्व एकाच जागेचें काम पहातात. त्यांनां आपआपसांत कोणाचेंही काम करण्याचा अधिकार आहे. पण व्यवहारांत प्रत्येकाचें खातें निराळें आहे. राष्ट्रीय हुजूर चिटणीस हा त्यांच्यांत मुख्य आहे. राजाच्या चिटणिसांतून उत्पन्न झालेले हे पांच हुजूर चिटणीस ह्मणजे उत्क्रांतीचें मनोवेधक आणि वैशिष्ट्य दर्शक असें उदाहरण आहे. या पांच हुजूरचिटणिसांकरितां राष्ट्रमंत्री, परराष्ट्रीय मंत्री, युद्धमन्त्री, वसाहतमन्त्री व भारतमंत्री हे शब्द वापरण्यांत येतात. युद्ध सुरू झाल्यावर विमानमंत्री ही सहावी चिटणिशी जागा निर्माण करण्यांत आली आहे. ]

( ४६ ) **दर्यासारंग कचेरीः**—इंग्रजी आरमाराची उत्पत्ति आल्फ्रेडशीं जोडण्यांत येते. तो ९०० च्या सुमारास मृत्यु पावला असावा. तरीपण चौदाव्या शतकापर्यंत इंग्लण्डांत कायमचें आरमारी खातें नव्हतें. आरमार गोळा करण्याची जरूरी पडे तेव्हां आरमारी अधिकारी नेमण्यांत येत. १३०६ सालीं पहिल्या एडवर्ड राजानें किनाऱ्याचें रक्षण करण्यासाठीं तीन दर्यासारंग नेमले. सांप्रतच्या आरमाराच्या कायद्याचें बीज पांचव्या हेन्रीच्या ( १४१३-२२ ) कायद्यांत आहे. १७०८ सालीं दर्यासारंगमंडळ, आरमारमंडळ, मोदीखानामंडळ, आणि आरमारी खजीनदार अशीं चार निरनिराळीं खातीं निर्माण करण्यांत आलीं. १८३२

सालीं दुसरें व तिसरें खातें बंद करण्यांत आलें. आणि १८३५ सालीं खजीनदारही काढून टाकण्यांत आला. आतां सर्व काम दर्यासारंग कचेरीकडेच देण्यांत आलें आहें. या मंडळांत मुख्य सरदार ( फर्स्ट लॉर्ड ) चार आरमारी सरदार, एक मुलकी सरदार, एक जमाबंदी चिटणीस आणि एक राष्ट्रसभेंत काम करण्याकरितां चिटणीस असे सात सभासद असतात. मुख्य सरदार हा मंडळाचा अध्यक्ष असून प्रधानमंडळाचा सभासद असतो.

**( ४७ ) व्यापार मंडळः**—व्यापार मंडळाची उत्पत्ति दुसऱ्या चार्लस राजानें स्थापलेल्या व्यापारी आणि वसाहती सल्लागार मंडळांत आहे. त्या दोहोंमेंही १६७२ सालीं एकीकरण करण्यांत आलें. १६७५ सालीं तीं नष्ट झालीं. १६९५ सालीं या जोडमंडळाची पुनर्घटना करण्यांत आली. पण तें खर्चाचें आणि निरुपयोगी वाटल्यावरून १७८१ सालीं मोडण्यांत आलें व त्याच्या ऐवजीं खाजगी सल्लागार मंडळाची एक कमिटी नेमण्यांत आली. प्रत्येक कारकीर्दीच्या सुरुवातीस खाजगी सल्लागार मंडळाच्या हुकुमानें त्याची पुनर्रचना करण्यांत येते. या मंडळांत अध्यक्ष आणि विशिष्ट मंत्रिपदानें आपोआप स्थान प्राप्त होणारे दुसरे कांहीं सभासद असतात. त्याचा अध्यक्ष प्रधानमंडळाचा सभासद असतो. त्यांत कोषाधिकारी, पंत अमात्य, मुख्य हुजूर चिटणीस, लोकसभेचा अध्यक्ष, आणि कँटरबरीचा मुख्य धर्माध्यक्ष यांचाही समावेश होतो. पण ते नांवाचेच सभासद. त्याचा खासगी सल्लागार मंडळाशी असलेला संबंध कधींच सुटला आहे. त्याचें कामही सर्व सभासदांच्या विचारानें चालत नाहीं. त्याचा अध्यक्ष म्हणजेच व्यापार मंडळ. त्याचें काम आणि त्याचे अधिकार विस्तृत

असून महत्वाचे आहेत. तें इतर सर्व खात्यांनां व्यापारी बाबतींत सल्ला देतें. सर्व राज्याला आंकड्यांच्या आधारावर देश स्थितीची माहिती देणाऱ्या संघाचें काम करतें. तें सरकार तर्फे रेल्वेवर देखरेख करतें. उतारूंच्या व मालाच्या आगबोटींची तपासणी करतें. व्यापारी जहाजांवरील मुख्य व दुय्यम अधिकाऱ्यांची परीक्षा घेऊन त्यांची नेमणूक करतें. बंदरें, दीप गृहें, आणि बंदर वाटाडी यांच्या बद्दलच्या कायद्यांची अंमलबजावणी करतें. योग्य मापांचा पुरवठा करतें. टांकसाळीवर देखरेख करतें आणि टपाल खात्यावर लक्ष्य ठेवतें.

**( ४८ ) स्थानिक स्वराज्य मंडळः**—स्थानिक स्वराज्य मंडळाची स्थापना १८७१ सालीं करण्यांत आली. तेव्हां स्वराष्ट्रीय हुजूर चिटणिसाचें, स्थानिक स्वराज्याचें, खासगत सल्लागार मंडळाचें, आरोग्यविषयक आणि गरिबांच्या सोयीच्या कायद्यानें अस्तित्वांत आलेल्या भिक्षेकरी मंडळाचें, सर्वच काम त्याचेंकडे सोंपविण्यांत आलें. तेंही दिसायला खासगी सल्लागार मंडळाची कमिटी असलें तरि त्यालाही कमिटीचें किंवा मंडळाचें असें स्वरूप मुळींच नांहीं. तें अगदीं निराळें आणि स्वतंत्र खातें असून त्याची सत्ता त्याच्या अध्यक्षाच्या हातांत आहे. हा अध्यक्ष प्रधान मंडळांचा सभासद असतो. खासगी सल्लागार मंडळाचा अध्यक्ष पांच हुजूर चिटणीस, राजमुद्रारक्षक, आणि पंतअमात्य हेही त्या मंडळाचे सभासद असतात. पण ते नुसते नांवाचें. त्याच्या कामकाजांत ते कधींच आंग घालीत नाहींत. त्याच्या कामाकडे पाहिलें तर तें इतर देशांतील आंतर्व्यवस्थेच्या ( इन्टरनल ) खात्यासारखें आहे. राज्यांतील स्थानिक स्वराज्यसंस्था आरोग्य-

विषयक आणि गरीबांस मदत करण्याच्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याची आपली कामगिरी कशी करितात यावर देखरेख करण्याचें काम त्याचें आहे. देशांतील सुराज्याच्या दृष्टीनें दुसऱ्या कोणत्याही खात्यांतील कामापेक्षां हेंच काम अधिक महत्वाचें आहे. तें खाजगी हितसंबंधांवर ज्यांचा परिणाम घडेल अशा कायद्यांचा विचार करून त्यांवर रिपोर्ट करण्याचेंही काम करतें.

[ ( ४९ ) **कृषिमंडळः**—१८८९ साली हें खातें निर्माण करण्यांत आलें. त्याची रचना जरि मंडळात्मक आहे तरि वस्तुतः त्याची व्यवस्था त्याच्या अध्यक्षाच्याच हातांत असते. तो प्रधानमंडळाचा सभासद असतो. १८८३ पासून राज्यांतील कृषिविषयक हितसंबंधांवर विशेष देखरेख करण्यासाठीं खासगी सल्लागारमंडळाची एक कमिटी नेमण्यांत आली होती. १८८९ सालीं तिची रचना ठाम करण्यांत येऊन तिचे अधिकार वाढविण्यांत आले व तिला कृषिमंडळ हें नांव प्राप्त झालें. खासगत सल्लागार मंडळाचा अध्यक्ष, खजिन्याचा मुख्य आखत्यारी ( फर्स्ट कमिशनर ऑफ ट्रेझरी ) पंत अमात्य, लँकेस्टरच्या जहागिरीचा कारभारी आणि स्कॉटलंडचा चिटणीस हे त्याचे नामधारी सभासद असतात. त्याची सत्ता त्याच्याच अध्यक्षाच्या हातांत असते. तें शेतकीच्या उपयोगी पडेल अशी माहिती गोळाकरून छापतें. शेतकीच्या स्थितीची निरनिराळ्या कृषिकृतींची आणि रानांची जोपासना करण्याबद्दल माहिती मिळवितें आणि शोध लावतें; व अशी माहिती मिळविणारांस व शोध लावणारांस प्रोत्साहन देतें. हीं त्याचीं मुख्यकामें आहेत. त्याला आणखी किती तरी कामें करावीं लागतात. तें ज्या शाळांतून शेतकीचें शिक्षण देण्यांत येतें त्यांची

तपासणी करून त्यांस सरकारी मदत देतें. या पूर्वी जमिनीचे व सर्वोपयोगी कामांचें ( पब्लिक वर्क्स ) आखत्यारी जें काम करीत तें सर्व आतां त्यालाच करावें लागतें. तें गुराढोरांच्या संसर्गजन्य रोगांच्या कायद्यांची अमल बजावणी करतें. अशाच तऱ्हेचीं इतर पुष्कळ कामें त्याकडे आहेत.

**( ५० ) शिक्षण कमिटीः**--राष्ट्रसभेनें १८३० सालीं शिक्षणासाठीं दिलेल्या मदतीची व्यवस्था खजिन्यानेंच लावली. पण सालोसाल शिक्षणाचे काम वाढत चाललें. १८३९ सालीं बरीच रक्कम मदतीदाखल देण्यांत आली, तेव्हां शिक्षणाचे काम पाहण्यासाठीं स्वतंत्र खात्याची उणीव स्पष्टपणें भासूं लागली. त्याचवर्षी खासगी सल्लागार मंडळाची एक कमिटी स्थापून शिक्षणव्यवस्था तिच्या हातांत देण्यांत आली. शिक्षणखातें हें खासगी सल्लागार मंडळाची कमिटी असल्याकारणानें राष्ट्रसभेच्या कायद्याची त्याच्या स्थापनेला जरुरी लागली नाहीं. तें केवळ सल्लागार मंडळाच्या हुकुमानेंच अस्तित्वांत आलें. त्याचें कमिटीचे स्वरूप कायम आहे. तें स्वतंत्र खातें झालेलें नाहीं. लवकरच या कमिटीस शिक्षणखात्याचें स्वरूप प्राप्त झालें. १८५६सालच्या कायद्यानें या कमिटीस उपाध्यक्ष नेमण्याचा अधिकार मिळाला. त्याच्यावर खासगी सल्लागार मंडळाच्या अध्यक्षाचा जवळ जवळ नावाचा अधिकार असतो.

**( ५१ ) टपाल खातेंः**--हा व्यापारमंडळाचाच एक पोटविभाग आहे. त्याच्या शिरोभागीं पोस्टमास्तर जनरल हा असतो. टपाल खात्याच्या नेहमींच्या कामाखेरीज तारखात्यावरही त्याची सत्ता असते. टपाल खात्याची संचयोत्तेजक पेढीही ( सेव्हिंग बँक ) त्याच्याच देखरेखीखालीं आहे. ]

(५२) **खजिना**:-हें सर्वांत महत्वाचें खातें आहे. या खात्याच्या इतिहासांत इंग्रजी खात्याच्या उत्क्रांतीचे आणखी एक नमुनेदार उदाहरण आपणांस आढळेल. सुरवातील। खजिनदाराकडे वुइंचेस्टर येथील खजिन्याचें रक्षण करण्याचें काम होतें. पुढें जमाबंदी अधिकारी म्हणून जमावसुली करणाऱ्या अधिकाऱ्यांचें हिशेब तपासण्याचें काम त्याचेकडे आलें. तो जस्टिसिआर आणि चॅन्सेलर यांच्या हाताखालीं असे. पण पुढें चॅन्सेलरच्या कामाचे जमाबंदी आणि न्यायसंबंधी असे दोन विभाग होऊन पहिल्या कामा करितां फडणिसाची नेमणूक झाल्यामुळें व जस्टिसिअरची जागा अजीबात काढण्यांत आल्यामुळें तो स्वतंत्र झाला. पहिल्या एडवर्डच्या कारकीर्दीत त्याच्या हातांतील जमाबंदी काम काढून दुसऱ्या अधिकाऱ्याकडे देण्यांत आलें. तेंव्हापासून त्याचें महत्व वाढत गेलें. त्याला लॉर्ड हाय चॅन्सेलर ही पदवी मिळाली. आणि तोच राजाचा मुख्य मंत्री बनला. लवकरच त्याच्या जोडीला जमाबंदी प्रधान किंवा फडणीस देण्यांत आला. १६१२ सालीं त्याचें काम एका मंडळाकडे सोपवण्यांत आलें तरि सतराव्या शतकांत मधून मधून मंडळा ऐवजीं एकाच अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येत असे. १७१४ पासून मात्र हें काम नेहमींच मंडळाच्या हातांत आहे. या मंडळाला लॉर्ड हाय ट्रेझररचें काम पहाणारे लॉर्ड हाय कमिशनर्स असें म्हणत. आणि त्यांत खजिन्याचा मुख्य सरदार-कोषाध्यक्ष, फडणीस किंवा पंत अमात्य आणि आणखी तीन उपसरदार असे पांच सभासद असतात. १७११ पर्यंत या सरदारांची नेमणूक राजा कडून होत असे; पण तेव्हां पासून मुख्य खजिनदारच त्यांची

नेमणूक करतो. दुसऱ्या मंडळांप्रमाणें लवकरच या मंडळांतही उत्क्रान्तीला सुरुवात झाली. मंडळानें मंडळ या नात्यानें काम करण्याचें बंद केलें. त्याचें सर्व काम पंत अमात्याचें हातीं केंद्रित झालें. मुख्य सरदाराची-कोषाध्यक्षाची जागा १७६२ पासून पंतप्रधानानें जवळ जवळ नेहमींच आपल्या हातांत ठेवल्यामुळें तिचा सन्मान्य अध्यक्षत्वा खेरीज खजिनामंडळाशीं असलेला सर्व संबंध सुटला. मुख्य प्रधानानें आपल्यास राज्यकारभारास वाहून घेतलें आणि उपसरदारांकडे राष्ट्रसभेंतील कामाखेरीज दुसरें कांहीं उरलें नाहीं.

( ५३ ) **पंत आमात्य** हाच या मुळें खजिनदारी खात्याचा कार्यकारी प्रमुख अधिकारी बनला आहे. त्याच्याकडे या अधिकारामुळें महत्वाचें आणि ठळक असें काम आलें आहे. जमाबंदी आणि खर्च यावर त्याचा ताबा. निरनिराळ्या वसुली खात्यांकडून वसूल येईल किती आणि प्रत्येक खात्याला खर्चाची जरूरी किती लागेल याचें अंदाज पत्र तो तयार करतो. त्याच प्रमाणें चालू पद्धतीनें शिल्लक उरेल कीं तोटा येईल याचा अंदाज करून कर वाढवावेत कीं कमी कमी करावेत हें ही तोच सुचवितो.

[ ( ५४ ) **अन्दाजपत्रकें**:—निरनिराळीं खातीं आपलीं अन्दाजपत्रकें स्वतःच तयार करितात. फडणीस तीं काळजीपूर्वक तपासून पहातो. आणि जेथें दुरुस्ती करणें शक्य किंवा जरूर आहे तेथें ती करण्याचा त्याला अधिकार आहे. खात्यांतील कारकुनांच्या संख्येंत फरक करणें, त्यांच्या कामाची फेरवांटणी करणें वगैरे गोष्टीनां जर जादा खर्चाची जरूर लागेल तर त्यांस खजिनाखात्याची मंजुरी पाहिजे.

( ५५ ) आपल्या अंगच्या विशिष्ट उत्साह शक्तीच्या जोरावर मि. ग्लॅडस्टन यांनीं मुख्य प्रधान असतां दोनदां कोषाध्यक्ष आणि पंत अमात्य या दोनहीं जागांचें काम केलें आणि अशा रीतीनें प्रत्यक्ष व्यवहारांत पुनः एकदां मुख्य खजिनदाराचा आपल्या नांवाच्या खात्याशीं निकट संबंध जोडला. ]

**( ५६ ) खासगी सल्लागारमण्डळाचीं अंमलबजावणी खातीं:**—प्रधानमंडळानें प्रिव्हि कौन्सिलला सल्लागारमंडळ या नात्यानें नामशेप केलें आणि त्याच्या निरनिराळ्या मंडळाची स्वतंत्र खातीं उभारून त्याच्या हातांतील अंमलबजावणीची प्रत्यक्ष सत्ता हिसकावून घेतली. तरीपण त्याचे एकदोन अवयव अजून जिवट आहेत. त्यापैकीं मुख्य म्हटला म्हणजे शिक्षणखातें. सल्लागारमंडळाच्या न्यायदानासंबंधींच्या महत्वाच्या कामाबद्दल पुढें लिहिण्यांत येईल.

[ **( ५७ ) राजमुद्रारक्षक** ( लार्ड प्रिव्हिसील ) याचेकडे मुद्रेचें रक्षण करून ज्या सरकारी कागदपत्रांवर तिच्या औपचारिक शिक्क्याची जरूरी आहे त्यावर तिचा मोर्तब करण्यापलिकडे महत्वाचें असें काम असत नाहीं. परन्तु ती जागा प्रधानमंडळांतली आहे. त्या जागेवरील प्रधानाचें काम नांवाचें असल्यामुळें त्याला सल्लामसलतीच्या कामाला अधिक मोकळेपणा मिळतो. हें प्रधानपद म्हणजे ज्यांना फार दगदगीचीं कामें अंगावर घेण्याची शक्ति उरली नाहीं किंवा इच्छा नाहीं अशा बुद्धिमान आणि राजकारणपटु वजनदार गृहस्थांकरितां राखलेली जागा आहे. लॉर्ड चॅथॅम पंतप्रधान असतां त्यानें अशक्तपणामुळें याच पदाचें काम स्वीकारलें होतें. लॉर्ड मोर्लेसारख्या बुद्धिमान प्रधानाचा वार्धक्यांत याच जागेवर प्रधानमंडळांत संग्रह करितां आला.

(५८) **लँकॅस्टरच्या जहागिरदारीचा कारभारी** ज्या प्रधानपदावर असतो त्याची सर्व कामें केवळ स्थानिक आणि कायद्यासंबंधींच असतात. तींही फार दिवस चालत आलेल्या वहिवाटीनें दुय्यम कारभाऱ्याकडे सोंपविण्यांत आलेलीं आहेत. नांवाजलेल्या राजकारणपटूंस या नामधारी प्रधानपदामुळें प्रधानमण्डळांत घेऊन त्यांच्या सल्ल्याचा आणि कृपादृष्टीचा फायदा करून घेतां येतो.

(५९) **राजकीय दुय्यम चिटणीसः**—पुष्कळदां प्रधानांच्या हाताखालीं कांहीं दुय्यम चिटणीस देण्यांत येतात. या दुय्यम चिटणिसास त्याच्या पक्षाबरोबरच अधिकार मिळतो किंवा सोडावा लागतो. त्याचा प्रधानमंडळांत समावेश झाला नाहीं तरि त्याला प्रधानमण्डळाच्या नशिबाचें वांटेकरी व्हावें लागतें. राष्ट्रसभेंत तो आपल्या वरिष्ट प्रधानाचा मुखत्यार असतो. उदाहरणार्थ सुमंत ह्मणजे परराष्ट्रीय प्रधान अगर दुसरा एकादा प्रधान उमराव सभेचा सभासद आहे. त्याच्या खात्यांतील कामाकाजासंबंधानें लोकसभेंत वारंवार टीका करण्याचा किंवा प्रश्न विचारण्याचा संभव असेल तर लोकसभेंत त्याच्या वतीनें एकादा दुय्यम चिटणीस काम करितो आणि तेथें तो त्या प्रधानाचा मुखत्यार ह्मणून बोलतो. अशा रीतीनें दोन्ही सभागृहांत प्रधानांस आपल्या मुखत्यारांमार्फत काम करितां येतें. ]

(६०) **स्कॉटलंड व आयर्लंड यांचा राज्यकारभारः**—स्कॉटलंडचा राज्यकारभार स्कॉटलंडचा लॉर्ड ॲड्व्होकेट आणि स्कॉटलंडचा चिटणीस यांचे मार्फत चालतो. सरकारास लॉर्ड ॲड्व्होकेट हा स्कॉटलंडच्या हितसंबंधांत कायदेशीर सल्ला देतो. चिटणीस हा प्रधानमंडळ आणि राष्ट्रसभेंतील स्कॉटलंडचे सभासद

यांचे मधील सांखळी आहे. तो ह्मणजे स्कॉटलंडच्या कामांत प्रधान मंडळाचें लोकसभेंतील मुख्य होय! हुद्द्याचे दृष्टीनें लॉर्ड ॲडव्होकेटची जागा स्वराष्ट्रीय प्रधानाच्या हाताखालची आहे. आयर्लंडचें अंमल बजावणीखातें लॉर्ड लेफ्टेनंट व एक सल्लागार मंडळ यांच्या ताब्यांत असल्यामुळें दिसावयाला इंग्रजी खात्यापासून वेगळें आहे. परंतु वस्तुतः प्रधान मंडळाचीच लॉर्ड लेफ्टेनेंटाच्या मुख्य चिटणिसामार्फत त्यावर पूर्ण सत्ता आहे. हा चिटणीस नेहमींच लोकसभेचा सभासद असतो. आयर्लंडच्या प्रश्नांला प्रामुख्य येतें तेव्हां त्याचा प्रधान मंडळांत समावेश करण्यांत येतो. तो हुद्द्यानें लॉर्ड-लेफ्टेनंटाच्या हाताखालीं असला तरि प्रधान मंडळ आणि राष्ट्रसभा यांच्याशीं असलेल्या संबंधानें तोच लॉर्ड लेफ्टेनंटाचा धनी आहे.

[ ( ६१ ) महायुद्ध सुरू होण्यापूर्वी अल्स्टरमधील ६ परगणे वगळून बाकीच्या आयर्लंडास स्वराज्य देण्याचा कायदा पास झाला आहे. परंतु लढाईनंतर 'तहकुबीच्या कायद्यानें' ( सस्पेन्शन ॲक्ट ) पास झालेल्या कायद्याची अंमल बजावणी करण्याचें तहकूब ठेवण्यांत आलें आहे.

( ६२ ) **लॉर्ड चॅन्सेलर**—(न्यायमंत्री) प्रधान मंडळांतील या एका प्रधानाच्या कामाचें दिग्दर्शन अजून करण्यांत आलें नाहीं. तो कायद्याचा अधिकारी असून न्यायाधीश आहे. त्याच्या कामाचा उल्लेख पुढें ( क. १०० ) करण्यांत येईल. ]

( ६३ ) **प्रधान मंडळ आणि अंमलबजावणी**—प्रधान मंडळ हें केवळ लोकसभेची कमिटी आहे. त्याला प्राप्त झालेले अधिकार लोकसभेनें टाकलेल्या विश्वासामुळें आहेत, तरि

१८७९८

पण ‘ तें केवळ कमिटी वजाच आहे, ’ त्याला अंमल बजावणी करणारी संस्था या नात्यानें स्वतंत्र असें महत्व नाहीं, अशी कल्पना करणें चुकीचें होईल. एका अर्थी राजाचे पूर्वापार चालत आलेले अधिकार प्रधानांच्या हातीं आलेले आहेत. बऱ्याच अंशीं राष्ट्रसभेसच आपलें राज्यशासनाचें काम परिणामकारक व्हावयास त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून राहावें लागतें. महत्वाचे बहुतेक सर्व कायदे प्रधानांनीं सुचवीपर्यंत पडून राहतात. त्यांच्यावरच उभय सभागृहांतील कार्याची प्रगति बरीचशी अवलंबून राहते. त्यांना परराष्ट्रांशीं वाटेल तेवढ्या महत्वाचे तह करितां येतात. इंग्लंण्डच्या वसाहतींविषयीं धोरणाला हवें तसें वळण लावितां येतें. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत मना मानेल तो तीव्र उपाय योजतां योतो. मर्जीस वाटेल तेथें सैन्य आणि आरमार धाडतां येतें. इंग्लण्डच्या सत्तेखालील देश आणि परराष्ट्रें यांच्याबरोबरच्या धोरणांत ह्मणजे इंग्रजी साम्राज्याच्या अत्यंत मोठ्या अशा हितसंबंधाच्या विस्तृतक्षेत्रांत गंभीर स्वरूपाच्या पांचपंचवीस चाळवाचाळवी करितां येतात. आणि हें सर्व ज्या राष्ट्रसभेची ते नोकरी करतात तिचा सल्लाही न घेतां. थोडक्यांत सांगावयाचें तर लोकसभा त्यांना शासन करूं शकेल, परंतु तिला त्यांनां प्रतिबंध करितां येणार नांहीं.

**( ६४ ) राष्ट्रसभा ( १ ) लोकसभा, तिचें आरंभीचें स्वरूप.**—कायद्याच्या दृष्टीनें राष्ट्रसभा ह्मणजे उमराव सभा आणि लोकसभा. परंतु सरळ भाषेंत बोलावयाचें तर एकोणिसाव्या शतकांतील राष्ट्रसभा ह्मणजे केवळ लोकसभाच होय. एखादा प्रधान जेव्हां राष्ट्रसभेचा ह्मणून विचार घेतो तेव्हां तो फक्त लोकसभेचाच सल्ला मागतो. राजा जेव्हां राष्ट्रसभा बरखास्त

करितो तेव्हां तो फक्त लोकसभाच बरखास्त करितो. इंग्रजी राज्यकारणाची उत्क्रान्ति अशा तऱ्हेनें झाली आहे. पण ज्या क्रियेनें हा परिणाम घडवून आणला तिला पांचशें वर्षांपूर्वींच सुरवात झाली. फार काळपावेतों, म्हणजे राष्ट्रसभेच्या पहिल्या आणि घटनेच्या काळांत, लोकसभा स्पष्ट आणि स्वाभाविकपणेंच उमरावांच्या ताबेदारींत होती. राजा आणि जहागिरदार राज्यघटनेंतील महत्त्वाचें काम उरकीत. राष्ट्रसभेंतील मध्यम वर्गाचे सभासद हे शहरांचे प्रतिनिधी असत. आरंभीं ते बोलत तें फक्त करांच्याच बाबतींत. चौदाव्या शतकाच्या मध्यास राष्ट्रसभेच्या एकागृहानें जेव्हां लोकसभा हें नांव धारण करून आपल्या स्वतंत्र अस्तित्वाला सुरवात केली तेव्हां ती संस्था एकसंधी नव्हती. तींत परगण्यांतील सरदारबहादुर आणि शहरांतील स्वतंत्र नागरिक असे दोन पक्ष होते. आपण कोणत्या सभागृहांत बसावें, उमरावांच्या कीं साधारण जनतेच्या, हा सरदार बहादुरांच्या मनांतील किंतु जाण्यासच फार मोठा काल लोटावा लागला. आपआपल्या परगण्यांत तीं बडीं माणसें होतीं. शहरांतील प्रतिनिधींस आणि त्यांस साधारण अशी गोष्ट एकच. त्यांनां जें राष्ट्रसभेंत बसतां येत होतें तें निवडणुकीनें, वडिलार्जित मालमत्तेनें किंवा हुद्द्यानें नव्हे. खालच्या गृहांत बसणाऱ्या या दोन पक्षांतील भेदभाव फार दिवसांच्या वहिवाटीनें शेवटीं एकदां नष्ट झाला. त्यांना लवकरच दोघांचेही हितसंबंध एकच आहेत असें वाटूं लागलें. कारण, ज्या मुख्य प्रश्नांचा निकाल लावण्यांत त्यांच्या मताला अधिकार होता ते सर्व करांविषयीं असत. आणि त्यांचा संबंध जुन्या नांवालौकिकाचे असोत कीं, नवीन ऊर्जितावस्थेला आलेले असोत सर्वांशीं सारखाच होता.

**( ६५ ) परगण्यांचे व शहरांचे प्रतिनिधी**-लोकसभेला शक्य तितकें सार्वजनिक स्वरूप देण्यांत राजाचा मुख्य हेतु आपल्या राज्याला पाठिंबा मिळण्यासाठीं सर्व राष्ट्राला जुळेल तितकें राज्यकारभारांत घ्यावें हा असावा. सुरुवातीला लोकसभा खरोखरच प्रातिनिधिक होती. परगण्यांतील सरदार बहादुरांस परगणा कोर्टांत सर्व परगण्यांतील लोकांच्या एकमतानें निवडण्यांत येई. शहरांतील किंवा गावांतील प्रतिनिधींस तेथील स्वतंत्र लोक निवडून देत. ह्या मतदारांची संख्या मोठी असे कीं अगदीं नियमित असे हें ज्या त्या शहराला मिळालेल्या सनदेवर अवलम्बून राही. तरिपण साधारणतः मध्यम वर्गांतील सर्व नागरिकांचा समावेश होण्याइतकी ती मोठी असे. अठराव्या शतकाच्या शेवटीं आणि एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी लोकसभेनें लाजिरवाण्या रीतीनें जोहुकुमी व अप्रातिनिधिक होऊन अमेरिकेंतील वसाहतींस बंडांत लोटलें तें शहरांनां आलेल्या पडित स्थितीनें आणि मतदारीचे हक्क संकुचित झाल्यानें. सहाव्या हेन्रीच्या कारकीर्दीत ह्मणजे पंधराव्या शतकाच्या पूर्वार्धांतच मत देण्याचा हक्क ज्यांचें वार्षिक उत्पन्न चाळीस शिलिंग आहे अशा जमिनीच्या पूर्ण मालकांपुरताच नियमित करण्यांत आला. चाळीस शिलिंग उत्पन्नाच्या जमिनीचे स्वतंत्र मालक त्या काळीं चांगले सुखी लोक असत. कारण तेव्हांच्या चाळीस शिलिंगाची किंमत आज नव्वद पौंडावर गेली आहे. परन्तु मतदाराला आवश्यक असलेल्या उत्पन्नाचा हा नियम लोकसभेची सुधारणा होईतों ( १८३२ ) तसाच कायम राहिला. आणि सावकाश रीतीनें देशाच्या वाढत्या संपत्ती बरोबर आणि त्यामुळेंच शिलिंगाच्या

उतरत चाललेल्या भावाबरोबर, या नियमानें मतदारांची संख्या सढळ रीतीनें वाढूं लागली. विरुद्धपक्षीं गावांतील आणि शहरांतील मतदारीचा हक्क मात्र अधिकाधिकच निरुपयोगी होत गेला. तो जास्त जास्तच संकुचित होत चालला. लोकसभेंत प्रतिनिधी पाठविणारीं शहरें कांहीं अंशीं त्यांच्या ऱ्हासामुळें आणि कांहीं अंशीं वाढलेल्या आणि नवीन तऱ्हेनें फांकलेल्या लोकवस्तीमुळें प्रतिनिधी निवडण्यास नालायक होत चाललीं. मधुनमधून, वाढत असलेल्या नव्यानव्या शहरांस प्रतिनिधी निवडण्याचा हक्क देण्यांत येई. परन्तु ज्या काळांत लोकसंख्या दुणावली, धंद्यांची व संपत्तीची अजब वाढ झाली आणि इंग्लण्डला आजचें स्वरूप प्राप्त झालें त्याच्या अरुणोदयापूर्वींच प्रतिनिधींची नवीन वांटणी करण्याचे प्रयत्न बंद झाले होते. पूर्वीं वस्तीनें गजबजलेले गांव दक्षिणेंतील परगण्यांत असल्यामुळें लोकसभेंत प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क मिळालेलीं शहरें त्या भागांतच होतीं. राष्ट्रांतील लोकवस्ती मध्य आणि पश्चिम परगण्यांत लोटून लिव्हरपूल, मँचेस्टर आणि बर्मिंगहॅम हीं भरभराटूं लागल्याबरोबर हळुहळूं त्यांचें महत्व नष्ट होत गेलें होतें. त्यांचें महत्वच नव्हे तर त्यांचे रहिवासी ही नाहींसे झाले. कांहीं गांव पडित होऊन भोंवतालच्या इस्टेटींत गडप झाले. आणि त्यांच्या मालकांनीं ते गांव आणि त्यांचे मतदारीचे हक्क हीं दोन्हीही आपल्या खिशांत टाकलीं. जीं शहरें अगदीं अक्षरशः ऱ्हास पावलीं नव्हतीं, परन्तु ज्यांतील मतदारांस शेजारच्या बड्या लोकांवर थोडें बहुत अवलंबून रहावें लागे तींही या बड्या लोकांच्या ताबेदारींत सांपडलीं. सरते शेवटीं लोकसभेंतील निम्मेहून अधिक जागा वस्तुतः उमराव सभेंत ज्यांचे प्रतिनिधी बसत होते अशा जमीनदारांच्या ताब्यांत गेल्या.

[ ( ६६ ) १८०१ साली लोकसभेंत ६५८ सभासद होते. त्यापैकीं ४२५ सभासद, २५२ बड्या लोकांच्या नेमणुकीनें किंवा शिफारसीनें निवडून आले होते. असेंही सांगतात कीं इंग्लण्ड व वेल्सच्या ५१३ सभासदांपैकीं ३०९ सभासद खजिन्याच्या किंवा दीड पावणें दोनशें बड्या माणसांच्या नेमणुकीनें निवडून आले होते.

( ६७ ) **शहरें आणि परगणे यांचे भौगोलिक संबंधः**—शहरांतील लोकांस परगण्यांतील निवडणुकींत भाग घेतां येत नसे. लोकसभेंत ज्यांचे प्रतिनिधी असत ते परगणे ह्मणजे परगण्यांतील प्रतिनिधी निवडून देणारीं शहरें सोडून उरलेला भाग होय. अशा रीतीनें लोकसभेच्या निवडणुकीच्या दृष्टीनें डर्बी परगणा ह्मणजे शहरें सोडून बाकी उरलेला डर्बी परगण्याचा भाग ]

( ६८ ) **लोकसभेची सुधारणा**—या स्थितीवर उपाय ह्मणून गेल्या शतकांतील सुप्रसिद्ध सुधारणांचें काम हातीं घेण्यांत आलें. या सुधारणांनीं लोकसभा खरीखुरी राष्ट्रीय आणि प्रातिनिधीक बनविली आहे. त्यांनीं तिला राष्ट्रीय बनवितानां सर्वसत्ताकही केली आहे. १८३२ सालीं लोकसभेंतील प्रतिनिधींच्या जागांची फार मोठ्या प्रमाणांत नवीन वांटणी करण्यांत आली. पूर्वीं परगण्यांत मत देण्याचा हक्क फक्त जमिनीच्या स्वतंत्र मालकांसच होता. तो आतां पट्टेदार व कौल मक्तेदार आणि ज्यांच्या शेतीचें सालिना उत्पन्न ५० पौंड आहे अशा कुळांसहीं देण्यांत आला. शहरांत ज्यांच्या घरांचें भाडें दहा पौंड तरि येईल अशा सर्व घरवाल्यांस मत देण्याचा हक्क प्राप्त झाला. यामुळें निवडणूक खाऊनपिऊन सुखी अशा मध्यम वर्गाच्या ताब्यांत गेली आणि ती १८६७ पर्यंत तशीच कायम राहिली. १८६७ सालीं

जागांची फिरून एकदां फेरवांटणी करण्यांत आली. स्कॉटलंड-मधील प्रतिनिधींची संख्या चौपन्नावरून साठावर नेण्यांत आली. दुसरेही कांहीं फेरफार करण्यांत आले. याच वेळीं मतदारीचा हक्क अधिक विस्तृत व सुलभ करण्यांत आला. शहरांत सर्वच घरवाल्यांस आणि वर्षाचें निदान दहा पौंड भाडें देणाऱ्या भाडे-कऱ्यांस मत देण्याचा हक्क देण्यांत आला. परगण्यांत दोन पौंड उत्पन्नाच्या जमिनीच्या स्वतंत्र मालकांस, सालिना पांच पौंड उत्पन्नाच्या कौलमक्तेदारांस व पट्टेदारांस आणि बारा पौंड उत्प-न्नाच्या घरवाल्यांस मत मिळालें. शेवटीं १८८४त १९१८पर्यंत चालू असलेल्या मतदारीचा पाया घालण्यांत आला. १८६७ त शहरां-तील मतदारांस जी लायकी लागे तीच आतां परगण्यांतील मत-दारांसही पुरूं लागली. यामुळें देशांत राज्यव्यवस्थेशीं प्रत्यक्ष संबंध येणाऱ्या नागरिकांच्या संख्येंत पंचवीस लक्ष मतदारांची भर पडली. सर्व देशभर मतदारीची सरसहा एकच लायकी ठरविण्यांत आली. ती ह्मणजे सालिना दहा पौंड उत्पन्न किंवा दहा पौंड भाडें. याखेरीज जुन्या वहिवाटीनें कांहीं मत-दारांस हक्क मिळाला. उदाहरणार्थ लंडन शहरांतील कांहीं कंपन्यांचे नोकर. विद्यापीठांच्या पदवीधरांसही मत देण्याचा अधिकार होता.

[ (६९) हुद्दा किंवा नोंकरी यामुळें रहावयास मिळालेल्या घराचें भाडें दहा पौंड येण्यासारखें असल्यास त्या घरांत राह-णारांस भाडेकऱ्या प्रमाणेंच मताचा हक्क आहे. ]

(७०) १८८५ सालीं सभासदांच्या फेरवांटणीचा नवीन कायदा मंजूर करण्यांत आला. त्या कायद्यानें इंग्लण्डांतील

एक्यायशीं, स्कॉटलंडात दोन आणि आयर्लंडांत बावीस शहरें निवडणुकीसाठीं परगण्यांत सामिल करण्यांत आली. चौदा इंग्रजी, तीन स्कॉट व दोन आयरिश शहरांस नवीन प्रतिनिधी मिळाले. शहरांतून नवीन तेहतीस मतदारसंघनिर्माण करण्यांत आले. ज्या मोठ्या शहरांतून बरेच प्रतिनिधी निवडण्यांत येत असत त्यांत प्रत्येक प्रतिनिधी साठीं निरनिराळे भाग पाडण्यांत आले. त्याप्रमाणेंच परगण्यांत ही विभाग करून प्रत्येक विभागास एकएक सभासद देण्यांत आला. या घडामोडीं बरोबरच प्रतिनिधींच्या संख्येंत बारानीं वाढ करण्यांत आली. १८३२ आणि १८६७ या सालांतील फेरवांटणींत सभासदांची संख्या ६५८ च राहिली होती. ती १८८५ सालीं ६७० झाली.

[ (७१) **अनेकमत पद्धतिः**—ग्रेटब्रिटनमध्यें इतर देशांत चालू नसलेली अनेकमत पद्धति चालू होती. मताचा हक्क मिळण्यास आवश्यक असलेली मालमत्ता निवडणुकी साठीं केलेल्या ज्या ज्या विभागांत असेल त्या त्या विभागांत एकाच व्यक्तीस मत देतां येई. मत देण्यास समक्ष हजर असणें आवश्यक असलें तरि निवडणूक सर्व ठिकाणीं एकाच दिवशीं होत नसल्याकारणानें एकाच मतदारास वेगवेगळ्या ठिकाणीं हजर राहून वाटतील तितक्या उमेदवारांस मतें देतां येत. १९१८ सालच्या लोकप्रतिनिधींच्या कायद्यानें ही पद्धति बंद करण्यांत आली आहे.

(७२) १९१८ सालच्या स्टेट्समनच्या इयर बुकांत लोकसभेंतील सभासदांच्या जागांचे व मतदारांचें पृथक्करण पुढील प्रमाणें दिलेलें आहे.

| १९१८ | परगणे. | | शहरें. | | विद्यापीठें. | | एकूण. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद | मतदार | सभासद | मतदार | सभासद | मतदार | सभासद | मतदार |
| इंग्लण्ड. | २५३ | ३९७३८२८ | २३७ | २७७६११३ | ५ | २१३२३ | ४९५ | ६७७१२६४ |
| स्कॉटलंड. | ३९ | ५०३७१३ | ३१ | ३५५१८६ | २ | २६०१० | ७२ | ८८४९०९ |
| आयर्लंड. | ८५ | ५७५०११ | १६ | १२२३२६ | २ | ४१३८ | १०३ | ७०१४७५ |
| एकूण. | ३७७ | ५०५२५५२ | २८४ | ३२५३६२५ | ९ | ५१४७१ | ६७० | ८३५७६४८ |

( ७३ ) १८८४–८५ मधिल सुधारणांचा हा एक विशेष होताकीं नित्य वहिवाटीस सोडून इंग्लंड आणि वेल्स बरोबरच त्या स्कॉटलंड व आयर्लंड यांस ही लागू करण्यांत आल्या. पूर्वींचें सुधारणांचे कायदे फक्त इंग्लंड व वेल्स पुरतेच होते. स्कॉटलंड व आयर्लंड करितां मतदारीच्या हक्काचे व मतदार संघाचे निराळे कायदे असत. या सुधारणेपासून पहिल्यानेंच आयर्लंडच्या सभासदांस खरें प्रातिनिधिकत्व आलें आहे.

१८८५ च्या कायद्यानें मोठाल्या शहरांचे प्रत्येकसभासदां-करितां निरनिराळे विभाग करण्यांत आले त्यामुळें १८६७ सालीं अल्पसंख्यांक हितसंबंधांचे प्रतिनिधी निवडून येण्या-साठीं उत्पन्न केलेले त्रिकोणी ( थ्रीकॉर्नर्ड ) मतदारसंघ मोडून टाकण्यांत आले. ज्या विभागांतून दोहोंपेक्षां अधिक प्रतिनिधी निवडून येत असतील तेथील मतदारांस जितके सभासद निवडावयाचे असतात त्यांचेपेक्षां एक कमी मत द्यावें लागत असे. उदाहरणार्थ एकाभागांतून चार सभासद निवडावयाचे असतील तर प्रत्येक मतदारास तीनच मतें देतां येत. कल्पना अशी, कीं या व्यवस्थेनें अल्पमत संख्याकांनीं काळजी घेतल्यास त्यांनां चारांपैकीं एक प्रतिनिधि तरि निवडतां येईल. पण प्रत्यक्ष व्यवहारांत या व्यवस्थेचा उपयोग होईना आणि ह्मणून ती सोडून देण्यांत आली. ]

( ७४ ) १९१८ सालीं लोकप्रतिनिधींचा कायदा ( रिप्रिझे-न्टेशन ऑफ पीपल्स ॲक्ट ) पास करण्यांत आला असून त्यामुळें मतदार वर्गांत फारच मोठा फरक झाला आहे. हा कायदा पास होईतों स्त्रियांस लोकसभेंत सभासद होण्याचा हक्क नव्हता, इस-

केंच नव्हे तर त्यांस मतही देतां येत नसे. अतां त्यांना हे दोनही हक्क प्राप्त झाले आहेत. स्वराज्य संघाच्या कार्यकारी अध्यक्ष मिसेस ॲनी बेझंट या डिसेंबरांत होणाऱ्या निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभ्या राहिल्याही आहेत. १९१७ सालीं मतदारांची संख्या ८३ लक्ष होती ती या नव्या कायद्यानें १६० लक्ष झाली. यांतील १०० लक्ष पुरुष असून ६० लक्ष स्त्रिया आहेत. मतदारीचा हक्क मिळण्यास पुरुषाचें वय २१ वर्षांचें असून तो वर्षाला १० पौंड भाडें द्यावें लागण्यासारख्या घरांत रहात असला पाहिजे. ज्या भागांत तो मत देणार त्या भागांत नांव नोंदण्यापूर्वी तो तेथें सहा महिने तरि रहात असला पाहिजे. एकाच मतदाराला निरनिराळ्या भागांत मतें देतां येणार नाहींत. आतां एकाच व्यक्तीला ज्यास्तींत ज्यास्त दोन मतें देतां येतील. एक जमिनीच्या किंवा भाड्याच्या लायकीनें व दुसरें विद्यापीठाच्या पदवीमुळें. स्त्रीला मतदारीचा हक्क प्राप्त होण्यास ती ३० वर्षांची असावयास हवी. तिचें नांव स्थानिक स्वराज्याच्या नोंदणी पुस्तकांत नोंदलेलें असावें, ती वर्षाला ५ पौंड भाडें भरीत असावी किंवा तिच्या नवऱ्याला मतदारीचा हक्क असावा. नवीन कायद्यानें सभासदांची संख्या ६७० ची ७०७ करण्यांत आली. महायुद्धांत काम केलेल्या तरुणास तो १९ वर्षांचा असतां ही मत देण्याचा हक्क देण्यांत आला आहे.

[ ( ७४ अ ) १८३२, १८६७, १८८४ व १९१८ सालच्या सुधारणांमुळें मतदारीचा हक्क, मतदारांची संख्या व प्रतिनिधींची संख्या ह्यांत होत गेलेली वाढ पुढीलप्रमाणें आहे.

१८३२ सालांतील सुधारणामुळें ५,००,००० माणसांनां मतदारीचा नवीन हक्क प्राप्त झाला. मतदारी एकंदर संख्या

१०,००,००० झाली. चोवीस माणसांतील एक पुरुषाला मतें मिळालें. मतदारीचा हक्क मध्यम वर्गाच्या हातांत आला.

१८६७ च्या सुधारणेमुळें १०,००,००० नवीन मतदारांची भर पडली. एकंदर संख्या २५,००,००० झाली. शहरांतील कामगार वर्गाला मतदारीचा हक्क मिळाला. १२ माणसांत १ पुरुषाला मत मिळालें.

१८८४ च्या सुधारणेमुळें २०,००,००० मतदारांची भर पडली. एकंदर संख्या ५०,००,००० झाली. शेतकाम करणाऱ्या मजुरांचा मतदार संघांत समावेश झाला. ७ माणसांत एका पुरुषाला मत मिळालें.

१९१८ च्या लोकप्रतिनिधींच्या कायद्यानें ८० लक्ष नवीन मतदरांना हक्क मिळाला. त्यापैकीं ५ लक्ष विवाहित व १ लक्ष अविवाहित स्त्रिया आहेत. मतदारांची वटसंख्या १६० लक्ष झाली. आणि ३ माणसांतील एका माणसाला मत मिळालें. नव्या कायद्याप्रमाणें प्रतिनिधींची संख्या पुढीलप्रमाणें आहे.

इंग्लंड व वेल्स ५२८, स्कॉटलंड ७४, आयर्लंड १०५. एकूण ७०७. शहरें ३२०. परगणे ३७२, विद्यापीठें १५.]

**(७५) लोकसभेची निवडणूक व तिची काल-मर्यादाः**—लोक सभेंतील सभासदांची निवडणूक गुप्त रीतीनें त्यांच्या नांवाच्या चिठ्या टाकून करण्यांत येते. लोकसभेची कालमर्यादा १९११ पर्यंत सात वर्षांची होती, पण ती आतां पांच वर्षांची करण्यांत आली आहे. स्त्रिया, धर्म खात्यांतील खालच्या दर्जाचे नोकर, इंग्रज व स्कॉच उमराव, शेरिफ आणि निवडणूक करणारे इतर अधिकारी यां खेरीज कोणाही वयांत

झालेल्या आणि मत देण्याचा हक्क असलेल्या नागरिकाला प्रतिनिधी ह्मणून निवडून देतां येतें. उमरावां खेरीज करून बाकी वगळलेल्या या लोकांस लोकसभेंत बसतां येत नाहीं कीं मतही देतां येत नाहीं.

[ (७६) प्रत्यक्ष व्यवहारांत कोणत्याही लोकसभेचें अस्तित्व पुरीं सातवर्षें पावेतों टिकलें नाहीं. कायद्यानें ठरविलेला काळ पुरा होण्यापूर्वींच एकाद्या महत्वाच्या प्रश्नावर राष्ट्राचें काय ह्मणणें आहे हें जाणण्यासाटीं लोकसभा बरखास्त होते. लोकसभेच्या अस्तित्वाचा काळ सरासरी चार वर्षांपेक्षां कमीच आहे. गेल्या शतकांत सर्वांत अधिक टिकलेल्या लोक सभेचें अस्तित्व सहावर्षें एक महिना बारा दिवस होतें. पांच वर्षांच्या मर्यादेचा नवा कायदा झाल्या नंतर मात्र पहिलीच लोकसभा त्या मर्यादेपेक्षां अधिक काळ पावेतों अस्तित्वांत आहे. चालू लोक सभेची पहिली बैठक ३१ जानेवारी १९११ रोजीं सुरू झाली. आणि आतां त्यानंतरची निवडणूक १९१८ च्या डिसेंबरांत होणार.

(७७) गुप्त रीतीनें चिठ्या टाकून मत देण्याची पद्धत कोणत्याही कायम कायद्यानें सुरू झालेली नाहीं. १८७२ सालीं तिला एका वर्षा पुरती मंजुरी देण्यांत आली. तेव्हांपासून सतत दरवर्षी तिला नवीन मंजुरी देण्यांत येत असते. ती सुरू करण्यांत आली ती अशासाठीं कीं मतदारावर नाहक भिडेचें ओझें पडूं नये.

(७८) आतां उमेदवाराला पूर्वीं प्रमाणें विशिष्ठ उत्पन्नाची लायकी ठेवण्यांत आलेली नाहीं, परंतु १९११ पावेतों सभासदांस पगार देण्यांत येत नसे आणि त्यामुळें सभासदास मतदार संघानें

मदत न केल्यास अप्रत्यक्षपणें उत्पन्नाचा निर्बंध घातल्या सारखेंच होई. सभेच्या बाल्यावस्थेंत व अलिकडे ही मधून मधून मतदार संघ आपल्या प्रतिनिधींस मदत करित असत. आतां १९११ सालापासून सभासदास सालिना ४०० पौंड वेतन मिळूं लागल्यामुळें मतदार संघाच्या आवडीच्या गरिब माणसास ही दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करण्याची जरुरी राहिली नाहीं. १९१८ सालीं मजूर पक्षाचे ३८ सभासद होते. नव्या निवडणुकींत मजूरपक्ष ३०० उमेद्वार उभे करणार आहे. ]

( ७९ ) **आमंत्रण पत्रिका, निवडणूकीचे हुकूम, तहकुबीः**—राष्ट्रसभेची निवडणूक अमुक वेळीं झाली पाहीजे असा कायदा नाहीं. राजानें आमंत्रण पत्रिका काढली कीं राष्ट्र सभेची बैठक भरते. ( राजाच्या इतर सर्व कामांप्रमाणेंच आमंत्रण पत्रिका काढण्याचें कामही प्रधान मंडळच करितें ) प्रतिनिधींची निवडणूक करण्याची वेळ पूर्वी प्रमाणेंच शेरिफास पाठविलेल्या हुकुमांत प्रसिद्ध करण्यांत येते. राजाच ( ह्मणजे प्रधान मंडळ ) राष्ट्रसभा तहकूब करतो आणि सुट्टीनंतर पुनः तिच्या बैठकीस राजाच्या आमंत्रणानें सुरुवात होते.

[ ( ८० ) राष्ट्रसभेची नवीनच बैठक बोलावण्यासाठीं काढलेली आमंत्रण पत्रिका बैठकीच्या मुकरर केलेल्या दिवसापूर्वी पसतीस दिवस तरी काढावी लागते. तहकूब झालेली बैठक पुनः सुरू करण्यापूर्वी चौदा दिवस आमंत्रण काढलें पाहिजे. आतां अशी कायमची वहिवाटच पडून गेली आहे कीं राष्ट्रसभेची बैठक फेब्रुवारीच्या मध्याच्या सुमारास सुरू होते व ती आगस्टच्या मध्यापर्यंत चालू रहाते.

( ८१ ) बैठक चालू असतां एकादी जागा रिकामी झाल्यास खुद्द लोकसभेच्याच सूचनेवरून ती भरण्यासाठीं नव्या निवडणुकीचा हुकूम सोडण्यांत येतो. जागा सुट्टींत रिकामी झाली तर हा हुकूम लोकसभेच्या अध्यक्षाच्या सूचनेवरून काढला जातो.

( ८२ ) १८६७ पासून राष्ट्रसभेच्या कालमर्यादेवर राजाच्या निधनाचा कांहीं एक परिणाम होत नाहीं. १६९५ पूर्वी राजाच्या आयुष्या बरोबर राष्ट्रसभेचें ही आयुष्य संपे. त्यासाली असा कायदा करण्यांत आला कीं, राजाच्या निधनानंतर नव्या राजानें आधींच बरखास्त केली नाहीं, तर राष्ट्रसभा सहा महिने चालू राहावी. आतां तर कायद्यांत अशी तरतूद करण्यांत आली आहे कीं राजाच्या निधनानंतर राष्ट्रसभा लागलीच सुरू झाली पाहिजे. राष्ट्रसभा बरखास्त झाल्यावर आणि नवीन राष्ट्रसभा उघडण्यापूर्वीच राजाचा अंत झाल्यास जुन्या राष्ट्रसभेस जास्तींत जास्त सहा महिने पावेतों आपली बैठक भरवितां येईल. ]

( ८३ ) **लोकसभेची रचनाः**—लोकसभा आपला अध्यक्ष स्वतःच निवडिते. वेत्रधराची व तिच्या चिटणिसाची नेमणूक राजाकडून होते. तिचें कामकाज तिचेंच वडें मंडळ जें प्रधानमंडळ त्याच्या देखरेखीखालीं चालतें. आठवड्यांतील कांहीं दिवस खाजगी ठरावांकरितां राखून ठेवलेले असतात. परंतु लोकसभेचा बहुतेक काळ सरकारी कायद्यांच्या मसुद्यांसच वाहिलेला असतो. बहुमतपक्ष आपल्या पुढाऱ्यांच्या ह्मणजे प्रधानांच्या तंत्रानें वागत असतो. आणि मोठमोठे झगडे होतात ते एका बाजूला अल्पमत पक्ष आणि दुसऱ्या बाजूला प्रधान किंवा बहुमत पक्ष यांचे मध्यें.

[ ( ८४ ) ज्या दिवाणखान्यांत लोकसभेच्या बैठकी भरतात त्याच्या मध्यभागीं एक भला रुंद रस्ता आहे. या रस्त्याच्या पलीकडच्या टोंकास उंच अशा ठिकाणीं अध्यक्षाचें आसन असतें. त्याच्या खालीं कारकुनांची टेबलें व खुर्च्या असून जवळच वेत्रधराचें वेत्र, निरनिराळीं पुस्तकें, अर्जांच्या पेट्या आणि कागदपत्र हीं ठेवण्यासाठीं एक मोठें टेबल असतें. रस्त्याच्या दोहोंबाजूस समोरासमोर एकावरएक अशीं बांकें असतात. अध्यक्षाच्या उजव्या हातावरचीं बांकें बहुमत पक्षानें व्यापलेलीं असतात. प्रधान मंडळांतील प्रधान, ह्मणजे बहुमतपक्षाचे पुढारी हे वेत्र ठेवण्याच्या मोठ्या टेबला जवळ असलेल्या पुढल्या बाकांवर बसतात. खजिनदाराची जागा हें प्रमुखप्रधानपद असल्या कारणानें या पुढच्या बांकास खजिनदारी बांक असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. अध्यक्षाच्या डाव्या हातावरील बाकांवर अल्पमत पक्ष बसतो. प्रधानांनीं आणलेल्या ठरावांवर अल्प मतपक्ष साधारणपणें विरोध करणार अशी समजूत असल्यामुळें त्या पक्षास विरोधी पक्ष असें ह्मणण्यांत येतें. त्याचे पुढारीही मोठ्या टेबलाशेजारच्या पुढल्या बाकांवर बसतात. त्यांच्या आणि प्रधानांच्या दरम्यान फक्त तें टेबल असतें. ]

( ८५ ) २ **उमरावसभा, तिचे सभासदः**-उमराव सभेतील उमरावांची संख्या ठराविक नाहीं. ती दर वर्षी बदलूं शकेल. तिचे सभासद पांच तऱ्हेचे असतात ( १ ) वंशपरंपरा हक्काचे ( २ ) राजानें उमराव बनविलेले ( ३ ) अधिकारानें उमराव सभेचे सभासद असलेले.-२ मुख्य धर्माध्यक्ष. २४ धर्माध्यक्ष आणि ४ कायद्याचे उमराव. ( ४ ) आजन्म निवडलेले.-२८आय

रिश उमराव ( ५ ) लोकसभेच्या मुदतीपुरतेच निवडलेले-१६ स्कॉटिश उमराव. १९१८ सालीं उमराव सभेंतील सर्व उमरावांची संख्या ६६० आहे.

[ ( ८६ ) राजाला वाटेल तेव्हां उमराव निर्माण करितां येतात. कितीदां तरि असें त्यांस निर्माण करण्यांत आलें आहे. एका १८८६ सालीं तेरा नवे उमराव निर्माण करण्यांत आले. हिन्दुस्थानांतील गव्हर्नर जनरल आणि गव्हर्नर यांस इकडे येण्यापूर्वी नाहीं तर परत गेल्यावर तरि उमराव करण्यांत येतें. स्कॉटिश आणि आयरिश उमरावांची संख्या कायद्यानें ठरविलेली आहे.

( ८७ ) लोकसभेच्या बैठकीबरोबरच उमराव सभेची बैठक सुरू होते. नेहमीं दोहींसही एकाच वेळीं बोलावलें पाहिजे. ]

( ८८ ) **उमराव सभेचे कायदे करण्याच्या बाबतींतील कार्यः**—कायद्याच्या कल्पनेप्रमाणें सर्व बाबतींत उमराव सभा ही लोकसभेची समान हक्क युक्त जोडीदार आहे. परंतु वस्तुस्थितींत मात्र मागें पुष्कळदां सांगितल्याप्रमाणें राज्यकारणांत तिचा दर्जा कमी आहे. कायद्याप्रमाणें लोकसभेप्रमाणेंच उमराव सभेचीही कायद्याच्या प्रत्येक गोष्टीस अनुमति पाहिजे. परन्तु लोकसभा जेव्हां आपलें ह्मणणें ठांसून आणि सर्व देशाच्या उघड मान्यतेच्या जोरावर सांगते तेव्हां उमरावसभा बहुधा आपली संमति देण्याचें नाकारीत नाहीं. अशा वेळीं मान्यता देण्याचें धोरण आवश्यक आहे हें ती जाणून असते. तिच्या कार्याचें थोडक्यांत पण अर्थपूर्ण रीतीनें असें वर्णन केलें आहे कीं ' तें सावधगिरीनें तपासणी करण्याचें आहे.' लोकमत काय आहे

याबद्दल जेव्हां वाद असेल तेव्हांच तिला शहाणपणानें आणि सुरक्षितपणें लोकसभेविरुद्ध उभें करतां येईल. परन्तु ती मान्यता देते ती केवळ भिऊन देण्यापेक्षां धोरणाच्या योग्य विचारानेंच देते. लोकांच्या मनोवृत्तींशीं ज्यांचा विशेष संबंध नाहीं असे कायदे करण्यांत तिच्या वांट्याला अजूनही पुष्कळसें वजन उरलें आहे.

( ८९ ) १९११ च्या पार्लमेंट अॅक्टानें उमराव सभेच्या अनुमतीची आवश्यकता बरीच ढिली केली आहे. खर्चाच्या ठरावांस तिनें संमति दिली नाहीं तरि राजाच्या सहीनें त्यांस कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें. इतर ठराव लागोपाठ तीन बैठकांत पास झाले तर उमराव सभेनें त्यांस अनुमति दिली नाहीं तरिही त्यांस कायद्याचें स्वरूप मिळतें.

( ९० ) **उमराव सभा, मुख्य न्यायमंदीर**—( सुप्रीम कोर्ट ) या नात्यानें उमराव सभेला नॉर्मन काळांत सर्व सभेनें एकत्र बसून न्यायमनसुबा करण्याचें वड्या सल्लागार मंडळाकडून प्राप्त झालेलें काम कधींच बंद पडलें तरिही उमराव सभा ही कायद्यानें आणि वस्तु स्थितींतही अपिलाचें उत्युच्च न्यायासन आहे. आतां तिचें हें काम नेहमींच उमराव सभेचा अध्यक्ष लॉर्ड चॅन्सेलर आणि न्यायाधिशाचें काम करण्यासाठीं तहाह्यात उमराव केलेले चार लॉर्डस ऑफ अपील इन ऑर्डिनरी ह्यांच्यामार्फत चालतें. ह्या खास उमराव न्यायाधिशांना न्यायाधिशाचें काम केलेले किंवा कायद्याचा अभ्यास केलेले इतर उमराव वेळोवेळीं मदत करितात.

(९१) **कायद्यांचे कानू करण्याचा** अधिकार लोकसभेचा आहे. परंतु त्यांचा अर्थ करण्याचा अधिकार उमराव सभेच्या न्यायाधीश सभासदांचा आहे. कायदे करण्याच्या हक्कांत लोकसभेच्या तोडीचा तिलाही हक्क आहे. परंतु जाहीर लोकमताला ही न जुमानतां तो बजावण्याचें तिला सामर्थ्य नाहीं. तसाच राजालाही कायदे नामंजूर करण्याचा कायदेशीर हक्क आहे. परंतु राजा प्रधान मंडळाच्या हातांत आणि प्रधान मंडळ लोकसभेच्या हातांत. तेव्हां कायदे कधींच नामंजूर करण्यांत येत नाहीं.

(९२) **इंग्लण्डची राज्यघटना** कायदा आणि वहिवाट यांवरच रचलेली आहे. त्याच्या संस्थाच्या आधाराला मॅग्नाचॅर्टा सारखे दाखले आहेत. परंतु मॅग्नाचार्टा ही केवळ राजानें लिहून दिलेली सनद आहे. त्याच्या राज्यपद्धतीच्या मध्यभागीं बिल ऑफ राइटस (हक्कांचा कायदा) सारखे थोर कायदे आहेत. पण कांहीं झालें तरि बिल ऑफ राइटस हा राष्ट्रसभेनें घडविलेला कायदा इतकेंच. त्याची राज्यघटना लिहिलेली नाहीं. तिच्यांत स्थिरता नाहीं. राष्ट्रसभेला नुसता एखादा कायदा पास करूनही कायदेशीर पद्धतीनें इंग्लंडांतील राज्यसंस्थाची बाह्य रचना आणि त्या संस्थांत असलेली तत्वें पूर्णपणें फिरवितां येतील. पण राज्यघटनेला एका गोष्टीनें बरीच स्थिरता आली आहे. लोकसभेला लोकमताला मागें टाकून धांवण्याची छाती नाहीं. आणि इंग्लंडांतील लोकमताची स्थितिप्रियता दमदार आणि जोरदार आहे.

[(९३) सर एर्स्किन मे म्हणतो कीं, अशी एकही योजना राष्ट्रसभेवर लादण्यांत आलेली नाहीं कीं, जी पुढील कायां-

तील शांत व सारासार विचाराला मान्य झालेली नाहीं. अशी एकही चळवळ फुकट गेली नाहीं कीं, जी पुढील पिढीनें नापसंत ठरविली नाहीं. हे शब्द म्हणजे असल्या राज्यपद्धतीखालीं रहाणाऱ्या राष्ट्राच्या स्थिरबुद्धीचा केलेला अलौकिक सन्मान आहे. ]

( ९४ ) **न्यायकचेऱ्या**–न्यायदानाचें कार्य इंग्लंडांत नेहमींच केंद्रीभूत झालेलें आहे. फार पुरातन कालापासून राजाच्या न्यायमंदिरांतील न्यायाधीश फिरतीवर निघत. आणि फिर्यादीचा आपल्या विरुद्ध पक्षाला लंडनमधील न्यायमंदिरांत सलामी देण्याचा त्रास आणि खर्च वांचावा म्हणून निरनिराळ्या भागांत आपल्या कचेऱ्या भरवीत. परंतु हे न्यायाधीश दौरा करित तो राज्यांतील मध्यवर्ती अधिकाऱ्यांनीं दिलेल्या तात्पुरत्या आखत्यार पत्रानें. ते ज्या परगण्यांत आपल्या कचेऱ्या भरवीत त्यांच्याशीं त्यांचा कायमचा संबंध नव्हता. ते लंडनहून येत. लंडनांतून त्यांच्यावर अधिकार चाले. आणि काम झाल्यावर ते लंडनला परत जात. पुनः साधारणपणें वहिवाटीच्या कायद्याच्या ( कॉमनला ) तीन मंदिरांतीलच ( किंग्ज बेंच, कोर्ट ऑफ कॉमन प्लीज आणि कोर्ट ऑफ एस्क्चेकर ) न्यायाधिशांस फिरतीवर पाठविण्यांत येत असे. या सर्वांच्याहीवर कोर्ट ऑफ चॅन्सरी नांवाचें न्यायमंदिर होतें. त्यांत फिर्यादीं नोंदणारांस त्याच्या वेस्ट मिनिस्टरमधील न्यायकचेरींतच जावें लागे. केंद्रीकरण पूर्ण करण्यास एकाच गोष्टीची उणीव होती. आणि ती म्हणजे व्यवस्थेंत अधिक शिस्तवारपणा आणि निरनिराळ्या कचेऱ्यांचे अधिकार वांटून देण्यांत थोडा कमी अविचार. ही उणीव १८७३ सालीं पास झालेल्या प्रसिद्ध ज्युडीकचेर

ॲक्टानें भरून काढण्यांत आली. या आणि १८७९ पर्यंत मंजुर झालेल्या दुसऱ्या कायद्यांनीं नार्मन ( १०६६–११५४ ) आणि प्लेंटेजेनेट ( ११५४–१४८५ ) राजांच्या अमदानींतील शाश्वत सल्लागार मंडळांतून उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या न्यायकचेऱ्यांचें पुनः एकीकरण करून सारख्या अधिकारांचे पोटविभाग असलेली एक संस्था निर्माण केली आहे.

**( ९५ ) न्यायदान पद्धतीची सुधारणा, पुनर्रचना १८७३–१८७९:**–वर दिग्दर्शित केलेले १८७३–१८७९ मधील पुनर्रचनेचे आणि एकीकरणाचे उपाय अंमलांत येण्यापूर्वी १८४६ सालीं बऱ्याच मोठ्या प्रमाणावर अधिकार विभागणी झाली होती. यावेळीं परगणा–न्याय–कचेऱ्या स्थापन करण्यांत आल्या. त्या न्यायकचेऱ्या स्थानिक आहेत. वेस्टमिनिस्टर मधून फिरतीवर निघलेल्या नव्हत. त्या अस्तित्वांत आल्या त्या केवळ फिरत्या कचेऱ्यानां मदत करण्यासाठीं. फिरत्या कचेऱ्या बंद करून त्यांचें काम परगणा कचेऱ्यांकडे द्यावें असा त्यावेळीं हेतु नव्हता. तरि पण स्वाभाविकपणेंच फिरत्या कचेऱ्यांचें बरेंच काम हळुहळू परगणा–कचेऱ्यांच्या हातांत गेलें. आतां न्यायपद्धतीची रूपरेषा पुढील प्रमाणें आहे.

राज्यांतील सर्व साधारण न्यायकचेऱ्यांचें एकीकरण करण्यांत आलेलें असून त्यास सुप्रीम कोर्ट ऑफ ज्युडिकेचर असें नांव देण्यांत आलें आहे. या कोर्टांचे हायकोर्ट ऑफ जस्टिस आणि कोर्ट ऑफ अपील्स असे दोन भाग करण्यांत आले आहेत. ते दोन्ही भाग एकमेकांपासून अगदीं स्वतंत्र आहेत. त्या दोहोंच्याही वर दादमागण्यास उमराव सभा आहेच. हायकोर्ट ऑफ जस्टिसचे

तीन विभाग करण्यांत आले आहेत. ( १ ) किंग्ज कोर्ट ( नृप-न्याय मंदिर ) २ चॅन्सरी. ३ प्रोबेट डायव्होर्स आणि ॲडमिरॅल्टी ( वारस हक्क, घटस्फोट आणि आरमारी न्यायकचेरी ) या निरनिराळया विभागांच्या अधिकारांची कल्पना त्यांच्या नांवावरून करितां येईल. त्यांचेवर दाद मागावयाची ती कोर्ट ऑफ अपील्स-कडे. परगणा न्यायकचेऱ्या आणि फिरत्या न्यायकचेऱ्या यांचा या पद्धतीशीं संबंध जोडून देण्यांत आलेला आहे.

[ ( ९६ ) **चॅन्सरी विभागांत** त्या विभागाचा अध्यक्ष चॅन्सेलर आणि शिवाय दुसरे पांच न्यायाधीश असतात. किंग्ज बेंच-मधें पंधरा न्यायाधीश असून लॅार्ड चीफ जस्टिस हा त्याचा अध्यक्ष असतो. प्रोबेट डायव्होर्स आणि ॲडमिरॅल्टी विभागांत फक्त दोनच न्यायाधीश असतात. त्यांपैकीं एक दुसऱ्यावर अध्यक्ष असतो. विभागांची ही व्यवस्था केवळ सोईसाठीं केलेली आहे. त्यांच्या अधिकाराच्या बाबतींतील भेद फारसा कडक रीतीनें पाळण्यांत येत नांहींत. प्रिव्हिकाउन्सिलच्या हुकुमानें न्यायाधिशांनां इष्ट वाटतील ते फेरबदल करितां येतात. अशा रितीनें जुन्या रचनें-तील कायम राहिलेले एक्स्चेकर आणि कामन प्लीज विभाग १८८० च्या डिसेंबरांत काढून टाकण्यांत आले. निरनिराळ्या विभागांतील न्यायाधीश एकत्र बसतातच असें नांहीं. बहुधा ते बसत नांहींतच. साधारणपणें खटला एकएकट्या न्यायाधीशापुढें चालतो. तेव्हां न्यायाधिशांची एकंदर संख्या तेवीस असल्यामुळें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, हायकोर्टांत न्याय करणाऱ्या तेवीस निरनिराळ्या कचेऱ्या आहेत. खालच्या कोर्टांतून आलेलीं अपिलें ऐकतांना किंवा कायद्याच्या अनिश्चित आणि गुंतागुंतीच्या

प्रश्नावर निकाल द्यावयाचा असेल तेव्हां मात्र दोन किंवा त्याहूनही अधिक न्यायाधीश एकत्र बसतात.

( ९७ ) **कोर्ट ऑफ अपील्स** हें कायदा किंवा वस्तुस्थिति ( फॅक्ट ) या दोहोंच्याही मुद्यांवर अपील ऐकतें. त्यांत मास्टर ऑफ रोल्स व त्याचखेरीज आणखी पांच न्यायाधीश असतात. हे सहा न्यायाधीश मिळून एक कायमचें आणि स्वतंत्र न्यायमंदिर आहें. या कोर्टाचें काम चालविण्यास तीन न्यायाधिशांस एकत्र बसावें लागतें. आणि वहिवाट अशी आहे कीं, त्यांतील सहा न्यायाधीश काम विभागून घेऊन दोन निरनिराळ्या कचेऱ्या भरवितात.

( ९८ ) **हाउस ऑफ लॉर्ड्स** किंवा उमराव सभा हिची बैठक लोकसभेबरोबर भरावयाची आणि बरखास्त व्हावयाची असें आहे तरि उमराव सभा न्यायदानाचें कार्य करीत असेल तेव्हां तिची बैठक केव्हांही चालू रहाते. कायदे करण्याच्यावेळीं लोकसभेच्या मर्जीनें चालणारी उमराव सभा आणि न्यायदानाचें अत्युच्च काम करणारी उमराव सभा यांत कांहींचेंही साम्य नाहीं. ती न्यायदानासाठीं बसते तेव्हां तिचें कोर्ट लॉर्ड चॅन्सेलर आणि लॉर्डस ऑफ अपील्स इन ऑर्डिनरी नांवाचे दुसरे दोन न्यायाधीश यांचें मिळून बनलेलें असतें. क्वचित् प्रसंगीं लॉर्ड ऑफ अपील्स इन आर्डिनरी, माजी लॉर्ड चॅन्सेलर किंवा उमराव झालेले चालू किंवा माजी न्यायाधीश त्यांच्या मदतीला देण्यांत येतात. उमराव सभेचे इतर सभासद कधींच हजर रहात नाहींत. आणि एखादेवेळीं राहिलेच तर मत देत नाहींत.

(९९) **प्रिव्हि कौन्सिलची ज्युडीशियल कमिटी**-खासगी सल्लागार—मंडळांतर्गत न्यायदानमंडळ हें हिंदुस्थान, वसाहती, इंग्रजी खाडींतील बेटें व मॅनबेट यांतील खटले ऐकण्याचें शेवटचें कोर्ट आहे. लॉर्ड चॅन्सेलर हा त्याचाही सभासद असतो. आतां त्यांत मुख्यतः उमराव सभेच्या कोर्टांत काम करणारे लॉर्डस ऑफ अपील्स हे न्यायाधीशच काम करितात. वारस हक्क, घटस्फोट आणि आरमारी विभागांतील ही कांहीं ठराविक अपिलें त्याच्यापुढेंच चालतात.

(१००) **लॉर्ड चॅन्सेलर**—हा इंग्रजी न्यायपद्धतींतील लक्षांत ठेवण्यासारखा अधिकारी आहे. तो उमराव सभा, कोर्ट ऑफ अपील्स, हायकोर्ट, आणि चॅन्सरी विभाग या सर्वांचाच अध्यक्ष असतो. तो खासगी सल्लागार मंडळाच्या न्यायदान मंडळाचा सभासद असतो. हायकोर्टखेरीज करून बाकी सर्वांत तो बसतोही-उमराव सभा व सल्लागार मंडळ यांत नेहमींच, कोर्ट ऑफ अपिलांत बरेचदां. याहीपेक्षां मौज आहे ती ही कीं, तो न्यायखात्यांतील राजकीय अधिकारी आहे. तो नेहमींच प्रधान मंडळाचा सभासद असतो. आपल्या पक्षांतील इतर प्रधानांबरोबरच तो लोकसभेच्या मर्जीनें अधिकारावर चढतो किंवा अधिकारावरून ओढला जातो. तो बऱ्याच अर्थी दिवाणी न्यायाच्या प्रधानाचें काम करितो. ]

(१०१) **दिवाणी दावे**—लंडनमधील हायकोर्टांत बसणारे किंवा परगण्यांतून फिरणारे हायकोर्टांतील न्यायाधीश आणि १८४६ त निर्माण झालेल्या परगणाकचेऱ्या यांचेपुढें चालतात. फिरत्या न्यायधिशांच्या कचेऱ्या कांहीं ठराविक शहरांतच काम

करितात. प्रत्येक परगण्यांत एकतरि असें शहर असतें. फार पूर्वीच ऱ्हास पावूं लागलेल्या आणि आतांतर न्यायानाचें कार्य ज्यांच्या हातांतून आजीबातच गेलें आहे अशा जुन्या परगणा कोर्टांच्या रचनेपेक्षां या नवीन परगणा कचेऱ्यांची रचना आणि अधिकार भिन्न आहेत. पूर्वीच्या कोर्टांत शेरिफ आणि सर्व स्वतंत्र नागरिक बसत. नव्या कचेऱ्यांत न्यायाधीश नेमण्यांत आले आहेत. त्यांच्या हातांशीं सरकारी अधिकारी असतात. परगण्याचे जिल्हे केलेले आहेत. त्या जिल्ह्यांवर त्यांचा अंमल असतो, सर्व परगण्यावर असत नाहीं. त्यांना तीं जिल्हाकोर्टें असतां परगणाकोर्टें म्हणण्यांत येतें तें फक्त पुराण कालीन आणि मान्यता पावलेलें नांव कायम ठेवण्याच्या पुराण प्रियतेनें येवढेंच.

[ ( १०२ ) **परगणा कचेऱ्यांस** कर्जाचें किंवा नुकसानीचे ५० पौंडांपर्यंतचे सर्वदावे आणि सारासार विचारानें न्यायकरण्याचे ( एक्विटी ) ५०० पौंडांपर्यंतचे दावे ऐकण्याचा अधिकार आहे. परंतु त्यांना अब्रुनुकसानीचे, फुसलावून पळवून नेण्याचें, लग्नाचें वचन मोडण्याचें किंवा लग्न संबंधीं दावे ऐकण्याचा अधिकार नाहीं. त्यांच्या अधिकाराची ढोबळ रूप रेखा अशा तऱ्हेची आहे. सविस्तर माहितीं द्यावयाची तर तपशील किती तरी वाढेल. कारण इंग्लण्डांत न्यायासंबंधीच्या नवीन कायदेबंदीची प्रवृत्ति अशी आहे कीं, याच कचेऱ्यांकडे अधिकाधिक आणि विशेष महत्वाचें ही काम सोंपवावयाचें. 'इंग्लण्डांतील भांडणतंट्याचे दावे ५० पौंडापेक्षां कमी किंमतीचे असतात'-असा जो मेटलंडनें उल्लेख केला आहे त्याचा

विचार केला कीं या कचेऱ्यांचे साधारणपणें महत्व किती असावें हें लक्ष्यांत येईल.

( १०३ ) कोणत्याही पक्षकारानें अर्ज केला असतां कराराचे ( कॉन्ट्रक्ट ) १०० पौंडाच्या आंतील दावे हायकोर्ट न्यायाधिशाला परगणा न्यायकचेरीकडे पाठवितां येतात. दावा कितीही कमी किंमतीचा असो त्यांत कायद्याचे महत्वाचे प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे असें परगणा कचेरीतील न्यायाधिशानें शिफारस पत्र दिल्यास किंवा हाय कोर्टाला किंवा हायकोर्टामधील एकाद्या न्यायाधिशाला वर्ग करणें इष्ट वाटल्यास तो हाय कोर्टांत वर्ग करितां येतो. २० पौंडापेक्षां कमी किंमतीच्या बहुतेक दाव्यांत परगणा कचेरीवर वरिष्ट कोर्टाकडे अपील होत नाहीं.

( १०४ ) सर्व देशाचीं छपन्न वर्तुळें करून त्या विभाग रचनेच्या पायावर परगणा कचेरी पद्धति उभारण्यांत आलेली आहे. वर्तुळाच्या खालचा विभाग ह्मणजे जिल्हा. एकंदर पांचशे जिल्हे आहेत. प्रत्येक जिल्ह्याला स्वतंत्र न्यायकचेरी व रजिस्ट्रार सारखे अधिकारी आहेत. न्यायधिशाची नेमणूक मात्र वर्तुळासाठीं करण्यांत येते. प्रत्येक वर्तुळाला एक न्यायधीश असतो. त्यांची नेमणूक लॉर्ड चेन्सेलर सातवर्षे वकिलीचा धंदा केलेल्या बॅरिस्टरांतून करितो.

( १०५ ) **पंचायत** ( ज्यूरी ) पद्धत दिवाणी दाव्यांत मागें पडत चालली आहे. जुन्या चॅन्सरी कोर्टाप्रमाणें चॅन्सरी विभागांतही 'पंचायत ह्मणून नांहींच' हाच कामाचा नियम आहे. तेव्हां त्यांतील दावे खेरीज करून इतर सर्व महत्वाच्या

दाव्यांत कोणत्याही एका पक्षकाराची इच्छा असल्यास पंचायत बोलावण्यांत येते. परंतु बऱ्याच पक्षकारांची प्रवृत्ति पंचायती खेरीजच काम चालवून घेण्याची असते. परगणा कचेऱ्यांत तर ही प्रवृत्ति विशेषच आहे. वीस पौंडावरी दाव्यांत त्या कोर्टांत पंचायत मागतां येते पण त्यांतील न्यायधीश बहुतेक दाव्यांत पंचाच्या सल्याखेरीजच वस्तुस्थिति किंवा सत्यता आणि कायदा यां बद्दलचे निकाल देतात. ]

( १०६ ) **फौजदारी खटले** हायकोर्टाचे न्यायधिश, परगण्यांत नेमण्यांत आलेले जस्टिस ऑफ पीस किंवा शहरांतील जस्टिस ( न्यायधीश ) यांचे पुढें चालतात. जस्टिस आफ दि पीस हा विनपगारी अधिकारी असतो. त्याची नेमणूक परगण्याच्या लॉर्ड लेफ्टेनंटाच्या शिफारसी वरून करण्यांत येते. शहरांतील न्यायाधीश हे इतर न्यायाधीशाप्रमाणेंच पगारी अधिकारी असतात. जस्टिसेसच्या अधिकारांत भयंकर स्वरूपाचे गुन्हेखेरीज करून बाकीचे सर्व गुन्हे येतात. ज्या गुन्ह्यांना देहांत किंवा सक्त मजुरीची शिक्षा सांगण्यांत येते, असे आणि त्याचप्रमाणें खोटी शपथ घेणें, खोटी साक्ष देणें, खोटे कागदपत्र तयार करणें, अब्रुनुकसानी व लांचलुचपत हे गुन्हे त्यांच्या अधिकारांत येत नाहींत. प्रत्येक परगण्यांत पुष्कळ जस्टिस असतात. त्यांच्या संख्येला कायद्याचा निर्बंध नाहीं. ते आपलें विशेष महत्वाचें काम कार्टर सेशनांत किंवा तिमाही भरणाऱ्या सेशनांत चालवितात. प्रत्येक परगण्यांत हायकोर्टाच्या फिरत्या न्यायाधिशांच्या कचेऱ्या वर्षांतून चारदां भरतात. क्षुल्लक स्वरूपाचे खटले वगळले असतां बाकीचे सर्व पंचायती पुढें चालविण्यांत येतात.

[ ( १०७ ) मेटलन्ड ह्मणतो कीं, जवळ जवळ निम्मे खटले परगणा सेशनांत, सुमारें एकचतुर्थांश शहरांतील सेशनांत व बाकीचे मुख्य फौजदारी कोर्ट किंवा फिरते न्यायाधीश यांच्या कचेऱ्यांत चालतात.

( १०८ ) **तिमाही आणि छोटीं सेशनें**—न्यायसंबंधी अधिक महत्वाच्या सर्व कामांकरितां जस्टिस हे दर तिमाहीस एकत्र बसतात. त्याला तिमाही सेशन ह्मणतात. ज्यांत दोहोंपेक्षां अधिक जस्टिस एकत्र बसण्याची आवश्यकता नसते अशा बारीक सारीक कामाकरितां परगण्यांत वेगवेगळ्या पुष्कळ ठिकाणीं छोटीं सेशनें असतात. प्रत्येक परगण्याचे सोईसाठीं पुष्कळ विभाग करण्यांत आलेले असून दर विभागांत एक छोटें सेशन कोर्ट असतें. त्यांतील बहुतेक सर्व दाव्यांवर तिमाही सेशनांत अपील होतें. उदाहरणार्थ परवाने देण्याचे ( क१४१ ) महत्वाचें काम छोट्या सेशनाकडे असतें व त्यावर तिमाही सेशनांत अपील करितां येतें.

( १०९. ) **जस्टिस ऑफ दि पीस**—१८८८ सालच्या स्थानिक स्वराज्याच्या सुधारणा अंमलांत येई तों जस्टिस ऑफ दि पीस हेच सर्व साधारण काम करणारे सरकारी अधिकारी असत. ( क १२१–१२५ ) निरनिराळ्या प्रकारचीं हरएक महत्वांचीं कामें त्यांचेकडे असत. ते आपआपल्या परगण्यांत नांवा लौकिकाचे गृहस्थ असतात, आणि मागें सांगितल्याप्रमाणें विन पगारी काम करितात. वस्तुतः त्यांची नेमणूक आजन्म असते. त्यांस अख-त्यार देण्यास चौदाव्या शतकांत प्रारंभ झाला. त्यांच्या अधि-काराच्या वाढीचा इतिहास विस्तृत असून मनोरंजक आहे. जस्टि-

शांचा अधिकार थोडाबहुत बेजबाबदार स्वरूपाचा असतांही आजपर्यंत तो एकंदरींत मोठ्या शहाणपणानें, सार्वजनिक हिताच्या कळकळीनें आणि बहुधा अलैकिक नेमस्तपणानें, दक्षतेनें आणि उपयुक्त रीतीनें वापरण्यांत आला आहे.

( ११० ) जस्टिसाला कोर्टांत किंवा कोर्टांबाहेरही काम करण्याचा अधिकार आहे. त्याला गुन्हेगार माणसांची प्रथम चवकशी करून योग्य कारण दिसल्यास खटला चालविण्यासाठीं कमिट करितां येतें. त्याला गुन्हा शोधून काढण्यासाठीं पोलिसास घरें तपासण्याचा हुकूमही देतां येतो ]

( १११ ) **पोलीस**—देशांतील पोलिस फौजेवर ( कॉन्स्टॅब्युलरी ) स्वराष्ट्रीय कचेरीची देखरेख असते. ही कचेरी पोलिसांची शिस्त, पगार वगैरे बद्दलचे सर्व साधारण नियम तयार करते. राजाच्या इन्स्पेक्टरांची नेमणूक करते आणि खजिन्याच्या संमत्तीनें पोलिसखात्यास सरकारी मदत किती द्यावयाची हें ठरवितें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत या पोलिस फौजेवर स्थानिक अधिकाऱ्यांची सत्ता असते. परगण्यांतून परगणा सल्लागार मंडळें आणि तिमाही सेशनांच्या कमिट्या फौजदारांची नेमणूक करितात. हे फौजदार आपल्या हाताखालील पोलिसांची नेमणूक करून त्यांकडून काम करून घेतात. त्यांनां पोलिसांस एकदम काढतां येतें व शिक्षाही करितां येते. त्यांच्यावर दाद मागावयाची तर ती कमिट्यांकडे. कांहीं शहरें परगणा—पोलिसाखेरीज स्वतःचेही पोलिस ठेवतात. त्या शहरांतील अधिकारीच फौजदाराची निवड करितात आणि शहरचें देखरेख करणारें मंडळ आपल्या पोलिसांच्या कामावर देखरेख करितें. एकंदर पोलिस फौजेपैकीं एक

तृतियांश पोलिस फौज एकट्या लंडन शहरांत आहे. त्या शहरास खास आणि अपवादात्मक अशी स्वतंत्र पद्धती देण्यांत आली आहे. स्वराष्ट्रीय कचेरीनें नेमलेले व तिच्याच हाताखालीं काम करणारा एक कमिशनर व दोन दुय्यम कमिशनरांच्या हातांत लंडन शहरांतील पोलिस खातें आहे.

[ ( ११२ ) सर्व देशभर पोलिसांस लष्करीं वळणावर शिक्षण व कवाईत हीं देण्यांत येतात. त्या खात्याची रचना शक्य तितकी व्यवस्थित, शिक्षण परिपूर्ण आणि शिस्त चोख करण्यांत आली आहे. मुख्य फौजदारांच्या जागेकरितां सैन्यांतील माजी अधिकाऱ्यांस विशेष पसंत करण्यांत येतें. ]

---

## स्थानिक स्वराज्य.

**( ११३ ) इंग्लंडांतील स्थानिक राज्यपद्धतीचें संमिश्र स्वरूप**—इंग्लंडांतील स्थानिक राज्यपद्धतीचा विषय अतिशय गुंतागुंतीचा असल्याकारणानें या पुस्तकाच्या हेतूप्रमाणें त्या पद्धतीचें थोडक्यांत वर्णन करणें अत्यंत कठिण आहे. या क्षेत्रांतील कायद्यांची तरतूद इतकी निखालस बेपद्धतशीर आहे कीं, ज्या ज्या लेखकांनीं ह्मणून तिचें विवरण करण्याचा प्रयत्न केला त्यापैकीं बहुतेकांस आपल्या कार्याच्या निराशाजनक स्वरूपामुळेंच त्याची गोडी लागली असावीसें दिसतें. तो एक प्रकारें निराशेतून उत्पन्न होणारा उत्साह आहे. इंग्लंडांत स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ कायद्यानें घडविलेल्या सुसंबद्ध आणि परस्प-

रावलंबी नमुन्यावरहुकूम झालेली नाहीं. ती अंशाअंशानें वाटेल तशी होत गेली आहे. त्यांची रचना प्रमाणबद्ध आणि जाळीदार नसून गोधडी वजा आहे, आणि या गोधडीचीं ठिगळें विविध-मापाचीं, निरनिराळ्या आकाराचीं आणि अनेक प्रकारचीं आहेत.

( ११४ ) या विषयावर लिहिणाऱ्या एका लेखकाची अशी तक्रार आहे कीं कायद्यानें राज्यकारभाराच्या बहुधा प्रत्येक कार्या-साठीं नवीनच मंडळ अस्तित्वांत आणलें आहे. या मंडळांतील सभासदांची निवड करण्यासाठीं नवीन मतदार संघ तयार कर-ण्यांत आले. या मतदार संघांसाठीं नवीन प्रांत निर्माण करण्यांत आले. या सभासदांच्या अधिकाराची नवीनच काल मर्यादा ठर-विण्यांत आली. त्यांच्या लायकीचे नवीन नियम तयार करण्यांत आले. ते नवीन नवीन कर बसवितात आणि त्या करांच्या उत्प-न्नापैकीं बराचसा भाग नवीन इमारतींवर आणि नवीनच नेमलेल्या अधिकाऱ्यांवर खर्च करितात. ]

( ११५ ) इंग्रजी कायदे करणारांना ही संवयच लागून गेली आहे कीं जुन्या यंत्रसामुग्रीची वाढ किंवा पूर्णता करण्याऐवजीं किंवा तिच्यांतच सुधारणा करून तिचा उपयोग करून घेण्या-ऐवजीं यंत्राचे वाटतील तसे हरएक प्रकारचे नवे नवे सांधे घडवीत बसावयाचे, आणि हे सांधे जुन्या सांध्यांशीं निदान एकमेकांशीं जुळतात कीं नाहीं याकडे फारसें, किंबहुना मुळींच लक्ष द्यावयाचें नाहीं. व्यवस्था प्रस्थापित करण्याचा विचारयुक्त केलेला पहिला प्रयत्न १८८८ च्या स्थानिक स्वरा-ज्याच्या कायद्यांत दिसून येतो. परंतु त्या कायद्यानें ही व्यवस्थितपणा आणला नाहीं इतकेंच नव्हे तर घोटाळा माजवि-

णाऱ्या तत्वांची भरच टाकली. त्या कायद्याचा मसुदा दुसऱ्याच एक कायद्यावरून [ १८८२ चा म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्ट ] करण्यांत आला आणि मग त्यांतील कांहीं विशिष्ट कलमें वगळून दुसरीं नवीन कलमें त्यांत घालण्यांत आली. हीं नवीन घातलेलीं कलमें सर्व संस्थाना उद्देशून न घालतां कांहीं ठराविक संस्थांसाठींच होतीं, हा त्यांतील एक फार मोठा दोष होता. १८९४ च्या पुरवणी कायद्यानें आणखी थोडी सुसंबद्धता आणण्याचा प्रयत्न करण्यांत आला. तरीपण एकंदरींत चालू पद्धतींत विशेषसा सुरळितपणा आला नाहीं. तेव्हां, पहिल्यानें जुने विभाग व जुनीं साधनें यांचें वर्णन करून नंतर अलिकडील कायद्यांनी निर्माण केलेल्या गोष्टींचा जुन्याचें रूपान्तर म्हणून-हें रूपान्तर कितीही अव्यवस्थित कां असेना, विचार करणें हेंच योग्य आहे असें दिसून येईल.

( ११६ ) **सामान्य स्वरूपः**—मोघम भाषेंत बोलावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, अगदीं आरंभीचा काल वगळला असतां इंग्लण्डमध्यें जवळ जवळ सर्व इतिहासभर परगणे आणि शहरें हेच स्थानिक राज्याचे महत्वाचे घटक होते. पुरातनकालीं परगण्यांच्या पॅरिश म्हणून केलेल्या विभागांस एकदां राज्यकारभाराचें केंद्र म्हणून महत्व आलें होतें. परंतु सरंजामी पद्धतीच्या अमलांत जेव्हां जहागिरदारांच्या अधिकाराखालीं अनेक निरनिराळे विभाग करण्यांत आले तेव्हां त्या विभागांतच त्यांचा लोप झाला. आतां त्यांचे सर्व काम जाऊंन एकदां सर्वस्वी त्यांच्याचकडे असलेल्या गरिबांची काळजी घेण्याच्या कामाचा कांहीं भाग मात्र त्यांच्या हातीं उरला आहे. अलीकडील काळांत परगणे, शहरें आणि पॅरिशें हा जो पूर्वीचा राज्यव्यवस्थेचा सांचा त्याचा बराच भाग पुढील गोष्टींच्या सर्व

बाजूनें पडलेल्या दडपणामुळें मलिन झाला आहे. ( अ ) पॅरिशांचे गट करून त्यांना यूनियन किंवा संघ हें नांव देण्यांत आले. परन्तु हे संघ करितांनां परगण्यांच्या सीमांचा काडीचाही विचार करण्यांत आला नाहीं. पॅरिशांकडे गरिबांनां पोसण्याचेंच काम असें. पण आतां संघांकडे पुष्कळ वेळां आरोग्याची सुधारणा आणि शाळांची तपासणी करण्याचें व साधारणपणें इतर पुष्कळ निरनिराळीं कामें देण्यांत आलीं. ( आ ) सडकांच्या व्यवस्थेकरितां नवीनच विभाग पाडण्यांत आले. ( इ ) शहरांतील व निमशहरी गावांतील राज्यकारभाराच्या पद्धतीचे बरेच निरनिराळे प्रकार करण्यांत आले. ( ई ) परगण्यांचे राज्यकारभाराच्या दृष्टीनें डिस्ट्रिक्ट किंवा जिल्हे या नांवाचे नवीन विभाग पाडण्यांत येऊन त्यांच्याकडे राज्यकारभाराचीं सामान्य कामें देण्यांत आलीं. क्षेत्राच्या आणि अधिकारांच्या वर्गीकरणास आधार घेतां येण्यासारखा टिकाऊ भेद झटला झणजे शहरांतील आणि खेड्यापाड्यांतील राज्यकारभारांतला. हा भेद १८८८ च्या कायद्यानें अंशतः नाहींसा झाला आहे. राज्यकारभाराच्या या दोन विभागांबद्दल असें झणावयास हरकत दिसत नाहीं कीं, शहरांतील राज्यकारभाराच्या पद्धतीपेक्षां खेड्यांतील राज्यकारभाराची पद्धति अजून पावेतों जुन्या ऐतिहासिक परंपरेच्या पायावर बऱ्याच मोठ्या प्रमाणांत उभी आहे.

**( ११७ ) परगणाः त्याचें ऐतिहासिक मूळः**—परगणे हे त्यांतील वजनदार जस्टिस आफ दि पीस आणि त्यांचे राज्यकारभाराचे विस्तृत अधिकार यांचे योगानें अजूनही इंग्लण्डांतील खेड्यापाड्यांतील राज्यव्यवस्थेचीं केन्द्रस्थानें आहेत. या पर-

गण्यांतील बरचसे आतां राज्यकारभाराच्या पद्धतीच्या दृष्टीनें नसले तरि क्षेत्रफळानें *सप्त राज्यकाळांतील निरनिराळ्या सॅक्सन संस्थानांचे निदर्शक आहेत. ( क ) जेव्हां हीं संस्थानें एका छत्राखालीं आणण्यांत आलीं तेव्हां त्यांचे कायमचे राजे व त्या राजांच्या वडील मुलांच्या वंशांतील वारस हे आउल्डरमन ह्मणून कायम राहिले असें दिसतें. त्यांचीं पूर्वीचीं सल्लागार मंडळेंहीं कायम राहिली होतीं. मात्र आउल्डरमन आणि धर्माध्यक्ष हे जे त्यांचे पूर्वीचे प्रमुख त्यांच्या जोडीला आतां शेरिफ नांवाचा, नवीन व्यवस्थेप्रमाणें राजाच्या आज्ञेनें नेमलेला सरकारी अधिकारी देण्यांत आला. पूर्वपरंपरेप्रमाणेंच धर्माधिकारी, रीव्ह नांवाचा मॅजिस्ट्रेट, प्रत्येक शहरानें निवडलेले चार प्रतिनिधी आणि शतग्रामांचे बारा बारा प्रतिनिधी इतक्यांचा या मंडळांत समावेश होत असे.

( ११८ ) अर्थातच, परगण्यांतील राज्यकारभारांतही पुराणपद्धति आतां नष्ट झाली आहे. तिची अंधुक छटाही शिल्लक राहिलेली नाहीं. परंतु पूर्वीची पद्धत नष्ट होऊन नवीन आली ती एकाएकीं किंवा उत्पातानें आली नाहीं. परगण्यांतील राज्यकारभारांत आज अस्तित्वांत असलेलीं कांहीं साधनें पुराण कालांतील जोमदार, सकस आणि पूर्णपणें स्वतंत्र अशा सॅक्सन संस्थांशीं आपली परंपरा जोडण्यास दिसायला तरि खरा दिसणारा पुरावा दाखल करूं शकतील.

* हा शब्द अन्वर्थक नाहीं. त्याचा अर्थ इतकाचकीं पांचव्या आणि नवव्या शतकांचें दरम्यान जीं निरनिराळीं प्रमुख-राज्यें होतीं तीं राज्यें—वेसेक्स, ससेक्स, एसेक्स, केंट पूर्व आंग्लिया, मार्सिआ आणि नॉर्दम्ब्रिया.

ठासळण्यांत आली. नवीन रचनेची आवश्यकता आधींच उत्पन्न झालेली होती.

**( १२१ ) जस्टिस ऑफ दि पीसः**--ही नवीन रचना जस्टिस ऑफ दि पीस यांची नेमणूक करून करण्यांत आली. शेरिफांच्या ऐवजीं स्थानिक न्यायदानाचीं अनेक महत्वाचीं कामें करण्यासाठीं परगणा कोर्टांत 'कसोडियन्स ऑफ प्लीज ऑफ क्राउन'ना निवडण्याची केलेली उपाययोजना समाधानकारक ठरली नाहीं. त्यांनाही प्रसिद्ध सनदेनें खटले चालविण्याची एकदम बंदी केली. ते लवकरच अकल्पित कारणानें एकाएकीं झालेल्या मृत्यूंची प्राथमिक चौकशी करणारे कॉरोनर बनले. जस्टिस ऑफ दि पीसच्या प्रयोगाला मात्र अधिक चांगलें यश आलें. आरंभी हे अधिकारी नुसते न्यायाचे रक्षकच होते पण पुढें तिसऱ्या एडवर्डाच्या कारकीर्दीत १३६० सालीं मंजूर झालेल्या कायद्यानें ते न्यायाधीशही बनले. त्यांना फौजदारी खटले ऐकण्याचे कांहीं अधिकार देण्यांत आले. या मुळें शेरिफाला न्यायसंबंधी शेवटल्या उरलेल्या अधिकारांत, ह्मणजे छोट्या कोर्टांत पोलिस खटल्यांत शिक्षा सांगण्याच्या व सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्या लहानसहान गुन्हेगारांना सक्तीनें शिस्त लावण्याच्या अधिकारांतही खो मिळाला.

( १२२ ) यापुढें, कायदे करणारांनीं स्थानिक राज्यकारभाराची व्यवस्था लावण्याचा पसंत केलेला मार्ग अगदीं सोपा होता. तो मार्ग असा कीं जें जें करणें ह्मणून आवश्यक भासलें तें तें शेरिफांचे माथीं मारावयाचें. हळुहळू हप्त्याहप्त्यानें त्यांची कामें आणि त्यांचे अधिकार ह्यांतही भर पडत चालली, आणि सरतेशेवटीं

जस्टिस हे स्थानिकस्वराज्यांतील अत्यंत महत्वाचे असे अधिकारी बनले. त्यांच्या अधिकारांत लंडनमधील मध्यवर्ती राज्यसत्तेनें आपल्या हातांत ठेवलेल्या अधिकारांव्यतिरिक्त वाकीच्या सर्व न्यायसंबंधी आणि अंमलबजावणीच्या अधिकारांची भर पडत गेली. पण १८८८ चा स्थानिक स्वराज्याचा कायदा मंजूर झाल्या-वर त्यांच्याकडे फक्त अगदीं पूर्वीपासून चालत आलेले व विशेष स्वाभाविक असे न्यायसंबंधी अधिकार मात्र ठेवण्यांत आले. जमाबंदी आणि अंमलबजावणीचे अधिकार नवीन परगणासल्लागार मंडळें निर्माण करून त्यांचेकडे सोंपविण्यांत आले आहेत.

[ ( १२३ ) **नवीन सुधारणा होण्यापूर्वी जस्टिस ऑफ दि पीसाचे अधिकारः**—सुधारणा होण्यापूर्वी जस्टिस ऑफ दि पीसाचें ' सरकारी हरकामी ' असें मजेदार वर्णन करण्यांत आलें आहे. त्याच्या अनेकविध कामांत तो पुढील संस्थांच्या हाता-खालीं काम करीत असे. [ अ ] खासगतसल्लागारमंडळ ह्याच्या पशुरोगचिकित्सक खात्याच्या देखरेखीखालीं त्याला संसर्ग जन्य पशुरोगांच्या कायद्यांच्या अंमलबजावणीचें काम करावें लागें. [ आ ] स्वराष्ट्रीय कचेरीच्या हाताखालीं तो परगणा पोलि-सांची व्यवस्था पाही. वेड्यांची आश्रय-स्थानें चालवी आणि तुरुंग-तपासी. [ इ ] व्यापारमंडळाच्या साधारण देखरेखीखालीं तो वजनें व मापें पुरवीं व तपासी, पूल बांधीं व दुरुस्त ठेवी, आणि सडका बांधणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखरेख करी. [ ई ] स्थानिक स्वराज्यमंडळाच्या देखरेखीखालीं तोच पॅरिस मधील भिकाऱ्यांवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक करी. गरि-बांकरितां घ्यावयाच्या करावर अपील केलें असतां तपासणी करी

आणि आरोग्याचीही व्यवस्था पाही. शिवाय जस्टिस हा परगणापट्टी वसूल करीत असे. या परगणा पट्टींतून परगण्यांतील स्थानिक कामांचा खर्च करण्यांत येई. मादक पेयें विकण्याचे, बंदुकीची दारू आणि पेट्रोलियम बाळगण्याचे आणि इतर आवश्यक परवाने तोच देई. तोच सडकां करितां, कॉरोनर करितां आणि निवडणुकी करितां परगण्याचे निरनिराळे विभाग करी. तो भिकाऱ्यांनां कायद्यानें ठरविलेल्या विभागांत पोंचते करण्याचे हुकूम सोडी. तो अशीं हजारों कामें करी कीं तीं भिन्नतेमुळें वर्गीकरण करण्यास ही कठीण आहेत. आतां तीं परगणासल्लागार मंडळांकडे देण्यांत आल्यामुळें त्यांचें टिपण देणें आवश्यक नाहीं. बाकी तें सोपेंही नाहीं. त्याचें महत्वाचें काम ह्मणजे फौजदारी खटल्याची चवकशी करणें आणि या अधिकारावर स्वाभाविकपणेंच अवलंबून असणारी इतर कामें पहाणें. आतां त्याचेकडे हेंच मुख्य आणि जवळ जवळ एकच काम उरलें आहे.

( १२४ ) १८८८ चा कायदा मंजूर होण्यापूर्वी लिहिलेल्या पुस्तकांत मेटलंड साहेब थट्टेनें लिहितात कीं, कितीतरी काळ लोटला, वकिलांनीं जस्टिसांच्या कामाचें व्यवस्थित वर्णन करण्याची आशा कधींच सोडून दिली आहे. त्यांचीं कामें इतक्या निरनिराळ्या प्रकारची आहेत कीं त्यांचा एकमेकांशीं संबंध दाखविण्याची शक्ति फक्त वर्णमालेच्या सूत्रांतच आहे. जस्टिसाला थोडें बहुत रेलरोडस, रेप, रेटस, ( कर ) रेकग्निझान्सेस, ( करारनामे ) रेकार्डस ( दप्तर ) आणि रिक्रिएशन ग्राउन्डस ( क्रीडाभुवनें ) यांचें काम पहावें लागे. परजरी ( खोटी साक्ष देणें ) पायरसी ( चांचेगिरी ) प्लेह्राउसेस ( नाटकगृहें ) यांचें किंवा डिसॉर्डर्लि-

हाउसेस ( बेकायदा घरें ) डिसेंटर्स ( सुधारक ) डॉग्ज आणि ड्रेनेज यांचे कामाशीं त्याचा संबंध असे.

**( १२५ ) जस्टिसांच्या अधिकाराचें स्वरूप व त्यांचा लौकिकः**—गेल्या शतकाच्या सुरुवातीस, सुधारणा होण्यापूर्वीची राष्ट्रसभा जितक्या अर्थानें प्रातिनिधिक होती तितक्या अर्थानें, ह्मणजे थोड्या अर्थानें नव्हे, निदान परगण्यांतील जनतेच्या दृष्टीनें तरि जस्टिस ऑफ दि पीसची जागाही प्रातिनिधिक होती. परगण्यांतील कुलीन सुखवस्तु गृहस्थांतील जरा विशेष संभावित माणसांस जस्टिस नेमण्यांत येतें, आणि ते ज्यांचा न्यायनिवाडा करितात त्या प्राधान्यें करून खेड्यापाड्यांतील लोकांचे त्यांच्या कायम हितसंबंधांत ते तत्वतः प्रतिनिधीच असतात. ही जागा निर्माण झाल्यापासून लोटलेल्या काळांतील निम्मेपेक्षां अधिक काळांत ती लोकप्रिय आहे हाच तिच्या वास्तविक प्रातिनिधिक स्वरूपाचा मनोवेधक पुरावा आहे. गेल्या शतकांत इंग्लंडांत मतदारीच्या हक्कांत केवढी तरी वाढ झाली, आणि प्रातिनिधिक संस्थांच्या घडणावळींत केवढाले फरक झाले. या नूतन सर्वव्यापी धोरणाला अनुसरून लोकप्रिय प्रतिनिधी निवडणुकीनें निवडण्याचें तत्व प्रचारांत आलें. तें तत्व लहान लहान विभागांस पूर्वीच लावण्यांत आलें होतें. तें आतां परगण्यांस लावून व्यवस्थितपणा आणण्याच्या स्पष्ट हेतूनें परगणा सल्लागारमण्डळें स्थापन करण्यांत आलीं आणि जमाबंदीचे व अंमलबजावणीचे अधिकार जस्टिसांच्या हातीं होते ते काढून या मंडळांचे हातीं सोपविण्यांत आले. पण हें सर्व होईतों जस्टिसांच्या जागेला वस्तुतः हातही लागला नाहीं. कारण, तिला सर्व बाजूंनीं अतिशय मान्यता प्राप्त झाली होती. ]

**( १२६ ) लॉर्ड लेफ्टेनंटः**—मेरी राणीच्या कारकीर्दीत ( १५५३-१५५८ ) राष्ट्रीय शिबंदीवर शेरिफाच्या ऐवजीं लॉर्ड लेफ्टनंट नांवाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली, आणि तोच राजसत्तेचा परगण्यांतील पुढें मुख्य प्रतिनिधि झाला. पुढें परगण्यांतील दफ्तरही त्याच्या ताब्यांत देण्यांत आलें. तेव्हां-पासून जस्टिसाच्या जागचें महत्व मावळलें. आतां त्यानें कोर्टाचे निवाडे बजवावेत आणि राष्ट्रसभेच्या निवडणुकीवर देखरेख करावी. शिबंदीचें आधिपत्य लॉर्ड लेफ्टेनंटाकडे १८७१ पर्यंत टिकलें. तेव्हांपासून आतां तें राजाच्या ह्मणजे मध्यवर्ती सत्तेच्याच हातांत आहे. ( क १०६–११० ).

[ ( १२७ ) आठव्या हेन्रीच्या कारकीर्दीत लॉर्ड लेफ्टनंटाची जागा निर्माण करण्यांत आली. परगण्यांतील वजनदार माणसांची या जागेवर नेमणूक करण्यांत येते. ही नेमणूक राजाकडून होत असून वस्तुतः जन्मभर असते. त्याचें महत्वाचें काम ह्मणजे मॅजि-स्ट्रेटच्या जागेवर नेमणूक करण्यासाठीं लायक माणसांची शिफारस करणें. ]

**( १२८ ) १८८८ तील सुधारणाः**—१८८८ सालीं लॉर्ड सॅलिस्बरीच्या प्रधानमंडळानें स्थानिक राज्यपद्धतींत बऱ्याच सुधारणा सुचविल्या. त्यांत ठिगळा ठिगळांच्या इंग्रजी पद्धतींत व्यवस्थितपणा आणि प्रमाणबद्धता उत्पन्न करण्याला आवश्यक असलेले सर्व फेरफार करण्याचें धाडस केलेलें नव्हतें. तरीपण त्या मंजूर होत्या तर गुंतागुंती कमी होऊन स्थानिक राज्यपद्धतींत पुरेसा साधेपणा आणि सारखेपणा आला असता. चालू पद्धतींत पुष्कळ निरनिराळे आणि भयंकर स्वरूपाचें घोंटाळे होते. सर्व

इंग्लंड देशाचे निरनिराळ्या कामाकरितां निरनिराळें विभाग केले होते. स्थानिक राज्यकारभार पहाण्यासाठीं आणि राष्ट्रसभेचें सभासद निवडण्यासाठीं परगणा आणि प्रतिनिधी निवडणारीं शहरें हे विभाग होते. आरोग्यासाठीं शहरें आणि खेडीपाडीं असे विभाग पाडण्यांत आले होते. गरिबांच्या कायद्यांचा अंमल करण्याकरितां पॅरिश व त्यांचे गट हे विभाग करण्यांत आले. सडकांसाठीं निराळेच विभाग निर्माण झाले. आणि शिक्षणाकरितां या सर्वांपेक्षां निराळे असे विभाग–जिल्हे अस्तित्वांत आले. हे निरनिराळे विभाग उत्पन्न करितानां व्यवस्थितपणाची इतकी उपेक्षा करण्यांत आली होती कीं कोणासही आचंबाच वाटेल. क्षेत्रफळ किंवा राज्यकारभार यांच्या दृष्टीनें त्यांचा एकमेकांशी काडीचाही संबंध नव्हता. यामुळें पुढील गोष्टींत घोंटाळा माजला होता व तो मोडणें आवश्यक होतें. ( अ ) एक विभाग दुसऱ्याचा पोटविभाग नव्हता. एका तऱ्हेच्या विभागाची हद्द दुसऱ्या तऱ्हेच्या दोनचार विभागांतही थोडथोडी वांटलेली असे. निरनिराळ्या विभागांची रचना करितानां त्यांच्या क्षेत्रमर्यादेचा काडीचाही विचार मनांत आणलेला नव्हता. ( आ ) यामुळें स्थानिक अधिकाऱ्यांचें एकमेकांशीं संबंध जोडणें शक्य नव्हतें. कोण कोणाच्या हाताखालीं हें ठरवावयाचें कसें ? व्यवस्था अशा तऱ्हेनें दुहेरी किंवा तिहेरी आणि घोंटाळ्याची झाल्यामुळें नेहमींच पैशाचा अपव्यय होऊन काम बरोबर होत नसें. ( इ ) स्थानिक अधिकारी निवडण्याच्या वेळा, पद्धती आणि निवडणुकीचे हक्क हींही सर्व अगदीं वेगवेगळ्या प्रकारचीं असत. आणि ( ई ) स्थानिक करांच्या व्यवस्थेंत अमर्याद गुंतागुंत होती. स्थानिक स्वराज्याच्या

निरनिराळ्या अंगासाठीं लागणारे कर, उदाहरणार्थ गरिबांकरितां, सडकाकरितां, परगण्याकरितां वगैरे, वेगवेगळाले वसवीत आणि उत्पन्नही वेगवेगळ्या तऱ्हेनें आणि निरनिराळ्या नोकरांमार्फत वसूल करीत, त्यामुळें खर्चांपरी खर्च वाढून कर भरणारांसही अतिशय त्रास सोसावा लागे.

( १२९ ) प्रधानमंडळानें सुरुवातीला असें सुचविलें कीं मोठे-मोठाल्या शहरांबाहेर राज्यकारभारासाठीं परगणे व जिल्हे हे विभाग करून हा घोंटाळा अंशतः तरि मोडावा. गरिबांस मदत करण्याकरितां पॅरिश व यूनियन हे जे विभाग होते त्यानां हातही लावण्यांत येणार नव्हता. व्यवस्थेस व एकीकरणास प्रारंभ करावयाचा होता तो परगणा आणि जिल्हे यांस स्थानिक स्वराज्याचीं सत्ताधारी साधनें बनवून. या सुधारणांचा असा हेतु होता कीं, सर्व लहान लहान विभागांस परगण्यांचे पोटविभाग बनवावें व त्यांच्यात व मोठ्या विभागांत परस्पर संबंध उत्पन्न करण्यासाठीं क्षेत्रमर्यादेची विस्तृत प्रमाणांत पुनर्रचना करावी. परगणे व जिल्हे यांस लोकनियुक्त सल्लागारमंडळें देऊन शेवटीं करांचें सर्व काम त्या मंडळांकडे सोंपवावें आणि या सल्लागार मंडळांतील सभासदांची निवडणूक करण्याचा हक्क राष्ट्रसभेच्या व स्थानिक निवडणुकीच्या हक्कासारखाच विस्तृत व सोपा करण्यांत यावा.

( १३० ) परन्तु या सर्व सुधारणा राष्ट्रसभेला एकदम पचल्या नाहींत. त्यांतील कांहीं भाग राष्ट्रसभेनें मंजूर केला. जिल्हे बनविण्याची योजना गाळण्यांत येऊन परगण्यांची मात्र पुनर्रचना करण्यांत आली. प्रतिनिधी निवडणाऱ्या मोठाल्या शहरांस परगण्यांच्या बरोबरीचे अधिकार मिळाले आणि लहान शहरांचा

परगण्यांतील पुनर्रचित राज्यपद्धतीशीं नवीन आणि दृढ असा संबंध घालून देण्यांत आला. लंडन शहरासही परगण्यांतील पद्धती-सारखी राज्यपद्धति मिळाली. खेड्यांतील राज्यकारभाराचा परगण्यांतील नवीन पद्धतीशीं एकजीव होण्यास आणखी सहा वर्षें लागलीं ( १८९४ ).

**( १३१ ) राजकीय परगणे व परगणावजा शहरें:-** अशा रीतीनें छाटाछाट होऊन मंजूर झालेल्या कायद्यानें कांहीं शहरांस परगण्यांचे अधिकार देण्यांत आले व त्या शहरांस परगणावजा शहरें असें म्हणण्याचा प्रचार पडला. कायदा मंजूर झाला तेव्हां पन्नास हजारांवर असलेल्या लोकवस्तीच्या व तो मंजूर होण्यापूर्वींच ज्यानां परगण्यांबरोबरचे हक्क मिळाले होते अशा शहरांनां ( सर्व मिळून ६१ ) परगणावजा शहरें बनवून परगण्यांचे हक्क व त्यांचा दर्जा हीं देण्यांत आलीं. त्याचा अर्थ असा नव्हे कीं शहरानां परगण्यांप्रमाणें राज्यपद्धति प्राप्त झाली. याचा अर्थ अगदीं उलट आहे. परगण्यांत चालू असलेली पद्धत शहरांत चालू करण्याऐवजीं शहरांत प्रचारांत असलेली पद्धत परगण्यानां लागू करण्यांत आली. या कायद्यानें शहरानां ' परगणावजा ' शहरें म्हणण्याऐवजीं परगण्यांनां ' शहरवजा ' परगणे म्हटलें असतें तर तें कदाचित् थोडें कमी सोईचें होतें तरी अधिक अन्वर्थक झालें असतें. या नवीन योजनेचें ' परगण्याच्या राज्यकारभार पद्धतीला कांहीं बिन महत्वाचे फेरफार करून १८८२ चा कार्पोरेशन ॲक्ट लागू करण्याचा कायदा ' असें जें वर्णन करण्यांत आलें आहे तें यथायोग्य आहे. १८८२ च्या म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्टांतील मुख्यमुख्य कलमें १८३५ सालीं ही अस्तित्वांत होतीं.

[ ( १३२ ) या कायद्यानें निर्दिष्ट झालेल्या परगण्यानां ' राजकीय परगणे ' असें जें नांव देण्यांत आलें आहे तें अशाकरितां कीं, हे सर्वच, नकाशावरील पूर्वापार चालत आलेले ऐतिहासिक परगणे नाहींत. पुनर्घटनेसाठीं पुष्कळ वेळां जुन्या परगण्याचे विभाग करावे लागले. उदाहरणार्थ यार्कशायरचा पूर्व भाग ( र.यडिंग ) हा एक राज्यकारभाराचा स्वतंत्र परगणा बनविण्यांत आला. उत्तरभाग हा दुसरा आणि पश्चिमभाग हा तिसरा. सफोक व ससेक्स या परगण्यांचेही प्रत्येकीं पूर्व आणि पश्चिम विभाग आहेत. राज्यकारभारासाठीं लिंकनचे तीन परगणे करण्यांत आले आहेत. परगण्यांचे हक्क ज्यानां प्राप्त झालेले नाहींत अशीं ५०००० पेक्षां कमी लोकवस्तीचीं शहरें तीं ज्या परगण्यांत आहेत त्या परगण्यांतच थोड्या बहुत प्रमाणांत मिसळून टाकण्यांत आलीं आहेत. ]

**( १३३ ) परगणासल्लागारमण्डळेंः त्यांची रचना-** परगण्यांतील राज्यकारभारपद्धति शहरांतील पद्धतीसारखी करण्याच्या अनुसंधानामुळें परगण्यानां लोकनियुक्त सल्लागारमंडळें देण्यांत आलीं आहेत. या मंडळांत दोन तऱ्हेचे सभासद असतात, कौन्सिलर्स आणि आउल्डरमेन. त्यांच्या अध्यक्षाचा हुद्दा व अधिक.र शहरांतील मेयर ( कोतवाल ) च्या हुद्याप्रमाणें व अधिकारासारखे असतात. तीं अस्तित्वांत येण्यापूर्वी जस्टिस ऑफ दि पीस यांचेकडे असलेला राज्यकारभाराच्या अधिकारीचा सर्वसंग्रह ( क. १२३-१२५ ) त्यांना नवीन मिळावयाच्या सत्तेची पूर्व तयारी म्हणून या मंडळांकडे सुरवातीलाच देण्यांत आला. त्यांतील सभासद दोन तऱ्हेचे असले तरि ते सर्व एकाच

ठिकाणीं बसतात. त्यांच्यांत भिन्नता आहे ती निवडणुकीच्या पद्धतींत; कामांत किंवा अधिकारांत नव्हे. काउन्सिलरांस मतदार प्रत्यक्षतः निवडतात आणि त्यांच्या अधिकाराची कालमर्यादा तीन वर्षांची आहे. आउल्डरमेन यांची संख्या काउन्सिलरांच्या संख्येच्या एकतृतीयांश असते. त्यांची निवडणूक काउन्सिलर आपल्यांतूनच किंवा काउन्सिलांत नसलेल्या लायक मतदारांतून करितात. त्यांची अधिकारमर्यादा सहा वर्षांची असते; मात्र त्यांचे-पैकीं निम्मे सभासदांची निवड दर तीन वर्षांनीं करण्यांत येते. मंडळाच्या सभासदत्वाचा हक्क स्त्रियांसही देण्यांत आलेला आहे. हे काउन्सिलर्स व आउल्डरमेन आपल्या अध्यक्षाची एक वर्षा-पुरती निवड करितात आणि त्याला त्यांच्या दृष्टीनें पुरेसा होईल इतका पगार देतात. नोकरीच्या या एक वर्षांच्या मुदतींत सर्व-साधारणपणें नेहमीं जे अध्यक्षांस अधिकार असतात ते सर्व त्याला असतात. स्वतंत्रपणें अंमलबजावणी करण्याचा अधिकार मात्र त्याला नाहीं. अध्यक्ष असतानां त्याला जस्टिस ऑफ दि पीसचे अधिकारही असतात.

[ ( १३४ ) परगण्यांत मालमत्ता असल्या कारणानें ज्याला मत देण्याचा अधिकार आहे अशा कोणत्याही माणसाला मग तो परग-ण्यांत रहात असो वा नसो उमेदवार ह्मणून उभें राहतां येतें. शहरांच्या घटनेवरूनच परगण्यांची घटना तयार करण्यांत आली आहे. परन्तु शहरांत जरि उमरावांस आणि धर्मखात्यांतील कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांस सल्लागार मंडळांत जातां येत नाहीं तरि परगण्यांत हा निबंध काढून टाकलेला आहे.

(१३५) **काउन्सिलरांची संख्या** आणि स्वाभाविकपणें तीवरच अवलंबून राहणारी आाउल्डरमेन यांची संख्या ही परगण्यापरगण्यांत स्थानिक स्वराज्यमंडळाच्या हुकुमानें ठरविण्यांत आलेली असून सर्वच परगण्यांत सारखी नाही. लँकेशायरच्या सल्लागार मंडळांत सर्व मिळून १४० सभासद आहेत. यॉर्कशायरच्या पश्चिम भागच्या मंडळांत १२० आणि 'डेव्हन' च्यांत १०४ आहेत. रटलंडचें मंडळ सर्वांत लहान असून त्यांत फक्त २८ सभासद आहेत. प्रत्येक परगण्याची सरासरी साधारणपणें ७५ आहे.

(१३६) ज्यानां परगण्याप्रमाणें स्वतंत्र हक्क आहेत अशीं शहरें वगळून बाकीच्या परगण्याचें निवडणुकीसाठीं विभाग करण्यांत आले आहेत. परगणा मंत्रिमंडळांत जितके काउन्सिलर निवडावयाचे असतात तितके परगण्याचे निरनिराळे विभाग करण्यांत येतात. विभागाची संख्या स्थानिक स्वराज्यमंडळानें ठरविलेली आहे. त्यांची क्षेत्रमर्यादा ठरविण्याचें आणि विभागणी करण्याचें काम तिमाही सेशनांकडे होतें. मोठमोठ्या स्वतंत्र शहरांच्या विभागांची क्षेत्रमर्यादा आणि रचना शहर मंत्रिमंडळें ठरवितात. हे विभाग ठरवितांना लोकवस्तींतील सांपत्तिक उच्चनीचभाव आणि खेड्यापाड्यांतील व शहरांतील लोकवस्तीचें प्रमाण यांकडे पूर्णपणें लक्ष्य पुरविण्यांत आलें आहे.

(१३७) परगण्यांतील किंवा शहरांतील सल्लागार मंडळाच्या शिफारसीवरून स्थानिक स्वराज्यमंडळानें हुकूम काढिला असतां काउन्सिलरांची संख्या आणि विभागांची क्षेत्रमर्यादा बदलण्यास हरकत नाहीं.]

(१३८) परगण्यांतील मतदारी हक्कः—ढोबळ तऱ्हेनें असें ह्मणण्यास हरकत नाहीं कीं सभासदांची निवडणूक परगण्यांत ह्मणजे परगण्यांतील कर भरणाऱ्या रहिवाश्यांकडून करण्यांत येते. परगण्यांत किंवा परगण्यापासून सात मैलाच्या टापूंत राहून कर भरणाऱ्या इसमाचें नांव मतदारपटावर दाखल केलेलें असलें कीं त्याला मत देण्याचा हक्क प्राप्त होतो. ज्याच्यावर कर भरावयाचा तें घर, वखार, दुकान, हिशेबाचे कागदपत्र ठेवण्याची जागा, किंवा दुसरी कसलीही इमारत एकट्याच्या किंवा भागीदारांच्याही ताब्यांत असली तरी हरकत नाहीं. मतदाराच्या पटावर नांव दाखल होण्यास स्त्री किंवा पुरुषमतदार एक वर्षभर तरि परगण्यांत रहात असला पाहिजे. परकीय, कायद्यानें नालायक ठरविलेले, लांच घेतलेले, भिकारी, गुन्हेगार वगैरे लोकांस मताचा हक्क नाहीं.

[(१३९) ज्याच्या जमिनीचें उत्पन्न सालिना १० पौंड आहे आणि जो परगण्यांत किंवा परगण्यापासून सात मैलांत राहतो तो सहा महिन्यांचाच रहिवासी असला तरि त्याला मत देण्याचा हक्क मिळतो. स्वतंत्रपणें एकट्या राहणाऱ्या अविवाहित, व विधवा स्त्रियांसही वर सांगण्यांत आलेली लायकी त्यांस असेल तर मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो.]

(१४०) परगणा कौन्सिलचे अधिकारः—प्रत्येक परगण्यांतील कौन्सिल ही सनदी (कार्पोरेट,) संस्था असल्याकारणानें त्याला आपल्या नांवाचा शिक्का करितां येतो, मालमत्ता धारण करितां येते व पोटकायदे करितां येतात. मात्र अपक्रियेबद्दलचे (न्युइसन्स्) कायदेखेरीज करून इतर पोटकायद्यांना

स्वराष्ट्रीय प्रधानाची मंजुरी पाहिजे. प्रीव्हिकौन्सिलच्या हुकुमानें ते रद्द करितां येतात.

( १ ) परगण्यांतील सार्वजनिक मालमत्ता सल्लागारमंडळाच्या ताब्यांत असते, व तेंच तिची व्यवस्था पहातें. परगण्याच्या उपयोगासाठीं त्याला जमीन किंवा इमारती कौलानें किंवा विकत घेण्याचा अधिकार आहे.

( २ ) परगण्यांतील भिकाऱ्यांची व वेड्यांची आश्रयस्थानें ( असायलम् ) चालविण्याचें, त्यांची व्यवस्था पहाण्याचें व जरूर भासेल तेव्हां नवी आश्रयस्थानें काढण्याचें व त्याप्रमाणेंच अल्पवयी गुन्हेगारांस सुधारण्याकरितां आणि औद्योगिक शाळा काढण्याचें, त्या चालविण्याचें किंवा त्यास मदत देण्याचें काम कौन्सिल-कडेच आहे.

( ३ ) परगण्यांतील पूल आणि सर्व मोठ्या सडका दुरुस्त ठेवण्याचें काम त्याच्यावरच सोंपविण्यांत आलें आहे. शहरांच्या हद्दींतील म्हणून ज्या रस्त्यांची व्यवस्था शहरांतील अधिकाऱ्यांनीं आपल्याकडे राखून ठेविली आहे त्यांच्याशीं या मंडळाचा संबंध नाहीं. पॅरिशांतील सडकांवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनीं चांगल्या तऱ्हेनें दुरुस्त केलेला रस्ता त्याच्यावर मोठी रहदारी चालण्यासारखी आहे असें वाटल्यास कौन्सिलास आपल्या ताब्यांत घेतां येतो.

( ४ ) गुराढोरांचे संसर्गजन्य रोग, शेत बागाइताचा नाश करणारे किडे, सुकविलेले मासे आणि मापें वजनें यांच्या कायद्यांची तें अंमलबजावणी करतें.

( ५ ) परगणा खजीनदार, कॉरोनर, मोजणीदार, रसायनशास्त्रज्ञ आणि ज्यांचा पगार परगण्यांतील करांतून देण्यांत येतो असे सर्व अधिकारी मंडळच नेमतें. तेंच त्यास पगार देतें व नोकरी वरून काढूनही टाकतें. न्यायखात्याकडील कारकुनांवर मात्र त्याची सत्ता नाहीं. आरोग्यरक्षक अधिकारी जरी मंडळाकडे रिपोर्ट न करितां ( त्याच्याकडे फक्त नक्कल पाठविण्यांत येते ) स्थानिक स्वराज्यमंडळाकडे परस्पर रिपोर्ट करितात तरी त्यांच्यावरही मंडळाचाच तावा असतो. त्याला आरोग्यरक्षणाच्या कायद्यांच्या अंमलबजावणीच्या बाबतींत जरूर भासेल तेव्हां स्थानिक स्वराज्य-मंडळाकडे आरोग्यरक्षक अधिकाऱ्यांविरुद्ध अर्ज करितां येतो.

( ६ ) मंडळच कॉरोनरची फी ठरवितें आणि कॉरोनरच्या कामासाठीं परगण्याचे वाटतील तसे विभाग करतें.

( ७ ) तें राष्ट्रसभेच्या निवडणुकीसाठीं परगण्याचे निवडणुकीचे विभाग करितें. तेंच मत देण्याच्या जागा ठरवितें, व मत-नोंदणीवर देखरेख ठेवतें.

( ८ ) तें देवळांची व शास्त्रीय संघ आणि धर्मादाय देणग्या यांच्या नियमांची नोंद ठेवतें.

[ ( १४१ ) या अनेकविध अधिकारांचें वर्गीकरण करणें किंवा त्यांबद्दल सर्वसाधारणपणें कांहीं सांगणें अशक्य आहे हें उघडच आहे. त्यांची फक्त जंत्रीच देतां येईल. हे अधिकार म्हणजे सर्वतोपरी नसले तरी बहुतांशीं पूर्वी एकदां जस्टिस ऑफ दि पीस यांच्याकडे सोंपविण्यांत आलेले अधिकार होत. ]

( १४२ ) परवाने देण्याचा अधिकार हा अर्धवटपणें न्यायसंबंधीं ( ज्यूडीशिअल् ) अधिकार असल्याकारणानें जस्टिस

ऑफ दि पीस यांचे हातांत राखून ठेवण्यांत आला आहे. परन्तु गायनवादन आणि नर्तन याकरितां बांधलेल्या घरांना, नाटकगृहांना आणि स्फोटकद्रव्यें बाळगण्याला लागणारे परवाने देण्याचें काम परगणामंडळाकडे देण्यांत आलें आहे.

[ ( १४३ ) १८८८ च्या कायद्यांतील एका कलमानें परगणा-मंडळांस नाटकगृहांना आणि स्फोटक द्रव्यें बाळगण्याला लागणारे परवाने देण्याचें काम छोट्या सेशनांत काम करणाऱ्या जस्टिसांकडे देण्याची परवानगी देण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें गुराढोरांच्या-संसर्गजन्य रोगांविषयींच्या कायद्यानें प्राप्त झालेले अधिकारही मंडळाला जस्टिसांस देतां येतात. ]

( १४४ ) **जमाखर्चाचे अधिकार** देखील या मंडळांस विस्तृत आणि महत्वाचे असे आहेत. पूर्वी पोलिस, परगणा व शतग्राम किंवा प्रांत याच्या करितां कराचा आकार ठरविण्याचा, ते बसवण्याचा व वसूल करण्याचा आणि वसूल केलेले कर निरनिराळ्या खात्यांस खर्चीकरितां वाटून देण्याचा अधिकार जस्टिसांकडे असे; आतां तो या मंडळाच्या हातीं आहे. कर कोणत्या तत्वांवर व किती प्रमाणांत बसवावे हे ठरविण्याच्या अधिकारावर मात्र तिमाही सेशनांत अपील करितां येतें. परगण्यांतील निरनिराळ्या कर्जांची व्यवस्था लावण्यासाठीं, परगण्यासाठीं मालमत्ता विकत घेण्यासाठीं किंवा कायमची लोकोपयोगी कामें ( सडका, तलाव, पूल वगैरे ) हातीं घेण्यासाठीं त्याला परगण्याच्या उत्पन्नाचें तारण लावून स्थानिक स्वराज्य मंडळाच्या मंजुरीनें कर्ज काढतां येतें. परगण्यांत चौकशी करून ही मंजुरी द्यावयाची कीं नाहीं हें स्था. स्व. मं. ठरवितें आणि मंजुरी दिल्यास कर्ज फेडीची मुदत ठरवून टाकतें. कायद्याप्रमाणें ही मुदत तीस वर्षांपेक्षां अधिक असतां कामा नये.

१६५०

[ ( १४५ ) कौन्सिलास परगण्यांतील कर आकारावयाच्या मालमत्तेच्या किंमतीच्या एक दशांपेक्षां अधिक कर्ज असल्यास किंवा नवीन कर्जानें तें एक दशांशावर जाण्याजोगें असल्यास नवीन कर्ज काढतांना राष्ट्रसभेची मंजुरी मिळवावी लागते. स्थानिक स्वराज्य मंडळांच्या मंजुरीनें परगणा मंडळास कर्जरोखे ( स्टॉक्स ) ही काढतां येतात.

( १४६ ) **कौन्सिलचे आणखी कांही अधिकारः—** १८८८ च्या कायद्यांत अशी तजवीज केली आहे कीं विशिष्ट भागांच्या अधिकाऱ्यांस तात्पुरत्या कायद्यानें जे अधिकार देण्यांत आले असतील ते कौन्सिलास देण्यांत आलेल्या अधिकारांच्या स्वरूपाचे असतील तर स्थानिकस्वराज्यमंडळाच्या हुकुमानें ते त्या अधिकाऱ्यांच्या हातांतून काढून परगणा मंडळाच्या हातीं देतां यावेत. त्याचप्रमाणें परगण्यांतील कामाला अवश्य असलेले परंतु खासगत सल्लागारमंडळ, हुजूरचिटणीस, व्यापार-मंडळ, किंवा खुद्द स्थानिक स्वराज्यमंडळ यांच्या हातांत गेलेले अधिकार स्थानिक स्वराज्यमंडळाच्या तात्पुरत्या हुकुमानें परगणामंडळाकडे देतां येतील. मात्र ते अधिकार कायद्यानें निर्माण केलेले असले पाहिजेत आणि ज्या खात्यांशीं त्यांचा संबंध असेल त्यांनीं ते कौन्सिलास देण्याला संमति दिली पाहिजे. ]

( १४७ ) **परगण्याचें अन्दाजपत्रकः—**जमाखर्ची वर्षाच्या आरंभीं ( १ एप्रिल ) वर्षांत उत्पन्न किती होईल आणि किती खर्च करावा लागेल यांचें अन्दाजपत्र कौन्सिलला सादर करण्यांत येतें; आणि त्याच्या आधारावर खर्चाच्या रकमांचा अंदाज करून कर कसे बसविले पाहिजेत तें कौन्सिल ठरवितें.

दोन सहामाहींकरितां दोन निराळीं अंदाजपत्रकें केलेलीं असतात, आणि कर वाढविले पाहिजेत कीं कमी केले असतां चालेल याचा पहिल्या सहामाहींत अनुभव आला असेल त्याप्रमाणें दुसऱ्या सहामाहींत अंदाजपत्रकांत दुरुस्ती करण्यांत येते.

( १४८ ) प्रत्येक वर्षी वसूल झालेला पैसा आणि खर्च झालेल्या रकमा यांचे हिशेब स्था. स्व. मंडळानें ठरविलेल्या तऱ्हेनें ठेवून ते त्या मंडळाकडे पाठविण्यांत येतात. या हिशेबांचे तक्ते दरसाल राष्ट्रसभेच्या दोन्ही सभांपुढें मांडावे लागतात. स्थानिक स्वराज्यमंडळानें नेमलेल्या हिशेबतपासनिसाकडून ते तपासविण्यांत येतात. परगण्यांतील खजिनदारानें ठेवलेला हिशेब परगणामंडळ स्वतः तपासितें.

( १४९ ) स्थानिक कर बसविण्यांत येतात ते फक्त स्थावर मिळकतीवरच. १८८१ सालचा कायदा मंजूर होईतों राष्ट्रसभा राष्ट्रीय तिजोरींतून परगण्यास मदत असे. त्यावेळीं अशी समजूत होती कीं स्थानिक कारभाराचा खर्च बहुतांशीं जंगम मिळकती वर वसूल केलेल्या करांच्या रकमेंतून देण्यांत यावा. १८८८ च्या कायद्यानें नवीन व्यवस्था अमलांत आली. परगण्यांतील स्थानिक खर्च भागविण्यासाठीं राष्ट्रीय तिजोरींतून ठराविक परवान्यांचें उत्पन्न ( त्यांची एक लांबलचक यादी आहे ) आणि वारसदारीच्या हक्का वरील करांचें दोन पंचमांश उत्पन्न परगण्यांस देण्याचें ठरलें. हा खर्च विशेषतः भिकारी व भिकाऱ्यांचीं व वेड्यांचीं आश्रयगृहें यांवर व्हावयाचा असून त्यावर स्थानिक स्वराज्य मंडळाची देखरेख असते.

( १५० ) फौजदारी अधिकार पूर्वी जस्टिस ऑफ दि पीस यांचेकडे होते, ते आतां तिमाही सेशनें आणि परगणा

सभागार मंडळें या दोघांच्या कमिटीकडे देण्यांत आले आहेत. या कमिटींतील निम्मे सभासद जस्टिस निवडतात व निम्मे कौन्सिलर निवडतात. तिच्या अध्यक्षाची निवडणूक चिठ्या टाकून करण्यांत येते. या कमिटीची नेमणूक झाल्यावर ती काम करिते ती अगदीं स्वतंत्रपणें; सेशनें किंवा कौन्सिलें यांची पोट-कमिटी ह्मणून नव्हे. कमिटीची काल मर्यादा ठरविणें मंडळाच्या हातीं आहे.

( १५१ ) पॅरिश हे विभाग फार पूर्वी पासून ह्मणजे इंग्लण्डांत ख्रिस्तीधर्माची संस्थापना झाली तेव्हां पासून ( ७ वें शतक ) अस्तित्वांत आहेत. परंतु इंग्रजी इतिहासाच्या सुरुवातीचा पॅरिश आणि स्थानिक स्वराज्यान्तर्गत आजचा पॅरिश या दोहोंत नाम सादृश्यापेक्षां अधिक संबंध नाहीं. ख्रिस्तिधर्माची प्रतिष्ठापना झाल्यावर धर्मखात्याची व्यवस्था सुसंघटित करण्या-साठीं राज्यव्यवस्थेचा आद्य घटक जो ग्राम तोच साधारणपणें धर्मखात्याचा आद्य घटक ठरविण्यांत आला व त्याला पॅरिश हें नांव मिळालें. गांवाची लोकसंख्या फार मोठी असल्यास त्याचे निरनिराळे पॅरिश करण्यांत आले. ती फारच लहान असल्यास निरनिराळे गांव मिळून पॅरिश बनविण्यांत आला. बरेच पॅरिश मिळून शतग्राम किंवा प्रांत होत असे. प्रांत हे परगण्याचे विभाग आहेत, परंतु प्रांतांना खरें महत्व असें राहिलेंच नाहीं. तेव्हां आपण आपलें लक्ष्य पुराणकाळच्या पॅरिश कडेच वळवूं. त्या काळच्या पॅरिशांच्या क्षेत्र मर्यादा आज बहुतांशीं बद-लेल्या आहेत. पॅरिश हा विभाग अगदीं खालच्या पायरीचा धर्माधिकारी जो प्रीस्ट याच्या ताब्यांत देण्यांत आला. गांवचा

कोतवाल ( रीव्ह ) आणि दुसरे चार प्रतिनिधी यांचे बरोबर हा धर्माधिकारी शतग्राम किंवा प्रांत सभेंत गांवाचा प्रतिनिधी ह्मणून जात असे. ( क. ४ ) पुष्कळ शतकें पावेतों ख्रिस्तीधर्मानें ज्यांचा अंगिकार केला आहे अशाच पुरुषांस नागरिकत्वाचे हक्क असत. ख्रिस्तमतानुयायित्व आणि नागरिकत्व यांची पूर्ण व्याप्ति होती, कायद्याच्या दृष्टीनें आजही ती तशीच आहे. तेव्हा स्वाभाविकपणेंच देवालयांचे पंच निवडण्यासाठीं आणि त्यांच्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यासाठीं ख्रिस्त मतानुयायी नागरिकांची व्हेस्ट्री ह्मणून जी संस्था होती तिचेच सर्व सभासद ग्राम सभेचेही सभासद असत. एकदां धर्मसभा ह्मणून जे सभासद जमत तेच, दुसऱ्यावेळीं ग्रामपंचायत ह्मणून काम करीत. जहागिरदारांच्या न्याय कचेऱ्यांनीं ग्रामपंचायतीस खो दिला तेव्हां व्हेस्ट्री हाच काय तो स्थानिक स्वराज्याचा अवशेष शिल्लक राहिला. जहागिरदारांचे पाश देवालयांवर पडले नाहींत. त्यांचें स्वातंत्र्य कायम राहिलें. त्यांच्या बरोबर व्हेस्ट्री ही बचावली, आणि जहागिरदारांस दिलेल्या प्रचंड अधिकारांच्या बरवंट्या खालीं जे थोडे बहुत मुलकी अधिकार शिल्लक राहिले ते व्हेस्ट्रीच्या मार्फत उपभोगण्यांत लोक आनंद मानूं लागले.

( १५२ ) **भिकाऱ्यांचा कायद्याचा पॅरिशवर झालेला परिणाम:**—अशा तऱ्हेनें धार्मिक बाबतींशी ज्यांचा काडीचाही संबंध नाहीं अशा इतर व्यवहारांसाठींही गांवांना पॅरिश असेंच ह्मणण्याचा प्रघात पडला, आणि त्यामुळें धर्मव्यवहाराचा पॅरिश आणि राज्य व्यवहाराचा पॅरिश असा भेद करणें आवश्यक झालें. पूर्वी सर्व राज्यांत एकंदर १०,००० पॅरिश होते. त्यांच्या

क्षेत्रफळाचें आणि लोकसंख्येचें प्रमाण अगदीं वेगवेगळें असें. निरनिराळ्या पॅरिशांच्या आकारांत अगदीं सुरुवातीपासूनच फरक आहे. लोकसंख्येंतील बेसुमार फरक मात्र गेल्या शतकांतच वाढला. तो इतका वाढला कीं दाट वस्तीच्या पॅरिशांचे पोट-विभाग करून आणि राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं नवीन पॅरिश निर्माण करून त्यांची एकंदर संख्या १०,००० वरून १४,००० वर गेली तरि देखील कांहींची लोकसंख्या ३०० पेक्षां कमी तर कांहींची ३,००,००० पेक्षां जास्त अशी स्थिति आहे. व्हेस्ट्रींत पूर्वीं फक्त देवालयांच्या पंचांचीच निवड करण्यांत येत असे पण पुढें तिला रस्त्यावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची व असे सरांची ही निवड करण्याचा हक्क मिळाला. सोळाव्या शतकांत आठव्या हेन्रीच्या कारकीर्दींत ( १५३५ ) देवालयांच्या पंचाकडे भिकाऱ्यांस मदत करण्याचें काम देण्यांत आलें. इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत ( १५६३ ) पॅरिश हे राज्यकारभाराचे स्वतंत्र घटक बनविण्यांत आले व भिकाऱ्यांवर देखरेख करण्यासाठीं नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यांत आली. भिकाऱ्यांस मदत करण्यासाठीं निराळी पट्टी वसूल करण्याचें तत्व मान्य करण्यांत आलें. अशा तऱ्हेनें पॅरिशांस सांप्रतचे स्वरूप प्राप्त होऊं लागलें. गेल्या शतकांत नवीन कायदे करून राज्यकारभाराच्या निरनिराळ्या साधनांची पुनर्घटना करण्यांत आली त्यांत पॅरिशांचीही पुनर्घटना झाली आहे. राज्य कारभाराच्या सोयीसाठीं जे फेरफार करण्यांत आले त्यामुळें आजच्या राज्यकारभाराच्या पॅरिशचा पूर्वकालच्या राज्यकारभाराच्या पॅरिशशीं किंवा धर्मसंबंधी पॅरिशशीं कांहींच मेळ बसत नाहीं. परन्तु पॅरिशमधिल जुन्या संस्था आणि

भिकाऱ्यांस मदत करण्याचीं कामें अजूनही शिल्लक राहिलीं आहेत. १८९४ पर्यंत पॅरिश मधील मुख्य अधिकार पुरातन काळापासून चालत आलेल्या व्हेस्ट्रीकडेच चालू होता. तिची सत्ता जरी सारखी कमी होत गेली होती तरि तिचें आसन अजूनहि स्थिर होतें. १८८८ सालीं स्थानिक स्वराज्याच्या पुनर्घटनेला सुरुवात झाली आणि १८९४ सालीं हें पुनर्घटनेचें काम पूर्ण झालें. निदान खेड्यापाड्यांतील पॅरिशांत तरी व्हेस्ट्रीकडे फक्त धर्मसंबंधीं तेवढेंच काम राहिलें. पॅरिशमध्यें नवीन लोकसत्ताक संस्था अस्तित्वांत आली आणि पॅरिश हा स्थानिक स्वराज्याचा पूर्ण आणि स्वतंत्र असा घटक बनला.

**( १५३ ) १८९४ सालच्या सुधारणाः**—स्थानिक स्वराज्याच्या बाबतींत गेल्या शतकांत जे कायदे करण्यांत आले त्या सर्वांत, मग ते नवीन संस्था निर्माण करण्यासाठीं करण्यांत आलेले असोत किंवा त्यांची सुधारणा करण्यासाठीं केलेले असोत, शहरी आणि खेड्यापाड्यांतील किंवा बिनशहरी विभागांतील भेद काळजीपूर्वक पाळण्यांत आला आहे. १८९४ सालच्या कायद्यांतही त्याकडे दुर्लक्ष्य करण्यांत आलें नाहीं. शहरांतील किंवा ज्यानां स्थानिक स्वराज्याचे शहरांप्रमाणें अधिकार मिळाले आहेत अशा दाटवस्तीच्या भागांतील पॅरिशांवर या कायद्यानें प्रत्यक्ष असा परिणाम घडला नाहीं. परन्तु बिनशहरी पॅरिशांची संघटना आणि अधिकार यांच्यात मात्र क्रान्ती घडून आली आहे. या कायद्यानें पॅरिश स्वसत्ताक बनले असून त्यानां अत्यंत महत्वाचे असे कितीतरी अधिकार आणि हक्क प्राप्त झाले आहेत.

(१५४) प्रत्येक लहान मोठ्या बिनशहरी पॅरिशांत पॅरिश सभा असते. राष्ट्रसभेचा किंवा परगणा सल्लागारमण्डळाचा (क. १३८-१३९) सभासद निवडण्याचा ज्यांना हक्क आहे (क. ६८-६९) असे २१ वर्षांवरचे सर्व स्त्रीपुरुष या सभेचे सभासद असतात. अविवाहित स्त्रियांप्रमाणें विवाहित स्त्रियांसही सभासदत्वाचा हक्क आहे. ३०० पेक्षां कमी लोकवस्तीच्या पॅरिशांत पॅरिशचा कारभार पाहण्याची सत्ता पॅरिशसभेच्याच हातांत असते. परगणा सल्लागारमंडळास योग्य वाटल्यास पॅरिशसभेच्या अनुमतीनें अशा पॅरिशांत पॅरिशसल्लागारमंडळ स्थापितां येतें. (१८९४ सालीं अशा तऱ्हेचे सहा हजार पॅरिश होते.) सर्वत्र तीनशेंपेक्षां अधिक वस्तीच्या पॅरिशांत त्यांचा कारभार पाहण्यासाठीं पॅरिश सल्लागारमंडळें स्थापण्यांत आली आहेत. सल्लागारांची निवडणूक करण्याचा आणि सार्वजनिक वाचनालयें, स्नानगृहें, धोबीखाने, रोषनाई, रखवाली, दफ़न व लोकोपयोगी सुधारणा (पब्लिक इंप्रुव्हमेंट) या बद्दलचे कायदे लागू करून घेण्याचा अधिकार पॅरिश सभेचा आहे. पॅरिश सल्लागारमंडळाचे सभासद पांच ते पंधरापर्यंत असतात. त्यांची संख्या किती असावी हें परगणा सल्लागारमंडळ ठरवितें.

[ (१५५) सल्लागारमण्डळें नसल्याकारणानें ज्यांचा कारभार पॅरिश सभाच पहातात अशा पॅरिशांत प्रत्यक्ष कारभार करण्यासाठीं एक किंवा अधिकही कार्यकारी मंडळें नेमण्यांत येतात. अशा पॅरिशांत मागील कलमांत सांगितलेल्या कायद्यापैकीं जर कांहीं लागू करून घेतलेले असले तर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी कमिशनर निवडण्यांत येतात. बऱ्याचशा पॅरिशांत

परगणा सल्लागारमंडळानीं पॅरिश सल्लागारमंडळें स्थापिलींच आहेत, आणि जेथें पॅरिशमंडळें आहेत तेथें पॅरिशसभेच्या वतीनें तींच हीं सर्व कामें पहातात.

( १५६ ) पॅरिश सल्लागारमण्डळाच्या अध्यक्षाला त्याच्या परगण्यांत जस्टिस ऑफ दि पीसचे अधिकार असतात. प्रत्येक परगण्यांत पॅरिशांची संख्या फार मोठी असल्याकारणानें आणि अध्यक्षाला जस्टिसचे अधिकार प्राप्त होत असल्यामुळें जस्टिसाच्या जागेचें पूर्वीचें स्वरूप पूर्णपणें पालटलें आहे. पॅरिशमध्यें कोणालाही सल्लागार होतां येईल. कोणाही सल्लागाराला सल्लागारमंडळाचें अध्यक्षपद प्राप्त होईल ( क. १५४ ) आणि यामुळें जस्टिसाची जागा ह्मणजे पूर्वी जशी खास वर्गाच्या लोकांची वतनदारी होती तशी ती आतां राहिलेली नाहीं.

( १५७ ) पॅरिशांतील सल्लागारांची निवडणूक पॅरिशसभेंत होते व ती साधारणपणें, हात मोजूनच करण्यांत येते. लेखीमतें मागितलींच तर घेण्यांत येतात. मालमत्ता कितीही किंमतीची असो किंवा हितसंबंध कसेही महत्वाचे असोत एका मतदाराला एका पॅरिशांत एकापेक्षां अधिक मत देतां येत नाहीं. परन्तु एकाच मतदाराला निरनिराळ्या पॅरिशांत मताच्या हक्काला आवश्यक असलेली मालमत्ता तेथें असल्यास मत देण्यास हरकत नाहीं. ज्या मालमत्तेनें नवऱ्यास मत देण्याचा हक्क प्राप्त होतो त्याच मालमत्तेनें त्यांच्या बायकोस तो त्याच्या हयातींत प्राप्त होत नसे पण १९१८ च्या कायद्यामुळें ही अडचण नाहींशी झाली आहे. ]

( १५८ ) पॅरिशमंडळांचे अधिकारः—१८९४ सालापर्यंत व्हेस्ट्री, देवालयांचे पंच, भिकाऱ्यांवर देखरेख करणारे अधि-

कारी आणि निरनिराळ्या प्रकारचे व वेगवेगळ्या कामांचे कमिशनर यांजकडे वांटून दिलेले अधिकार आतां पॅरिश सल्लागारमंडळाच्या किंवा जेथें हें मंडळ नसेल तेथें पॅरिशसभेच्या हातांत देण्यांत आले आहेत. पॅरिशसल्लागार मंडळें ह्या रानटी संस्था असल्यामुळें त्याना पॅरिशमधील मालमत्ता धारण करितां येते व तिची व्यवस्था पाहतां येते. त्यानां पॅरिशच्या इमारती बांधण्यासाठीं आणि सार्वजनिक क्रीडाभुवनें तयार करण्यासाठीं किंवा तीं चालू ठेवण्यासाठींही देणगीनें अथवा खरेदीनें मालमत्ता प्राप्त करून घेतां येते. त्याचप्रमाणें पॅरिशमधील रहिवाश्यांस ठराविक मक्त्यानें वांटून देण्यासाटीं शेतजमिनही पैदा करितां येते. पाण्याच्या सांठ्यावर त्यांचा ताबा असतो. हीं मंडळेंच आरोग्यावर देखरेख ठेवतात. त्यानां सार्वजनिक रहदारीचे रस्ते आपल्या ताब्यांत घेण्याचा, ते दुरुस्त ठेवण्याचा आणि जरूर पडल्यास रहदारी फिरवण्याचा हक्क आहे. पॅरिशमधील सडका आणि स्मशानें त्यांच्या ताब्यांत असतात. तींच अग्निप्रतिबंधक उपाययोजतात आणि आग लागल्यास ती विझविण्याचीं साधनें तयार ठेवतात. त्यांच्याकडे स्थानिक जमाबंदीवर आणि करांवर अपील करितां येतें. जमाबंदी व कर निश्चित करण्याचा अधिकार त्यांचा आहे, पॅरिशचें दप्तर तींच तयार करितात. तीं भिकाऱ्यांवर देखरेख करणाऱ्या मुख्य व दुय्यम अधिकाऱ्यांची नेमणूकही करितात. या अधिकाऱ्यांकडे भिकाऱ्यांच्या पट्टीचा आकार करण्याचें आणि जूरसंची आणि राष्ट्रसभा व परगणासभा यांच्या मतदारांची, नोंद करण्याचें काम असतें. पूर्वी जस्टिस ऑफ दि पीस हे या अधिकाऱ्यांची नेमणूक करीत, पण तो अधिकार आतां जस्टिसांच्या हातून मंडळांच्या हातांत गेला आहे.

[ ( १५९ ) देखरेख:—या नवीन पद्धतीनें पॅरिश-मंडळें आपला कारभार कशा तऱ्हेनें करितात यावर देखरेख करण्याचा अधिकार परगणा सल्लागार मंडळांकडे देण्यांत आला आहे. हें देखरेखीचें काम करण्यासाठीं परगणामंडळें निरनिराळ्या पॅरिशांचे गट तयार करितात किंवा त्यांचे फेरविभाग करितात. लहान लहान पॅरिशांत सल्लागार मंडळे अस्तित्वांत आणणें किंवा असलेलीं बंद करणें त्यांच्या अधिकारांतलें आहे. पॅरिशसल्लागार मंडळांतील सल्लागारांची संख्या ठरविण्याचा अधिकार त्यांनां आहे. तीं कर्ज काढण्याच्या व शेतजमीन वाटून देण्याच्या बाबतींत पॅरिश सल्लागार मंडळांवर देखरेख करितात. पॅरिशांतील कोणतें दफ्तर आणि महत्वाचे कागदपत्र राखावयाचें हें थोड्या बहुत अंशीं तीं ठरवितात. आणि याप्रमाणेंच दुसऱ्या बऱ्याच मार्गांनीं पॅरिश सल्लागार मंडळांवर देखरेख ठेवितात.

( १६० ) **शहरी पॅरिशांवर** १८९४ च्या कायद्याचा विशेषसा परिणाम झाला नाहीं. त्यांचें मुलकी काय किंवा धार्मिक काय सर्व काम पूर्वी प्रमाणें व्हेस्ट्रीच्या मार्फतच पाहण्यांत येतें ]

( १६१ ) **बिन शहरी डिस्ट्रिक्ट**—१८९४ पावेतो भिकाऱ्यासंबंधीच्या कायद्याची अमलबजावणी करण्याकरितां बिन-शहरी पॅरिशांचे गट ( यूनियन ) केलेले असत. या गटांवर बोर्ड ऑफ गार्डियन्स किंवा देखरेख करणारें मंडळ नेमण्यांत येई व त्याचेकडे भिकाऱ्यांची व्यवस्था लावण्याचें व इतरही बारिक सारिक काम असे. सडकांसाठीं, स्मशानांसाठीं आणि लोकोपयोगी सुधारणांसाठीं या गटांत निरनिराळीं मंडळें असत. त्याचप्रमाणें

स्नानगृहें आणि सार्वजनिक वाचनालयें याकरितां कमिशनर नेमलेले असत. १८९४साली गटांच्या ऐवजीं डिस्ट्रिक्ट हे विभाग अस्तित्वांत आले, आणि यापूर्वी निरनिराळ्या संस्थांच्या हातीं असलेले सर्व अधिकार डिस्ट्रिक्ट मंडळाच्या हातीं एकवटण्यांत आले. या मंडळाची निवडणूक दर तीन वर्षांनीं करण्यांत येते. मंडळाला डिस्ट्रिक्ट मध्यें असलेल्या सर्व पॅरिशांवर स्थानिक स्वराज्याचे बाबतींत देखरेख करण्याचा आणि डिस्ट्रिक्टमधील सर्व पॅरिशांशीं ज्यांचा संबंध येतो अशी कामें करण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. या मंडळाचे सभासद पॅरिशसभांतून निवडण्यांत येतात. ज्याला पॅरिशमध्यें मत देण्याचा हक्क आहे अशा कोणत्याही माणसाची या मंडळांत निवडणूक करितां येते. पॅरिश सल्लागार-मंडळाप्रमाणें डिस्ट्रिक्ट सल्लागार मंडळाच्या अध्यक्षला जस्टिस ऑफ दि पीसचे अधिकार असतात.

( १६२ ) **शहरी डिस्ट्रिक्टः**—ज्यांनां म्युनिसिपालिटी मिळाली आहे अशा शहरांतील पॅरिशें खेरीज करून बाकीच्या शहरी पॅरिशांचेही डिस्ट्रिक्ट बनविण्यांत आले आहेत. या डिस्ट्रिक्टमध्येंही सल्लागार मंडळ असतें. पण दोघांच्या अधिकारांत थोडा फरक आहे. बिनशहरी डिस्ट्रिक्टांतील सल्लागार मंडळाला असलेले बहुतेक सर्व अधिकार शहरी डिस्ट्रिक्टच्या सल्लागार मंडळालाही आहेत. मात्र पहिल्याला जसा भिकाऱ्यांची व्यवस्था लावण्याचा अधिकार आहे तसा तो दुसऱ्याला नांहीं. शहरी डिस्ट्रिक्टमध्यें या कामासाठीं नेमलेले स्वतंत्र बोर्ड ऑफ गार्डीयन्स अजूनही अस्तिवांत आहेत. स्थानिक स्वराज्य मंडळास योग्य वाटल्यास बिनशहरी डिस्ट्रिक्टां-तील सल्लागार मंडळांनां असलेले सर्व अधिकार शहरी डिस्ट्रिक्ट

सल्लागार मंडळांस ही देतां येतात आणि अशा तऱ्हेनें ते मिळाले असतां हीं मंडळें आपआपल्या क्षेत्रमर्यादेंत राज्यकारभाराच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या अशा संस्था बनतात.

[ ( १६३ ) स्त्रियांना पॅरिशसल्लागारमंडळाप्रमाणेंच डिस्ट्रिक्ट सल्लागार मंडळाचेंही सभासद होतां येतें, इतकेंच नव्हे तर त्यांची अध्यक्षस्थानीं निवड करण्यासहि हरकत नाहीं. त्या अध्यक्ष असतां त्यांस जस्टिस ऑफ दि पीसचे अधिकार देण्यांत येत नाहींत.

( १६४ ) परगणासल्लागारमंडळांस बिनशहरी व शहरी डिस्ट्रिक्ट सल्लागारमंडळावर बऱ्याच बाबतींत देखरेख करण्याचा अधिकार आहे. सल्लागारांची संख्या ठरविण्याचें किंवा ती फिरवि-ण्याचें त्यांचे हातांत आहे. आणि त्याला पॅरिशांतून त्यांच्या विरुद्ध आलेल्याही तक्रारीचा निकाल लावण्याचा अधिकारही आहे. ]

( १६४ ) **म्युनिसिपालिट्या**:--पूर्वी ज्या शहरांना राजाकडून स्थानिक स्वराज्याच्या हक्कांची सनद मिळालेली असें त्या शहरांस ' बरो ' असें ह्मणत. कांहीं थोड्या ' बरो ' नां तीं ज्या परगण्यांत असत त्या परगण्यांतून पूर्णपणें वेगळें काढून परगण्याचे सर्व अधिकार देण्यांत आले. बऱ्याच बरोनां, ( एकंदरींत अशीं बरो थोडींच होतीं, ) रेकॉर्डर नांवाचे अधिकारी नेमण्याचा हक्क मिळाला. हे रेकार्डर तिमाही सेशन भरवीत व फौजदारी गुन्ह्यांची चौकशी करीत. साधारणपणें सर्वच बरोनां म्युनिसिपालिटी देण्यांत आली होती. या सर्व म्युनिसिपालिट्यांचे अधिकार मात्र सारखेच नसत. त्यांत पुष्कळ प्रकार होते. पुढें राष्ट्रसभेला प्रतिनिधी निवडण्याचा हक्क या शहरांस मिळाला.

१८३२ सालीं राष्ट्रसभेची सुधारणा झाल्यानंतर १८३५ सालीं म्युनिसिपालिट्यांच्या सुधारणेचा कायदा मंजूर झाला. या कायद्यांत निरनिराळ्या सुधारणा होत गेल्या आणि १८८२ सालच्या म्युनिसिपल कार्पोरेशनच्या कायद्यांत या सर्व सुधारणांचा संग्रह करण्यांत आला. १८८८ सालच्या स्थानिकस्वराज्याच्या कायद्यानें १८८२ सालच्या कायद्यांत थोडेसे फेरफार झाले. या कायद्यानें कोणत्याही शहरांतील किंवा गांवातील रहिवाश्यांस आपल्याला म्युनिसिपालिटी असावी असें वाटल्यास प्रिव्हिकौन्सिलाकडे अर्ज करण्याची परवानगी मिळाली. परगणा सल्लागार मंडळ आणि स्थानिक स्वराज्यमंडळ यांना या अर्जाची नक्कल पाठवावी लागते. अर्जाचा विचार करण्यासाठीं प्रिव्हिकौन्सिल एक कमिटी नेमतें. ही कमिटी अर्ज करणाऱ्या शहरांत चवकशी करून म्युनिसिपालिटी स्थापण्यासाठीं किंवा तद्विरुद्ध आलेल्या मुद्यांचा विचार करते, आणि म्युनिसिपालिटी द्यावी कीं नाहीं हें ठरविते. स्थानिक स्वराज्य मंडळ आणि परगणा सल्लागार मंडळ यांच्या तक्रारींचाही या कमिटीस विचार करावा लागतो.

[ ( १६५ ) बहुधा स्थानिकमत असा अर्ज करण्याविरुद्ध असतें व तो केला असतां त्याला मान्यता मिळूं नये ह्मणून प्रयत्न करितें. शहराचा किंवा गांवाचा राज्यकरभार या नाहीं तर त्या तऱ्हेच्या स्थानिक संस्थांच्याच हातीं असल्यामुळें त्यांना तो आपल्या हातून जावा असें वाटत नाहीं. आणि शिवाय म्युनिसिपालिटी सारखी विविधांगी संस्था स्थापन करण्यासाठीं जादा खर्च करण्यास तयार नसणारीं माणसें असावयाचींच. म्युनिसिपालिटी स्थापावयाची ह्मणजे तिच्या खर्चासाठीं नवीन कर दिले पाहिजेत. ]

( १६६ ) कमिटीनें अर्ज मान्य केल्यास प्रिव्हिकौन्सिल म्युनिसिपालिटी स्थापण्यास सनद देतें; नवीन म्युनिसिपालिटीचे हक्क आणि सल्लागारांची संख्या ठरविते. पुष्कळदां तें म्युनिसिपालिटीचे पोटविभाग ( वार्ड ) ही पाडून देतें. म्युनिसिपालिटीची सनद देतांना इतर सर्व स्थानिक संस्थाकडे असलेले म्युनिसिपालिटीला द्यावयाचे अधिकार काढून घेण्यांत येतात.

( १६७ ) एकदां सनद मिळाली कीं म्युनिसिपल कार्पोरेशन ॲक्टानें ठरविलेली म्युनिसिपालिटीची रचना शहरास लागू करण्यांत येते. या कायद्याप्रमाणें म्युनिसिपालिटीस सल्लागार मंडळ निवडण्याचा अधिकार प्राप्त होतो. या सल्लागारांपैकीं तीनचतुर्थांश कौन्सिलर असतात व बाकीचे एकचतुर्थांश ऑल्डरमेन असतात. कौन्सिलराची कालमर्यादा तीन वर्षांची असते व दरवर्षी त्यांपैकीं एक तृतियांशांची निवड करण्यांत येते. ऑल्डरमेनची कालमर्यादा साहा वर्षांची असते व दर तीनवर्षांनीं त्यांपैकीं निम्मेंची नेमणूक करण्यांत येते. कौन्सिलरांची निवडणूक मतदार करितात, आणि नंतर निवडून आलेले कौन्सिलर आपत्यांतूनच किंवा मतदारांतून ऑल्डरमेनची नेमणूक करितात. पूर्वी मेयरची निवडणूक कौन्सिलच्या सभासदांतून करावी लागे. आतां कोणत्याही मतदाराची मेयर म्हणून निवडणूक करितां येते. त्याची नेमणूक एक वर्षा पुरती केलेली असते व त्याला पगारही देण्यांत येतो. मेयरच्या जागेवर नेमणूक झाल्यावर दोन वर्षेपावेतों त्याला जस्टिसचे अधिकार असतात. १८३५ सालच्या कायद्यानें फक्त पुरुषांसच मत देण्याचा हक्क होता तो १८६९ सालीं स्त्रियांसही देण्यांत आला. आतां त्यांची कौन्सिलर किंवा अध्यक्ष म्हणूनही

निवडणूक करितां येते. मत देण्याचा हक्क प्राप्त होण्यास मागें परगणा मतदाराला सांगितलेली लायकी ( क. १३४ ) बरो मतदाराला ही आवश्यक आहे.

**( १६८ ) म्युनिसिपालिटीचे न्यायाधिकारः—** शहरास मिळालेल्या म्युनिसिपालिटीच्या सनदेंत नमूद करण्यांत न आलेले सर्व अधिकार पूर्वीपासून चालत आलेल्या संस्थांकडेच राहतात. म्युनिसिपल कार्पोरेशन कायद्यामुळें शहराला जरी स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालें तरी त्याला न्यायाचे अधिकार मिळत नाहींत. म्युनिसिपालिटीच्या सनदेंत न्यायाचे अधिकार मिळण्याची तजवीज करण्यांत आली नाहीं तर तें न्यायाचे बाबतींत परगण्याचे सत्तेखालींच राहते. अर्ज केला असतां त्याला आपले स्वतःचे जस्टिस ऑफ दि पीस किंवा कदाचित् स्वतंत्र तिमाही सेशनकोर्टही मिळूं शकतें. तेव्हां बरोंचे तीन प्रकार होतात. ( १ ) स्वतःला न्यायाधिकार नसून न्यायाच्या बाबतींत परगणा जस्टिसांचे अधिकाराखालीं असणारी बरो. ( २ ) ज्यांना स्वतःचे परन्तु परगणा कोर्टाचे अधिकारांत असलेले जस्टिस असतात अशीं. त्यांस स्वतंत्र तिमाही सेशनकोर्ट भरवितां येत नाहीं. ( ३ ) ज्यांना स्वतंत्र तिमाही सेशनाचा अधिकार मिळालेला असतो अशीं. असा अधिकार मिळाला असल्यास धंदा करणाऱ्या वकिलाची रेकॉर्डर या हुद्दयावर राजाकडून नेमणूक करण्यांत येते. या रेकॉर्डरला दोन जस्टिसांना एकत्र बसले असतां प्राप्त होणारे अधिकार देण्यांत येतात. त्याला एकट्यालाच तिमाही सेशन चालवितां येतें. थोडक्यांत बोलावयाचें म्हणजे त्याला अनेक जस्टिस ऑफ दि पिसांना मिळून असलेले अधिकार प्राप्त होतात.

[ ( १६९ ) ज्या शहरांना स्वतंत्र जस्टिस नेमण्याचा अधिकार असतो त्यांना शहरी परगणे ( कौन्टीज ऑफ टाऊन ) ह्मणतात आणि ज्यानां तिमाही सेशन मिळतें त्यांना तिमाही सेशन शहरें असें ह्मणतात. शहराच्या मेयरला जस्टिसचे अधिकार असतात, व ते अधिकार मेयरच्या जागेची मुदत संपल्यावरही एक वर्षपावेतों त्याकडे राहतात. मग शहराला स्वतंत्र जस्टिस नेमण्याचा अधिकार मिळालेला असो वा नसो. ]

( १७० ) **परगणावजा शहरें**:—प्रत्येक म्युनिसिपल शहराला सल्लागारमंडळ असतें हें वर सांगितलेंच. तें जर परगणावजा शहर असेल, ह्मणजे त्याला परगण्याला असलेले हक्क देण्यांत आले असतील तर त्याच्या सल्लागारमंडळाचे अधिकार खरोखरच फार विस्तृत असतात. १८८८ सालचा स्थानिकस्वराज्याचा कायदा मंजूर झाल्यापासून अधिकारांचे बाबतींत निरनिराळ्या शहरांत भेद करणें आवश्यक झालें आहे. स्थानिक स्वराज्याच्या कारभारांत परगणे आणि त्या परगण्यांत असलेलीं परगणावजा शहरें यांचा एकमेकांशीं फारसा संबंध नसतो. त्या शहरांचा परगण्याशीं संबंध येतो तो फक्त पोलिसच्या बाबतींत. न्यायसंबंधी अधिकार सोडले तर पूर्वी जस्टिसांस असलेले सर्व अधिकार ( क १२३ ) आज या शहरांतील सल्लागारमंडळांना आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्यानां आरोग्यरक्षणाचे सर्व अधिकार आहेत. पुष्कळ परगण्यांत त्यांना शिक्षणाचेही अधिकार आहेत. थोडक्यांत सांगावयाचें तर भिकाऱ्यांची व्यवस्था लावण्याचें काम खेरीज करून राज्यकारभाराचीं सर्व कामें त्यांच्याकडे आहेत. जेजे अधिकार परगण्यांस दिलेले आहेत ते सर्व या परगणावजा शहरांसही देण्यांत आले आहेत.

[ ( १७१ ) एकाद्या पन्नास हजार वस्तीच्या शहरांतील सल्लागारमंडळानें किंवा तें शहर ज्या परगण्यांत असेल त्या परगण्याच्या सल्लागारमंडळानें त्या शहराला परगण्याचे हक्क मिळावेत, तें परगणावजा शहर ठरविण्यांत यावें, असा स्थानिक स्वराज्यमंडळास अर्ज केल्यास, असे हक्क देण्यास विशेष हरकत नसेल तर मंडळ चौकशी करण्यासाठीं कमिटी नेमतें, व हे हक्क देणें इष्ट आहे कीं नाहीं तें ठरवितें. शहराला परगण्याप्रमाणें हक्क मिळावेत ह्मणून स्थानिक स्वराज्यमंडळानें काढलेल्या हुकुमाला राष्ट्रसभेची मंजुरी मिळणें आवश्यक आहे. ]

( १७२ ) **म्युनिसिपल शहरांचे इतर प्रकारः—** ज्यानां परगणावजा शहरें ठरवून स्थानिक स्वराज्याचे सर्व हक्क देण्यांत आले नाहींत अशा शहरांचे राज्यकारभारांत परगण्याशीं असलेल्या त्यांच्या संबंधाच्या दृष्टीनें तीन प्रकार होतात.

( १ ) ज्यानां स्वतःचीं तिमाही सेशनें आहेत अशीं दहा हजार किंवा ती वरील लोकवस्तीचीं शहरें. स्थानिक स्वराज्याच्या पुष्कळ बाबींत त्यांचा परगण्यांतच अंतर्भाव होतो. १८८८ चा कायदा लागू करण्यांत आल्यावर ज्या शहरांनीं हे रस्ते आपल्या अधिकारांत ठेवण्याचा हक्क राखून ठेवलेला नाहीं अशा शहरांतून जाणारे मोठाले रस्ते परगण्यांतील अधिकाऱ्यांच्या ताब्यांत असतात. शहरांतील न्यायकचेऱ्यांसाठीं त्यांना परगण्यांत पैसे भरावे. लागतात. परगणा सल्लागारमंडळांत त्यांचे प्रतिनिधी असतात. खर्चाच्या ज्यां बाबींबद्दल परगण्यांत शहर पट्टी भरीत नाहीं त्या बाबींचा विचार चालला असतां शहराच्या प्रतिनिधींस मत

देण्याचा हक्क नाहीं. वर सांगितलेल्या गोष्टी वगळल्या असतां बाकींच्या गोष्टींत तीं परगणावजा शहरांइतकींच स्वतंत्र असतात.

( २ ) स्वतंत्र तिमाही सेशनें असलेलीं परन्तु दहाहजाराखालील लोकवस्तीचीं शहरें. पूर्वी एकदां त्यांच्या सल्लागारमंडळांस किंवा जस्टिसांस असलेले पुढील अधिकार १८८८ च्या कायद्यानें परगणा सल्लागारमंडळांच्या हातीं गेले आहेत. भिकाऱ्यांची व वेड्यांची आश्रयस्थानें चालविणें; कॉरोनरवरील सत्ता; रसायनशास्त्रज्ञांची नेमणूक करणें; लहान मुलांस सुधारण्याच्या आणि औद्योगिक शाळा चालविणें व त्यांवर देखरेख करण्यांत परगण्यास मदत करणें; स्फोटकद्रव्यें, सडका, ट्राम्वासारखीं वाहनें आणि मासे सुकविणें याकरितां केलेल्या कायद्याची अंमलबजावणी करणें.

( ३ ) ज्यानां स्वतंत्र तिमाही सेशनें नाहींत अशी दहा हजाराखालील लोकवस्तीची शहरें. १८८८ सालापासून अशीं बहुतेक शहरें परगण्यांतच सामील करण्यांत आलीं आहेत. केवळ स्थानिक स्वरूपाचे व्यवहार मात्र त्यांच्या ताब्यांत ठेवण्यांत आले आहेत. परगणा सल्लागारमंडळांत इतर भागांप्रमाणें या शहरांचेही प्रतिनिधी असतात.

[ ( १७२ ) प्रत्येक म्युनिसिपल शहरांत एक खजिनदार आणि एक कारकून असतो. त्यांचा पगार शहरच्या तिजोरींतून देण्यांत येतो. शहरांतील सल्लागार मंडळ त्यांची नेमणूक करितें. यां खेरीज शहरांस साधारणपणें जरूर असलेले किंवा मंडळास आवश्यक वाटतील असे दुसरे कांहीं अधिकारी नेमण्यांत येतात. शहरांस तिमाही सेशन असल्यास

कोर्टांबरोबर ओघानेंच शिरस्तेदार आणि कॉरोनर यांचीही नेमणूक करावी लागते.

( १७३ ) **जमाखर्चाचे अधिकारः**—कर्ज काढण्याच्य बाबतींत म्युनिसिपल सल्लागार मंडळांनां अगदीं बेताचे अधिकार आहेत. कर्ज काढतांनां प्रत्येक वेळीं स्थानिक स्वराज्य मंडळाची मंजुरी मागितली पाहिजे. नंतर जाहिरखबर देऊन हें मंडळ शहरांत चौकशी करतें व नागरिकांस कर्ज मान्य असल्यास कर्जफेडीची मुदत मुक्रर करितें. पॅरिश किंवा डिस्ट्रिक्ट कौन्सिलांच्या कर्जाच्या बाबतींत देखील स्थानिक स्वराज्यमंडळास हेच अधिकार आहेत.

( १७४ ) बहुतेक सर्व स्थानिक संस्थाचे हिशेब स्था. स्व. मंडळाकडे तपासण्यास पाठवावे लागतात. म्युनिसिपल शहरांनां मात्र तसें करावें लागत नाहीं. शहरांचे हिशेब त्यांच्याच मंडळानें निवडलेले तीन हिशेब तपासनीस तपासतात. या पैकीं दोन मंडळांतील सभासद निवडतात. आणि एकाची नेमणूक मेयर करितो. ]

( १७५ ) **म्युनिसिपल शहरें व शहरी डिस्ट्रिक्टः**— म्युनिसिपल शहर आणि शहरी डिस्ट्रिक्ट विभाग यांतील भेद हा कांहीं आकाराचा भेद नाहीं. म्युनिसिपल शहराची लोकवस्ती दोन चारशें पासून पांच लाखां पावेतों आहे. शहरी डिस्ट्रिक्टची लोकवस्तीही चार दोनशें पासून लाखा पावेतों आहे. तेव्हा यांच्यामधें जो भेद आहे तो स्थानिक आवडीचा आणि कायद्याच्या सोईचा आहे. १८८८ चा कायदा मंजूर होईतों म्युनिसिपल शहराची क्षेत्रमर्यादा सनदेंत एकदां आंखली गेली कीं ती

फिरविण्याला राष्ट्रसभेच्या स्वतंत्र कायद्याची आवश्यकता लागे. परंतु ती टाळण्याचा एक सोपा उपाय होता. स्थानिक स्वराज्य मंडळाला आरोग्यासाठीं शहरी डिस्ट्रिक्ट बनविण्याचा अधिकार असे, त्याला अर्ज केला कीं झालें. म्युनिसिपालिटी मिळालेल्या मूळ गावांचीच लोकवस्ती वाढल्यामुळें म्युनिसिपालिटी स्थापन करितांना शहरांत सामील केलेले भोंवतालचे भाग वेगळे काढून त्यांचे 'आरोग्याचे शहरी डिस्ट्रिक्ट बनण्यांत आले' आणि अशा तऱ्हेनें शहरांची फाळणी करण्यांत आली. अशा तऱ्हेनें आरोग्यासाठीं निर्माण केलेल्या या नवीन विभागांस राज्यकारभाराचे अधिकार देण्यांत आले. १८८२ च्या सुमारास ज्याची फाळणी करण्यांत आली नव्हती व जें एकाच म्युनिसिपालिटीच्या अंमलाखालीं होतें असें नॉटिंगहॅम खेरीज एकही शहर शिल्लक राहिलें नव्हतें.

[ (१७६) १८८८ च्या स्थानिक स्वराज्याच्या कायद्यांत असें एक कलम घालण्यांत आलें कीं म्युनिसिपल शहराच्या हद्दींत तेथील सल्लागार मंडळानें अर्ज केल्यास स्थानिक स्वराज्य मंडळाच्या तात्पुरत्याहुकुमानें बदल करण्यांत यावा. हा हुकूम स्थानिक चौकशी करून देण्यांत येतो व तो कायम व्हावयास राष्ट्रसभेची मंजुरी लागते. यामुळें शहराची हद्द फिरवून घेण्याचा मार्ग, स्थानिक स्वराज्य मंडळाकडून शहरी डिस्ट्रिक्ट पाडून घेण्यापेक्षां अजूनही अधिक त्रासाचा राहिला आहे.

(१७७) **मध्यवर्ती सत्तेशीं संबंध**:-पूर्ण म्युनिसिपालिटी मिळालेल्या शहरावर आरोग्याचे बाबतींत स्थानिक स्व-

राज्य मंडळाला, पोलिसचे बाबतींत स्वराष्ट्रीय खात्याला आणि त्या शहरांत बंदर असल्यास व्यापार मंडळाला देखरेख करण्याचा अधिकार असतो. शहरी डिस्ट्रिक्टांवर फक्त स्थानिक स्वराज्य मंडळाचीच सत्ता असते. ]

**( १७८) म्युनिसिपल व्यापार**:-पाणी पुरवठा, रोषनाई, ट्राम्बे आणि टेलिफोन या सारख्या कामाचे मक्ते न देतां तीं स्वतःच करावींत आणि त्यांत नफा मिळवून कर कमी करावेत अशी आतां म्युनिसिपालिट्यांची प्रवृत्ति आहे. या प्रवृत्ती विरुद्ध असा आक्षेप होता कीं हीं कामें व्यापारी तत्वांवर होण्याऐवजीं त्यांत मतदेणाऱ्या कामकरी वर्गाच्या फायद्याकडेच विशेष लक्ष्य देण्यांत येईल. परंतु अनुभवानें तो लंगडा पाडला आहे.

**( १७९ ) मजुरां करितां घरें**:—गरीब मजुरांसाठीं घरें बांधण्याची जबाबदारीही म्युनिसिपालिट्यांनीं उचलली आहे. १९०० सालच्या कायद्यानें म्युनिसिपालिटीला आपल्या हद्दी बाहेर देखील अशीं घरें बांधण्याकरितां जागा घेण्याचा अधिकार मिळालेला आहे.

**( १८० ) लंडन**:-१८३५ च्या म्युनिसिपल कार्पोरेशन कायद्यानें इंग्लण्डांतील इतर शहरांच्या स्थानिक स्वराज्य व्यवस्थेंत सुधारणा झाली, परंतु त्यानें राजधानीचें शहर जें लंडन त्याला हात लावला नाहीं. उद्योगधंद्यांच्या आणि व्यापाराच्या वाढी बरोबर लंडन शहराचीही अतर्क्य अशी वाढ झाली आहे. आज त्याचा विस्तार मिडल् सेक्स, सरे, आणि केंट् या परगण्यांतही पसरला आहे. परंतु स्थितिप्रिय इंग्लण्डांत भोंवतालचे भाग कितीही वाढले आणि समृद्ध झाले तरि त्याचा अन्तर्भाव जुन्या लंडन शहरांत

झाला नाहीं. जुनें शहर या नव्या शहराच्या पोटांत तसेंच शिल्लक राहिलें. त्याच्या स्थानिक राज्यव्यवस्थेच्या पद्धतींत फरक किंवा सुधारणा झाली नाहीं. त्यानें आपले पुराण अधिकार संकुचित वृत्तीनें हृदयाशीं बाळगून धरिले. शहरामोंवतालचा भाग जसजसा वाढत चालला तसतसे नवीन पॅरिश किंवा शहरी डिस्ट्रिक्ट निर्माण होऊं लागले. १८५५ सालीं सर्व शहराकरितां मेट्रॉपालिटन बोर्ड ऑफ वर्क्स नांवाचें सर्व राजधानीचा स्थानिक कारभार पहाणारें मंडळ स्थापण्यांत आलें, परंतु त्याचे अधिकार अगदीं नियमित होते. ही स्थिति १८८८ च्या स्थानिक स्वराज्याच्या कायद्यानें अंशतः सुधारली आहे. जुनें शहर अजून कायमच राखण्यांत आले असून त्याला स्वतंत्र सल्लागार मंडळ आहे. त्याचे २६ पोटविभाग करण्यांत आले असून त्यांतून कौन्सिलरांची दर वर्षी निवड करण्यांत येते. प्रत्येक पोटविभागांत एकेका ऑल्डरमनचीही तहाहयात निवडणूकच करण्यांत येते इतर सर्व शहरांतील सल्लागार मंडळांत कौन्सिलर व ऑल्डरमन हे एकाच ठिकाणीं बसतात. ते सर्व मिळून एकच सभा होते. परन्तु या शहराच्या मंडळांत कांहीं विशिष्ठ प्रसंगीं ऑल्डरमन निराळे बसतात व त्यांच्या सभेस कोर्ट ऑफ ऑल्डरमन अशी संज्ञा आहे. या शहरांतील न्यायाधीश, रेकार्डर, सार्जंट, कमिशनर वगैरे अधिकारी जरी सल्लागारमंडळांतूनच निवडण्यांत येतात तरी त्यांच्या नेमणुकीस राजेसाहेबांची मंजुरी लागते. १८९८ च्या कायद्यानें जुन्या व नव्या सर्व लंडनशहराचा मिळून एक परगणा बनविण्यांत आला आहे. त्या कायद्यानें मुख्य शहर आणि राष्ट्रसभेंत प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळालेले

भोंवतालचे भाग हे सर्व परगण्याचे पोटविभाग ठरविण्यांत आले, व या पोटविभागांतून लंडन परगणासल्लागारमंडळांतील सभासदांची निवडणूक होऊं लागली. पब्लिकवर्क्स डिपार्टमेंट व परगण्यांतील जस्टिस यांजकडे असलेले काम आणि सरकारी खात्याकडे आजपर्यंत असलेले सर्व स्थानिक अधिकार या मंडळाकडे देण्यात आल्यामुळें त्याला इतर परगण्यांतील सल्लागारमंडळांपेक्षां फार मोठी सत्ता प्राप्त झाली आहे. १८९९ सालीं सुधारणेंत आणखी एक पाऊल पुढें पडलें. मुख्य शहराभोंवतालच्या विभागांचीं शहरें बनविण्यांत आलीं व त्यांस स्वतंत्र म्युनिसिपालिट्या व सल्लागारमंडळें देण्यांत आलीं. परन्तु या शहरांस इतर शहरांसारखे अधिकार मिळाले नाहींत. त्यांना जे अधिकार मिळालेले आहेत ते पूर्वी व्हेस्ट्रीला असलेले अधिकार आहेत. या शहरांत प्रत्येकीं दोन किंवा तीन पॅरिश आहेत व त्यांचेकडे धार्मिक बाबी व स्थानिक ट्रस्ट यांचें काम ठेवण्यांत आलें आहे. परगण्यांतील भिकारी लोकांची व्यवस्था लावण्यासाठीं गार्डियन्स ऑफ यूनियन हे स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत येतात.

[ ( १८१ ) लंडनपरगणा सल्लागारमंडळाचे एकंदर सभासद १३७ आहेत. यापैकीं कौन्सिलर ११८ आणि ऑल्डरमन १९. जुन्या शहरांस चार व नव्या शहरांस प्रत्येकीं दोन कौन्सिलर निवडण्याचा हक्क आहे. इतर परगण्यांत ऑल्डरमनांची संख्या कौन्सिलरांच्या एक तृतियांश असते परन्तु लंडनमध्यें ती केवळ एकषष्ठांशच आहे. ]

( १८२ ) स्कूल् डिस्ट्रिक्ट्:—१८७० चा शिक्षणाचा मूळ कायदा व १८७६ आणि १८८० तील पुरवणी

कायदे अमलांत आल्यापासून प्राथमिक शिक्षणासाठीं इंग्लण्डचे शिक्षण मंडळाच्या देखरेखाखाली पॅरिश, शहरें वगैरे जुन्या विभागांस धरूनच निरनिराळे विभाग करण्यांत आले. प्रत्येक विभागांत तेथील कर भरणारांनी अर्ज केल्यास लोक नियुक्त स्कूल बोर्ड स्थापन करिता येतें. प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था परगणे परगणावजा शहरें, १००००लोक वस्तीचीं इतर शहरें व २०००० लोक वस्तीचे शहरी डिस्ट्रिक्ट यांच्या सल्लागार मंडळांच्या हातीं असते.

( १८३ ) स्थानिक स्वराज्य व सरकार:—स्था. स्व. संस्था सर्वतोपरी लोकनियुक्त आहेत. त्यांत मध्यवर्ती सरकारानें नेमलेले अधिकारी नाहींत. स्था. स्व. संस्था मध्यवर्ती सरकारच्या देखरेखी खालीं आणण्याची प्रवृत्ति अलिकडे वाढली असून स्था. स्व. मंडळाच्या हातीं हे देखरेखीचे अधिकार १८७१ पासून संकलित झाले आहेत. परंतु या पद्धतीत विशेष हा आहे कीं तिनें सहकार्य वाढलें आहे ताबेदारी नव्हे.

( १८४ ) स्कॉटलंड:—स्कॉटलंडकरितां १८९० सालीं स्थानिक स्वराज्याचा कायदा करण्यांत आला. या कायद्यान्वयें स्कॉटलंडकरितां स्वतंत्र असें स्थानिक स्वराज्यमंडळ स्थापण्यांत आलें आहें. स्कॉटलंडचा सेक्रेटरी हा या मंडळाचा अध्यक्ष असतो. मंडळांत त्याच्याशिवाय आणखी पांच सभासद असतात; स्कॉटलंडचा सॉलिसिटर जनरल, दुय्यम चिटणीस आणि राजेसाहेबांनीं नेमलेले आणखी तीन सभासद. १८८९ सालीं स्कॉटलंडकरितां पास केलेला स्थानिक स्वराज्याचा कायदा बहुतांशीं १८८८ च्या इंग्लंडच्या काय-

याच्या धर्तीवर आहे. या कायद्यानें स्थानिक स्वराज्याची सत्ता नवीनच निर्माण झालेल्या परगणा सल्लागारमंडळांच्या हातांत गेली. पुढें १८९४ सालीं परिशांतही सल्लागारमंडळें स्थापण्यांत आलीं. स्कॉटलंडांतील म्युनिसिपालिट्या इंग्लंडांतील म्युनिसिपालिट्यां-प्रमाणेंच आहेत. फक्त तेथें मेयरच्या ऐवजीं प्रोव्होस्ट आणि ऑल्डरमनच्या ऐवजीं बेली हे शब्द वापरतात. मेयरच्या अधिका-राची मुदत एक वर्षाची असते पण प्रोव्होस्टची तीन वर्षांची आहे. प्रोव्होस्ट आणि बेली ह्यांस मॅजिस्ट्रेटचे अधिकार असतात.

( १८५ ) **आयर्लंड**:—आयर्लंडचा राज्यकारभार लॉर्ड लेफ्टनेन्टचे हातीं आहे, तरी तेथील स्थानिक स्वराज्यपद्धति पूर्ण-पणें लोकसत्ताक आहे. १८९८सालीं आयर्लंडकरितां स्थानिक स्वरा-ज्याचा कायदा मंजूर करण्यांत आला. या कायद्यानें परगणे, म्युनि-सिपल शहरें, शहरी व बिनशहरी डिस्ट्रिक्ट या सर्व निरनिराळ्या विभागांत लोकनियुक्त सल्लागारमंडळें स्थापन करण्यांत आलीं असून भिकाऱ्यांवर देखरेख करण्याखेरीज बाकी सर्व कामें इंग्लंडांतील किंवा स्कॉटलंडांतील सल्लागारमंडळांप्रमाणेंच त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलीं आहेत. भिकाऱ्यांवर देखरेख करण्यासाठीं बोर्ड ऑफ गार्डि-यन्स आहेत. हे बोर्डही लोकनियुक्तच असतात. आयर्लंडांत १५०० पेक्षां कमी लोकवस्तीच्या शहरांस कार्पोरेशन मिळत नाहीं. अशा शहरांचा स्थानिक अधिकार कमिशनरांच्या हातीं असतो. १८९८ च्या स्थानिक स्वराज्याच्या आणि १९११ च्या स्थानिक संस्थांच्या कायद्यान्वयें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियां-नांही सल्लागारमंडळांकरितां उमेदवार ह्मणून उभें राहण्याचा हक्क मिळाला आहे.

# प्रधानांचे पगार.

| प्रधानपद | पगार द. म. रु. |
|---|---|
| पंतप्रधान ( कोषाध्यक्ष ) | ६,२५० |
| पंतअमात्य ( फडणीस ) | ६,२५० |
| लॉर्ड हायचॅन्सेलर ( न्यायमंत्रि ) | १२,५०० |
| मुद्रारक्षक ( लॉर्ड प्रीव्हीसील ) | २,५०० |
| सभागारमंडळाचा अध्यक्ष ( लॉर्ड प्रेसिडेन्ट ऑफ कौन्सिल ) | २,५०० |
| स्वराष्ट्रीय मंत्री | ६,२५० |
| परराष्ट्रीय मंत्री | ६,२५० |
| वसाहतमंत्री | ६,२५० |
| युद्धमंत्री | ६,२५० |
| भारतमंत्री | ६,२५० |
| स्काटलंडचा चिटणीस | २,५०० |
| आयर्लंडच्या लॉर्ड लेफ्टेनंटचा चिटणीस | ५,५३० |
| पोष्टमास्तर जनरल | ३,१२५ |
| व्यापारमंडळाचा अध्यक्ष | ६,२५० |
| स्थानिक स्वराज्यमंडळाचा अध्यक्ष | ६,२५० |
| शिक्षणमंडळाचा अध्यक्ष | २,५०० |
| लॅंकेशायरच्या जहागिरीचा कारभारी | २,५०० |
| पब्लिकवर्क्स खात्याचा मुख्य मंत्री | २,५०० |
| कृषिमंडळाचा अध्यक्ष | २,५०० |

## ग्रंथांत योजिलेले इंग्रजी मराठी शब्द.

Abbot-मठाधिपति. Admiral-दर्यासारंग,
Admiralty-दर्यासारंग कचेरी.
Arch Bishop-मुख्य धर्माध्यक्ष.
Baron-जहागिरदार, सरदार. Bishop-धर्माध्यक्ष.
Borough-( बरो ) म्युनिसिपालिटी असलेलें शहर.
Butler-वांकनीस. Cabinet-( कॅबिनेट ) प्रधानमंडळ.
Chamberlain-खानगी कारभारी.
Chancellor-पर्त प्रतिनिधी.
Chancellor of Exchequer-पंतअमात्य फडणवीस.
Coroner-( कॉरोनर ) अपघातांच्या मृत्यूंची पंचनामा करणारा अधिकारी.
Council-सल्लागारमंडळ. County-कौंटि-परगणा.
County Borough कौंटिबरो-परगणावजा शहर.
Court of chancery-सदर अदालत.
Court of Eschequer-जमाबंदी कचेरी.
District-( डिस्ट्रिक्ट ) जिल्हा; विभाग.
Ealdorman-ऑल्डरमन्. परगणाधिकारी ( पा. ७ ) म्युनिसिपालिटींतील प्रनिनिधि
Feudal-सरंजामी. Folk moot-जनसभा.
Foreign Secretary परराष्ट्रीय मंत्री, सुमंत.
Franchise-मतदारी.
GreatCouncil-वडें सल्लागारमंडळ.
House of Commons-लोकसभा.
House of Lords-उमरावसभा.
Hundred-शतग्राम-प्रांत. Justiciar-पंडितराव.
Knight-शिलेदार, सरदारबहादुर. Lord-जहागिरदार.

ग्रेटब्रिटनची-

Lord of Admiralty-आरमाराधिपति.
Lord Chancellor-न्यायाधीश.
Lord Privy Seal-राजमुद्रारक्षक.
Magna Charta-प्रख्यात सनद.
Ministry-मंत्रिमंडळ. Marshal-मुदपाकखानदार.
Parliament-राष्ट्रसभा.
Permanent Council-शाश्वत सल्लागार मंडळ.
Priest-धर्माधिकारी.
Prime Minister-पंतप्रधान, मुख्य प्रधान.
Privy Council-खाजगी सल्लागार मंडळ.
Public Works-लोकोपयोगी ( पब्लिकवर्क्स ) कामें.
Reive-कोतवाल. Rural-बिनशहरी.
Secretary for Colonies-वसाहतमंत्री
Seretary for Home Department-स्वराष्ट्रमंत्री.
Secretary for India-भारतमंत्री.
Secretary for State-हुजूर चिटणीस.
Sheriff-शेरिफ-नगरशेट.
Secretary for War-युद्धमंत्री.
Shire-परगणा. Steward-कारभारी.
Treasurer कोषाध्यक्ष, कोषाधिकारी, खजिनदार.
Tribe--गोत्र Urban-शहरी. Witenagamoot-प्राज्ञसभा

# शुद्धिपत्र.

| पान | ओळ | |
|---|---|---|
| १५ | २१ | जस्टिसचे ऐवजीं ज[illegible] |
| १५ | २३ | खाजगी कारभारी हा |
| २२ | २२ | रजचनाचे ऐवजीं रच[illegible] |
| २२ | २४ | 'आणि मिनिस्ट्री-आ |

दोन शब्द समान अर्थक नाहीं'त असें वाचावें.

REFBK-0001679
REFBK-0001679
[illegible] ११६७०८ - १२८